# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०२/ २०१४** **दिनांक ०४.०२.२०१४**
**स्थळ- शिर्डी कार्यालय** **वेळ- सायंकाळी ०६.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा मंगळवार दिनांक ०४.०२.२०१४ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-५१०३-२०१४, दिनांक ०४ फेब्रुवारी, २०१४ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा मंगळवार दिनांक ०४.०२.२०१४ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य

मा.श्री.आप्पासाहेब शिंदे,
उपकार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत श्री.अजय मोरे, कार्यकारी अधिकारी, सदस्य यांनी दूरध्वनीवरुन कळविले. त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक ०८.०१.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

**निर्णय क्र.८१** **दिनांक ०८.०१.२०१४ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधरण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

---

**विषय नं.०२** **(अ) नोंद घेण्याचे विषय.**

**१) अ) जमाखर्च तक्ता माहे ऑक्टोबर, नोव्हेंबर-२०१३.**

माहे, ऑक्टोबर, नोव्हेंबर-२०१३ मधील अनुक्रमे जमा रु.३२,६५,३१,१५६/- व रु.३८,४०,०४,८८७/- आणि खर्च रु.१९,९७,९३,३८४/- व रु.१५,६७,००,०३९/- चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील माहे ऑक्टोबर, नोव्हेंबर-२०१३ मधील रुपये ४,२८,८६८/- व ३,३९,२४८/- चा तक्ता, संस्थानची गुंतवणूक दि.३०.१०.२०१३ रु.१०,१९,४३,७६,०८७/- चा तक्ता, या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.८२** **(A) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**(ब) माहे डिसेंबर-२०१३, जानेवारी- २०१४ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तु यांच्या विक्रीचा अनुक्रमे माहे डिसेंबर-२०१३ व जानेवारी- २०१४ मधील रु.५,५७,२२१/- व रु.५,१५,१८०/- मात्र अहवालाच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.८२** **(B) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**०२. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये माहे नोव्हेंबर, डिसेंबर- २०१३ मध्ये वैद्यकिय बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

श्री साईबाबा रुग्णालयात माहे नोव्हेंबर, डिसेंबर- २०१३ मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये रु.५२,०९,३९२/- व रु.६२,१३,८१८/- याप्रमाणे देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.८२** **(C) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०३. श्री साईनाथ रुग्णालयातील माहे डिसेंबर- २०१३ मध्ये वैद्यकिय बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

साईनाथ रुग्णालयात माहे डिसेंबर- २०१३ मधील अंतररुग्ण व बाह्यरुग्ण तसेच थॅलसेमिया व हिमोफेलिया रुग्णांसाठी रुपये ३,४४,१२०/- मात्र रकमेची वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.८२ (D) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०४. श्री साईनाथ रुग्णालयात माहे डिसेंबर- २०१३ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान मागणी अर्जाबाबत.**

श्रीसाईनाथ रुग्णालयामध्ये माहे डिसेंबर- २०१३ मधील रु.५४,८८,७५०/- मात्र देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.८२ (E) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०५. माहे डिसेंबर- २०१३ मध्ये दर्शन रांगेतील साईभक्तांना मोफत लाडू प्रसादाचे वाटपाची नोंद घेणे.**

डिसेंबर- २०१३ मध्ये दर्शन रांगेतील साईभक्तांना १८,७५,९०० पाकिटे व त्यासाठी रु.२,४९,९९,१४४/- आलेल्या खर्चाची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.८२ (F) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**०६. बांधकाम प्रगती (ब) तक्ता.**

संस्थान परिसरातील पार्किंग व रस्त्याचे डांबरीकरण करणेसाठीचे मे.जगताप कन्स्ट्रक्शन ॲण्ड इंजिनिअरींग कं., कोल्हार, ता.राहाता यांचे रु.९६,३०,९२२/- मात्रचे बील.

**निर्णय क्र.८२ (G) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**०७. पाणी तपासणी अहवाल माहे डिसेंबर- २०१३.**

माहे डिसेंबर- २०१३ मधील पाणी तपासणी अहवालाच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.८२ (H) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.०३ श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग व मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्पासाठी आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे, असोशिएटस्, नवी दिल्ली यांचे सादरीकरणाबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाचे कलम २१ पोटकलम (१) मधील खंड (ग) अन्वये- "भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे" अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :-** मा. त्रीसदस्य समितीचे दि.१८/१०/२०१३ रोजीचे सभेतील नि. क्र. ८३२ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

".. ..यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील दोन्ही संस्थांनी दिलेल्या संकल्पनात्मक डिझाईन्सबाबत साईभक्त व सर्वसाधारण नागरीकांची मते जाणून घेणेसाठी राष्ट्रीय पातळीवरील वर्तमानपत्रात जाहिरातीव्दारे निवेदन प्रसिध्द करुन प्रतिक्रिया मागविणेत याव्यात. त्यासाठी सदर डिझाईन्स साईभक्त व नागरीक यांना पहाणेसाठी संस्थानचे संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे, असे ठरले."

**प्रस्तावना:-** शिर्डी येथे श्री साईंचे दर्शनार्थ येणारे साईभक्तांची गर्दी दिवसेंदिवस वाढत आहे. उत्सव काळात तसेच सलग सुट्ट्यांचे दिवशी मंदिर परिसर व लगतचे भागात मोठ्या प्रमाणावर साईभक्तांची गर्दी होते. त्यावेळी दर्शन रांगेचे हॉल व जुने पिंपळवाडी रस्त्याचा दक्षिणेकडील मंदिर परिसराचा भाग पूर्ण क्षमतेने भरतो. काही प्रसंगी दर्शन रांग त्याबाहेर जाते. त्यासाठी संपूर्ण मंदिर परिसर व जुने प्रसादालय परिसर यांचे एकत्रीकरण, पुनर्नियोजन व पुनर्विकास करण्याचे संस्थानतर्फे ठरविण्यात आले आहे. त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि.१२/१२/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ११०४ अन्वये आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे, पुणे व आर्किटेक्ट हाफीज कॉन्ट्रॅक्टर, मुंबई यांचे आराखड्यांचे परिक्षण करुन अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले होते. त्यानुसार दोन्ही आर्किटेक्ट यांनी दि.१७/०४/२०१३ रोजीचे मा.त्रीसदस्य समितीचे सभेपुढे श्री साईबाबा मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्पाबाबत सादरीकरण केले. आर्किटेक्ट यांचे सादरीकरण पाहून सदरहू प्रकल्पाकरीता किती टक्के फी आकारणार तसेच सदरहू फी मध्ये ते कोण कोणत्या सेवा देणार याचा सुस्पष्ट प्रस्ताव मागविण्यात यावा असे ठरले.

याकामी संस्थानला सदरहु प्रकल्पाकरिता आर्किटेक्ट संस्थांकडून अपेक्षित असणाऱ्या सेवांबाबत (Scope of work & Schedule of services) त्यांना ई-मेल व्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आर्किटेक्ट यांचेकडून प्राप्त वाणिज्यीक प्रस्तावांवर मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. १८/१०/२०१३ रोजीचे निर्णय क्र.८३२ अन्वये सदर दोन्ही संस्थांकडुन प्राप्त झालेल्या डिझाईन्स साईभक्त व नागरीक यांना पहाणेसाठी संस्थानचे संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे, असे ठरले आहे.

त्यानंतर मा. त्रिसदस्य समितीचे दि. १३/१२/२०१३ रोजीचे अहमदनगर येथील सभेत आर्किटेक्ट माथूर अँण्ड काप्रे असो., नवी दिल्ली, यांना त्यांनी बनविलेल्या दर्शन रांग व मंदिर परिसर पूर्नविकास प्रकल्पाचे संकल्पनात्मक आराखडयांचे सादरीकरण करणेसाठी सभेपुढे पाचारण करणेत यावे अशी सूचना करण्यात आली.

त्यानुसार आर्किटेक्ट माथूर अँण्ड काप्रे असो. नवी दिल्ली, यांचे प्रतिनिधी श्री. उदय काप्रे यांनी मा. कार्यकारी अधिकारी यांना दि.२८/१२/२०१३ रोजी त्यांनी तयार केलेले मंदिर परिसर पुर्नविकास प्रकल्पाचे संकल्पनात्मक आराखडे, वॉक थ्रू इ. दाखविले. त्यावेळी मा. कार्यकारी अधिकारी सो यांनी आर्किटेक्ट श्री. उदय काप्रे यांना काही सुधारणा सुचविल्या आहेत. सदर सुधारणा करुन सुधारीत आराखडे मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करणेत यावेत अशी विनंती माथूर अँण्ड काप्रे असो. प्रा. लि. दिल्ली, यांना जा.क्र. ४८९५/२०१४ दि. २३/०१/२०१४ रोजीचे पत्राने करण्यात आली आहे.

तरी त्यानुसार माथूर अँण्ड काप्रे असो. प्रा. लि. दिल्ली, यांनी तयार केलेल्या आराखडयांचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादरीकरण पाहून त्यावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८३** **आजचे सभेपुढे आर्किटेक्ट माथूर व काप्रे असो. नवी दिल्ली यांचे प्रतिनिधी श्री. उदय काप्रे यांनी मंदिर परिसर व जुने प्रसादालय नुतनीकरण प्रकल्पासाठी तयार केलेले नकाशांचे सादरीकरण केले. त्यात प्रामुख्याने त्यांनी खालील बाबी नमूद केल्या आहेत.**

**CONCEPT AND ARCHITECTURAL EXPRESSION**

The External Image of the Samadhi Mandir Campus buildings will be timeless, staid and serene, reflective of the person who it is dedicated to and embodying the simplicity, spirit and starkness of the existing Samadhi Mandir.

The Functioning and the Conceptual planning of the Queue Structure Building will be that of a state-of-the-art modern mega building (like an Airport) from inside with a large height waiting hall having a large span **ROOF STRUCTURE,** a large welcoming entry plaza, where people assemble at the starting point of the Darshan.

**PROPOSAL OF 'Q' STRUCTURE COMPLEX**

- The Proposal comprises of providing all public use facilities including Queue structure on the old Prasadalaya site and revitalising the existing SAIBABA MANDIR COMPLEX by retaining only the important structures which have religious significance, reorganizing the existing spaces with landscaped open spaces/gardens and enhancing the ambience of the temple complex.
- The extention and redevelopment of the temple complex will release larger open spaces with visibility of the Samadhi Mandir. The green setting for the Samadhi Mandir will enhance its aesthetic appeal as well as its overwhelming religious presence. It will facilitate the maintenance of security around the Mandir.
- The Prasadalaya plot is separated from the Mandir Complex by the Pimpalwadi public road. A proposed pedestrian overbridge and a pedestrian underpass across the Pimpalwadi road will facilitate the movement between the two plots.
- The Prasadalaya site is 5ft lower than the Manmad-Nagar Main Road level. The access to the Queue Complex has been taken at the road level and therefore the proposed "Basement" is actually a lower floor which will get direct light and ventilation.
- The Darshan queue will move towards the Mandir complex at the first floor level of the Q complex which further changes to the first floor level of the temple complex upon entry within the Samadhi Mandir site and down to the ground level near the Temple structure.
- At all levels starting from the second floor level, the moving 'Q' area will have a dedicated Fire and emergency exit lane which makes the disaster management system more effective in emergency.
- The building has been designed keeping handicapped and older people in mind, with ramps, lifts and escalators providing access to every floor level.

- The 'Q' complex has a 6 nos waiting halls of 2500 persons seating capacity each at first floor as well as the second floor **making the total waiting capacity in the complex to 30,000 persons. Further, a 4-lane moving 'Q' of 7,500 person capacity which will take 20 minutes up to the temple from the 'Q' Complex,** along with a appropriate security checks and adequate public amenities. A separate 'Q' for the handicapped persons and their caretakers is also provided for which will double act as a security staff movement queue as well as fire/emergency exit queue.
- Separate Q at the ground level from within the temple complex for Dwarkamai has also been provided which connects to Dwarkamai from the temple itself.
- For every hour of darshan Q there is a holding capacity of two and a half hours of darshan Q devotees comfortably seated with public facilities and snack counters.
- MI Rooms and direct exits for medical and other emergencies have been catered for both floors, including ambulance portability from the basement level.
- All the services and maintenance system are provided at basement level with a planning for Ambulance parking at two ends for handling emergencies. Space for parking for a couple of official vehicles, etc., has been provided.

**SALIENT FEATURES OF REDEVELOPMENT OF COMPLEX**

- Efficient Movement of 'Q'
- Controlling the Crowd by providing catchment area in 'Q' structure complex.
- Modern Public facilities provided in 'Q' complex like Cloak rooms, Toilets, lifts, escalators, booking counters, ATM's, Prasad counters, food courts, information centre etc. which are accessible both before and after the darshan.
- Public amenities at appropriate locations are provided along the moving 'Q'. These include facilities like drinking water, toilets, cafeteria, paramedical assistance, security and emergency exits.
- Dedicated entries and exits for the different groups of people like Devotees, VIP's, Villagers and administration.
- Universal (Handicapped) access throughout the temple complex.
- All modern arrangement for crowd control and security system with proper signage and T.V. displays, monitoring and surveillance and public address systems throughout the Queue structure and the temple complex.
- Enhanced focal position of the Temple "Shikhar" throughout the moving 'Q' for darshan.
- Dedicated donation areas just after the darshan

उपस्थित सदस्यांनी यावेळी आर्किटेक्ट श्री. उदय काप्रे यांना खालीलप्रमाणे सुचना दिल्या.

१) संपूर्ण इमारत वातानुकुलीत करणेसाठी बराच खर्च येईल याकरीता इमारतीत नॅचरल व्हेंटीलेशन (नैसर्गिक वायुविजन) तसेच Toreeal Ventilation सिस्टीम असावी व सदरहू बांधकाम करतेवेळी भविष्यात आवश्यकता भासल्यास संपूर्ण इमारत वातानुकूलीत करणेसाठी आवश्यक त्या बाबींची तरतूद करणेत यावी.

२) साईभक्तांच्या दृष्टीने संरक्षण, आपत्ती व्यवस्थापन व हॉल त्वरीत रिक्त करणेसाठी सुविधा करणेत याव्यात.

३) दर्शन रांगेतील साईभक्त यांना व्हि.आय.पी. रांगेतील भक्त दिसू नयेत. तसेच VVIP करीता कमी वेळेत दर्शन घेणेसाठी स्वतंत्र व्यवस्था करणेत यावी.

४) नगरनियोजन व आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ञांना सदरहू प्रकल्पाचे नकाशे दाखविणेत येऊन, त्यांचेही मार्गदर्शन घेण्यात यावे.

५) उपरोक्त दुरुस्त्या करुन सामान्य साईभक्तांना समजेल अशा स्वरुपात नियोजित प्रकल्पाबद्दलची व दर्शनरांग इमारती बद्दलची थोडक्यात माहिती तयार करुन संस्थानचे संकेत स्थळावर १५ दिवस साईभक्त व सामान्य नागरीक यांचे अभिप्रायासाठी ठेवण्यात यावी. तसेच याबाबत संस्थान कर्मचाऱ्यांचेही अभिप्राय घेण्यात यावे.

६) सदरहू माहिती संस्थानचे संकेत स्थळावर ठेवणेत आले बद्दल नामांकीत वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन त्याबद्दल साईभक्तांना माहिती देणेत यावी. या वर्तमान पत्रातील जाहिरातीसाठी तसेच

संकेतस्थळावर प्रकल्पाची माहिती देणारी ॲनिमेटेड फिल्म/ वॉक थ्रु/ ग्राफीक्स/ क्युज तयार करणेसाठी येणाऱ्या अनुषंगिक सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत आली.

आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे तसेच यापुर्वी इतर आर्किटेक्ट संस्थांनी सादर केलेल्या आराखडा वजा प्रस्तावाबाबत साधक बाधक चर्चा झाली. आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असो., नवी दिल्ली यांनी सादर केलेले संकल्पनात्मक आराखडे वजा प्रस्ताव, दर्शन रांगेकरीता आवश्यक असलेल्या जादा क्षमतेची प्रतिक्षागृहे, सुरक्षा तपासणी, आगप्रतिबंधक व्यवस्था, मोबाईल, चप्पल, लॉकर्स, आसन व्यवस्था, भक्तांना देणेत यावयाच्या विविध सोयी-सुविधांचा समावेश, वायुवीजनासाठी केलेली तरतूद, प्रकल्पातील भव्यता इत्यादी अधिकाधीक आवश्यकता पूर्ण करणारे व सुयोग्य असल्याने तसेच श्री. काप्रे यांनी यापुर्वी मंदिर परिसराचा अभ्यासपूर्वक आराखडा तयार करुन त्याची यशस्वीरित्या उभारणी केलेली आहे. याचा वस्तुनिष्ठ व साकल्याने विचार करुन, त्यांची सदरहू प्रकल्पासाठी आर्किटेक्ट म्हणून नियुक्ती करण्यात यावी, असे ठरले. तसेच यापुर्वी समाधी मंदिर व जुने प्रसादालय परिसर नुतनीकरण करणेसाठी इतर आर्किटेक्ट संस्थानी तयार केलेले संकल्पनात्मक आराखडे व प्रस्ताव नाकारण्यात आले.

याकामी आर्किटेक्ट यांनी या प्रकल्पासाठी ढोबळमानाने रक्कम रुपये २४४.६६ कोटी मात्रचे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. तथापि, समाधी मंदिर परिसर व जुने प्रसादालय नुतनीकरणासाठी संकेत स्थळावर ठेवणेत येणाऱ्या संकल्पनात्मक आराखडयांवर साईभक्तांचे अभिप्राय प्राप्त झालेनंतर त्यापैकी योग्य व उचित बाबींचा विचार व समावेश करुन सुधारित नकाशे, अंदाजपत्रक व आर्किटेक्ट शुल्काबाबत आर्किटेक्ट यांचेकडून प्रस्ताव तयार करुन घेऊन, तो मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०४ सुरक्षा साहित्यांचे Comprehensive AMC कॉन्ट्रॅक्ट मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोएडा यांना देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१८/१०/२००८ चे सभेतील विषय नं.३६, निर्णय क्र.७९३ नुसार समाधी मंदीर व मंदीर परिसरात सुरक्षिततेच्या दृष्टीने करावयाच्या विविध उपाययोजना व अत्याधुनिक सुरक्षा साहित्याचे खरेदीस व त्याकामी येणारे रु.४.५ कोटीचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०३/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र.२८३ नुसार मे.व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी नोईडा यांची सुरक्षा साहित्य पुरविणेबाबत निवड झालेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१० चे सभेतील निर्णय क्र.५८४ नुसार सदरील सुरक्षा साहित्याचा दर्जा, गुणवत्ता, पुरवठा आदेशानुसार तपासणे, साहित्याची देखरेख व सुपरविजन करणेसाठी पुढील पाच वर्षासाठी ट्रायकलर कन्सलटंट, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

जा.नं.एसएसएस/ वशी-संरक्षण/ ५९५८/ २०१० दि.१४/०४/२०१० ने मे.व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सो. कंपनी, नोईडा यांना सुरक्षा साहित्य पुरविणे व इन्स्टॉलेशन करुन देणेकामी वर्क ऑर्डर दिलेली आहे.

तसेच मे.व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी नोईडा यांनी दि.०४/०९/२०१३ चे पत्राने पुढील कालावधीकरीता सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट मिळणेकामी पत्र दिलेले आहे.

वर्कऑर्डरमधील मे.व्हेन्टेज इंटिगेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोइडा यांनी पुरवठा करुन कार्यान्वीत केलेल्या सुरक्षा साहित्यापैकी Annexure-A तपशिलाप्रमाणे साहित्याची Comprehensive AMC देणे आवश्यक आहे. First Work Order मधील रक्कम रुपये ३,२७,३३,०८२/- मात्र व Second work Order मधील रक्कम रुपये २५,१०,४९५ एकुण रक्कम रुपये ३,५२,४३,५७७ /- मात्र इतकी आहे.

तसेच Annexure-B सुरक्षा साहित्य कार्यान्वित करणेकामी केलेले फर्निचर, इन्स्टॉलेशन व कमिश्नींग, मॅनेजमेंट खर्च, सिक्युरिटी इक्वीपमेंट गायडन्स खर्च, ट्रेनींग व हॅण्डओव्हर, इंजिनियर पगार, सर्व्हीस टॅक्स, व्हीडीओ लायसन्स, सॉफ्टवेअर इत्यादी करीता झालेला खर्च Comprehensive AMC मध्ये येत नाही. Annexure-B चा तपशिलाप्रमाणे First Work Order मधील रक्कम रुपये ५६,९१,६००/- मात्र व Second work Order मधील रक्कम रुपये २२,६६,०००/- एकुण रक्कम रुपये -७९,५७,६००/- मात्र इतकी आहे.

मे.व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोईडा यांना वर्कऑर्डर देतांना वर्क ऑर्डरमधील मुद्दा क्र.५६ नुसार प्रोजेक्ट पुर्ण झाल्यानंतर व्हेन्टेज यांचेकडून ०१ क्वॉलीफाईड इंजिनीयर व त्यांचे सोबतीला ४ टेक्निकल व्यक्ती २ वर्षाकरीता साईडवर मेन्टेनंन्सचे काम करणेकरीता पुरविणेबाबत देणेचे ठरलेले आहे. त्याकामी मे.व्हेन्टेज यांना दोन वर्षाकरीता रक्कम रु.२८,५८,९७६/- सर्व करांसह देण्याचे ठरलेले होते.

तसेच मे.व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोईडा व संस्थानमध्ये झालेल्या कराराचे मुद्दा क्र.१२ नुसार प्रोजेक्ट पुर्ण झालेचे तारखेपासून दोन वर्षाकरीता सुरक्षा साहित्याची गॅरंटी / वॉरंटी देण्यात आलेली आहे. व्हेन्टेज यांनी प्रोजेक्ट पुर्ण व कार्यान्वित करुन दि.१०/१०/२०११ रोजी संस्थानकडे

हस्तांतरीत केलेला आहे. दि.१०/१०/२०११ पासून दोन वर्षाकरीता मे.व्हेन्टेज यांचा दोन वर्षाचा वॉरंटी/ गॅरंटीचा कार्यकाल हा दि.०९/१०/२०१३ रोजी संपुष्टात आला आहे. सुरक्षा साहित्य उभारणी व दोन वर्षाचे दुरुस्ती/ देखभालीचे काम मे. व्हेन्टेज यांनी केलेले असलेमुळे पुढील दोन/ चार वर्ष कालावधीसाठी त्यांना मेन्टेनंन्सचे काम देणे योग्य राहील असे नम्र मत आहे.त्यासाठी मे.व्हेन्टेज यांनी संदर्भ क्र.५ नुसार पुढील दोन/ चार वर्षाचे कालावधीसाठी दुरुस्ती/ देखभाल, तसेच इंजिनियर एका इंजिनियरसाठी वार्षिक वेतन खालीलप्रमाणे कळविलेले आहे.

**(अ)** Comprehensive Annual Maintenance Contract (AMC) मिळणेबाबत व्हेन्टेज यांचे मागणी प्रमाणे AMC कॉन्ट्रॅक्ट देणे झाल्यास खालील तपशिलाप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| ०१. | एकुण प्रोजेक्ट किंमत | ४,५०,०१,१७७.०० |
| ०२. | AMC न देण्याच्या सुरक्षा साहित्याची किंमत | ७९,५७,६००.०० |
| ०३. | AMC देण्याच्या सुरक्षा साहित्याची किंमत | ३,५२,४३,५७७.०० |
| ०४. | प्रोजेक्ट किंमतीच्या १५% | ५२,८६,५३६.५५ |
| ०५. | सर्व्हीस टॅक्स १२.३६% | ६,५३,४१५.९१ |
| | **एकुण देय्य रक्कम** | **५९,३९,९५२.४६** |
| | **पुर्णांकित रक्कम रु.** | **५९,३९,९५२.००** |

**(ब)** एक इंजिनियरकरीता एका वर्षासाठी रु.३,५०,०००/- + १२.३६% (४३,२६०/-) असे एकूण रु.३,९३,२६०/- खर्च येणार आहे. मेन्टेनंन्सचे कामाकरीता असे दोन इंजिनियर घेणे झाल्यास एक वर्षाकरीता रु.७,८६,५२०/- खर्च येणार आहे.

**त्यानुसार...**

सदरचा विषय मा त्रिसदस्य समितीचे सभेमध्ये दि १४.११.२०१३ रोजी विषय नं.०६ वर चर्चा होऊन निर्णय क्रं.८९५ घेण्यात आलेला आहे व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी,नोईडा हे दोन वर्षापासून करीत असलेल्या कामाचा अहवाल तयार करणेत यावा व सदरच्या सिस्टीममधील स्पेअर पार्ट किती वेळा नादुरुस्त झाले व त्यानंतर त्याची किती वेळामध्ये दिवसामध्ये दुरुस्ती /बदली करणेत आली, बॅग्स स्कॅनर दोन महिन्यांपासून बंद आहे,त्याचा करारानुसार किती कालावधी वाढतो याचा समावेश अहवालात असावा तसेच याबाबत महाराष्ट्र शासनाच्या असलेल्या अटी/शर्तीची व दरांची माहिती घेण्यात येऊन,सदर सिस्टीमच्या मेंटेनन्सचे वार्षिक कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत सविस्तर प्रस्ताव पुढील सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.

याकरीता कंपनीने सिस्टीमधील स्पेअरपार्ट, सॉप्टवेअर वेळोवेळी दुरुस्ती केलेली आहे. याबाबतचा सविस्तर रिपोर्ट जोडलेला आहे.

उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषय नं.६ व त्यावरील निर्णय क्रं.८९५ अन्वये याबाबत संस्थानचे सुरक्षा कन्सल्टंट जनरल श्री तैज कौल, ट्रायकलर यांचे मार्फत Comprehensive AMC बाबतचा अभिप्राय घेणेसाठी त्यांना पत्राद्वारे बोलविले असता ते दि.१३.१२.२०१३ रोजी मा.का.अधिकारी सो,संरक्षण अधिकारी,कंट्रोलरुम येथील तांत्रिक सुपरवायझर यांचे समवेत मिटींग झाली असता याबाबतचा सविस्तर रिपोर्ट लवकरच देण्यात येईल असे सांगितले.परंतु त्यांना वेळोवेळी दुरध्वनीद्वारे संपर्क साधला असता त्यांनी अद्याप पर्यत Comprehensive AMC बाबतचा अभिप्राय/ अहवाल सादर केलेला नाही.

कंट्रोलरुम येथील सिस्टीम मधील तांत्रिक अडचणी येत असल्यामुळे तसेच सर्व सुरक्षा साहित्यांची वॉरंटी संपुष्टात आलेली असल्यामुळे सुरक्षा साहित्यांची Comprehensive AMC वाढवून घेणे अत्यंत आवश्यक आहे.त्यामुळे मा.कार्यकारी अधिकारी सो यांचे सुचनेनुसार ट्रायकलर कन्सल्टंट याचा अभिप्राय आलेला नसल्याने तसेच ते तांत्रिक अडचणीचे वेळी शिर्डी येथे भेट देऊन तपासणी करीत नाही.सध्या कंट्रोलरुम येथे येणाऱ्या तांत्रिक अडचणी लक्षात घेता याबाबत ट्रायकलर कन्सल्टंट यांचे ऐवजी दुसरे मत (Second Opinion) ऑप्टिमिस्टिक,अ.नगर यांचे कडून मे व्हेन्टेज यांचे मार्फत खरेदी करण्यात आलेल्या सुरक्षा साहित्यांचे वॉरटीबाबत Comprehensive AMC बाबतचा अभिप्राय घेण्यात यावा, असे ठरले होते.

त्यानुषंगाने Second Opinion बाबत मा.कार्यकारी अधिकारी सो, यांचे समवेत चर्चा करुन ऑप्टिमिस्टिक, अ.नगर यांचे कडून Comprehensive AMC बाबतचा अहवाल घेऊन मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे ठेवणे बाबतची कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले.त्यानुसार ऑप्टिमिस्टिक, अ.नगर या कंपनीचे कन्सल्टंट यांना जा नं.एसएसएस/वशी-संरक्षण/४६५२ दि.८.१.२०१४ अन्वये पत्र देण्यात आले.त्यानुसार प्र.शा. आ. नं. १६९६२ /दि.०८.०१.२०१४ अन्वये ऑप्टिमिस्टिक,अ.नगर यांचा Comprehensive AMC बाबतचा अहवाल इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

**सदरचा Comprehensive AMC बाबतचा अहवाल खालील प्रमाणे आहे.**

**अ)** मे व्हेन्टेज यांना देण्यात आलेल्या पहिल्या व दुसऱ्या टप्यातील वर्कऑर्डर मधील साहित्याचा AMC बाबतचा अहवाल-

| Proposal Considered After Assorted Components For AMC | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 10 Oct 2013 to 9 Oct2014 | 10 Oct 2014 to 9 Oct2015 | 10 Oct 2015 to 9 Oct2016 | 10 Oct 2016 to 9 Oct2017 | |
| AMC Percentage | | | | | | | |
| S. N | Description Of PO | Amount | First Year | Second Year | Third Year | Fourth Year | Total |
| | | | **12.50%** | **13.50%** | **14.50%** | **15.50%** | |
| 1 | FirstWork Order | 3,27,33,082/- | 40,91,635.25/- | 44,18,966.07/- | 47,46,296.89/- | 50,73,627.71/- | 1,83,30,525.9/- |
| 2 | Second Work Order | 25,10,495/- | 3,13,811.875/- | 3,38,916.825/- | 3,64,021.775/- | 3,89,126.725/- | 14,05,877.2/- |
| | | | | **Total Comprehensive AMC Cost** | | | **1,97,36,403.1/-** |

**ब)** त्याचप्रमाणे कापडकोठी, लेखाशाखेमध्ये सुरक्षिततेच्या दुष्टीने कॅमेरे बसविण्यात आलेले होते सदर कॅमेरे हे उपरोक्त First Work Order व Second Work Order मधील नसुन त्याबाबतची स्वतंत्र मंजुरी घेण्यात येऊन कॅमेरे बसविण्यात आलेले आहे. तथापी, या कॅमेऱ्यांची मुदत ४ एप्रिल २०१४ मध्ये संपुष्टात येत आहे. त्यामुळे याबाबतचा Comprehensive AMC अहवाल पुढील प्रमाणे:-

| Proposal Considered After Assorted Components For AMC | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 4 April 2014 to 3 April 2015 | 4 April 2014 to 3 April 2015 | 4 April 2014 to 3 April 2015 | 4 April 2014 to 3 April 2015 | |
| AMC Percentage | | | | | | | |
| S.N | Description Of PO | Amount | First Year | Second Year | Third Year | Fourth Year | Total |
| | | | **12.50%** | **13.50%** | **14.50%** | **15.50%** | |
| 1 | Kapad Koti | 1,03,475/- | 12,934.375/- | 13,969.125/- | 15,003.875/- | 16,038.625/- | 57,946/- |
| 2 | Account Departments | 9,43,883/- | 1,17,985.375/- | 1,27,424.205/- | 1,36,863.035/- | 1,46,301.865/- | 5,28,574.48/- |
| | | | | **Total Comprehensive AMC Cost** | | | 586520.48/- |

**क)** मे व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन ,नोईडा यांनी Comprehensive AMC ची मंजुर मिळालेनंतरचे कालावधीसाठी मेन्टेनंन्स कामाकरीता एक इंजिनियरकरीता एका वर्षासाठी रु.३,५०,०००/- +१२.३६% (४३२६०/-) असे एकुण रु.३,९३,२६०/- खर्च येणार आहे.अशाप्रकारे मेन्टेनन्सचे कामाकरीता असे दोन इजिनिअर घेणे झाल्यास, एक वर्षाकरीता रु.७,८६,५२०/- खर्च येणार आहे.

यावर ऑप्टिमिस्टीक अहमदनगर यांनी असे सुचित केले आहे की, पहिल्या टप्प्यातील वर्कऑर्डरचे अ नं.५६ नुसार एक इंजिनिअर व ४ तांत्रिक कर्मचारी आवश्यक होते. परंतु आता Comprehensive AMC ४ वर्षाचे कालावधीत मेन्टेनन्स कामाकरीता फक्त २ इंजिनिअरची आवश्यकता असलेबाबत व त्यांचे मासिक वेतनाबाबत संस्थानने मे.व्हेन्टेंज सिक्युरिटी सोल्युशन,नोईडा यांचे समवेत चर्चा व वेतनाबाबतची वाटाघाटी करुन योग्य ते २ इंजिनिअरचे मासिक वेतन निश्चित करुन निर्णय घेण्यात यावा, असे अहवालात नमुद केले आहे.

**ऑप्टिमिस्टिक, अहमदनगर यांनी सादर केलेले अहवालानुसार..**

उपरोक्त **अ** तक्त्यात पहिल्या व दुसऱ्या वर्कऑर्डर मधील सुरक्षा साहित्यांची वॉरंटी कालावधी दि.०९/१०/२०१३ रोजी संपुष्टात आलेली आहे.त्यानुसार पुढील चार वर्षाकरीता सदर सुरक्षा साहित्यांची Comprehensive AMC चे कॉन्ट्रॅक्ट मे व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी यांना देणे झाल्यास चार वर्षाकरीता (दि.१०.१०.२०१३ ते दि.०९.१०.२०१७ अखेर) रक्कम रुपये- १,९७,३६,४०३/- (अक्षरी रुपये- एक कोटी,सत्याण्णव लाख,छत्तीस हजार चारशे तीन मात्र) खर्च येणार आहे.

उपरोक्त **ब** तक्त्यात कापडकोठी, लेखाशाखेमध्ये सदर कॅमेरे व त्यास लागणारे अनुषंगीक साहित्यांची वॉरटी कालावधी ३ एप्रिल २०१४ मध्ये संपुष्टात येणार आहे. सदरील कॅमेरे व त्याअनुषंगीक साहित्यांची Comprehensive AMC चे कॉन्ट्रॅक्ट मे. व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी यांना देणे झाल्यास चार वर्षाकरीता (दि.०४.०४.२०१४ ते दि.०३.०४.२०१८ अखेर) रक्कम रुपये- ५,८६,५२०/- (अक्षरी रुपये :- पाच लाख, श्याहऐंशी हजार,पाचशे, वीस मात्र) खर्च येणार आहे.

उपरोक्त **क** मधील तक्त्यात नमुद केले नुसार साहित्यांची ४ वर्षाचे Comprehensive AMC चे कॉन्ट्रॅक्ट कालावधीत मेन्टेनन्स कामाकरीता फक्त २ इंजिनिअरचे मासिक वेतनाबाबत संस्थानने मे.व्हेन्टेंज सिक्युरिटी सोल्युशन, नोईडा यांचे समवेत चर्चा व वेतनाबाबतची वाटाघाटी करुन Comprehensive AMC चे कॉन्ट्रॅक्ट मंजुर तारखेपासून ते पुढील चार वर्षाकरीता २ इंजिनिअरचे मासिक वेतन निश्चित करुन निर्णय होणेस विनंती.

अ आणि ब प्रमाणे मे.व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सो.कंपनी, नोईडा यांना ४ वर्षाकरीता Comprehensive AMC कॉन्ट्रॅक्ट देणे झाल्यास:-

अ) प्रमाणे रु.१,९७,३६,४०३/- (अक्षरी रुपये-एक कोटी सत्याण्णव लाख छत्तीस हजार चारशे तीन मात्र)
ब) प्रमाणे रु ५,८६,५२०/- (अक्षरी रुपये- पांच लाख शहाऐंशी हजार पाचशे वीस मात्र) असे अ व ब करीता Comprehensive AMC कॉन्ट्रॅक्ट खर्च रक्कम रुपये -२,०३,२२,९२३/- (अक्षरी रुपये- दोन कोटी तीन लाख बावीस हजार नऊशे तेवीस मात्र) खर्च येणार आहे.

तसेच,

क) प्रमाणे Comprehensive AMC चे कॉन्ट्रॅक्ट मंजुर तारखे पासून ते पुढील चार वर्षाकरीता २ इंजिनिअरचे मासिक वेतन निश्चित करुन निर्णय होणेकामी मे.व्हेन्टेज यांचे प्रतिनिधी समवेत चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८४** **आजचे सभेत सुरक्षा साहित्यांचे Comprehensive AMC कॉन्ट्रॅक्ट मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोएडा यांना देणेकामी चर्चा करणेसाठी श्री.प्रणव वर्मा, कार्यकारी संचालक, मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोएडा हे उपस्थित होते. त्यांनी सदर प्रकल्पाच्या उभारणीपासून ते सध्या येणाऱ्या तांत्रिक अडचणींपर्यंतची माहिती सभेस दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव पुढील सभेमध्ये अंतीम निर्णयार्थ सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- सी.सी.टी.व्ही.नियंत्रण कक्ष)

---

**विषय नं.०५** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयांसाठी आवश्यक सुविधामध्ये व बेडचे संख्येत वाढ करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **<u>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुद:</u>** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**<u>प्रस्तावना:</u>** संस्थानचे सर्व्हे नं. १२५ मधील जागेत श्री साईनाथ रुग्णालय सुरु होते. सदरचे रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या वाढत असल्याने, रुग्णालयाची इमारत कमी पडत होती. करीता सन २००३ मध्ये मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार सदरचे रुग्णालयाचे नुतनिकरण व काही नवीन इमारतीचे बांधकाम हाती घेण्यात आले होते. सदरचे जागेतील साईनाथ रुग्णालय बांधकामाचे कालावधीमध्ये संस्थानचे सर्व्हे नं. १४८ मधील धर्मशाळा इमारतीत तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतरीत करण्यात आले होते. इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर मा. व्यवस्थापन समितीने या इमारतीत सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल (श्री साईबाबा हॉस्पीटल) सुरु करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार सदरचे इमारतीमध्ये आवश्यक ते फेर बदल करुन त्या ठिकाणी श्री साईबाबा हॉस्पीटल सुरु करण्यात आले व श्री साईनाथ रुग्णालय धर्मशाळा इमारतीमध्येच कायमस्वरुपी ठेवण्यात आलेले आहे.

**<u>प्रस्ताविक:</u>** श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पीटल कडील रुग्णांची संख्या दिवसेदिवस वाढत असल्याने तेथे असलेले अतिदक्षता वॉर्ड कमी पडत आहेत. करिता वॉर्डची संख्या वाढविणे आवश्यक आहे. याकामी मा. अध्यक्ष सो. यांनी दिनांक १८ जानेवारी, २०१४ रोजीचे पत्रातील प्रस्ताव क्रमांक ०२ अन्वये खालील प्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

".. श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईबाबा हॉस्पीटल (सुपर स्पेशालिटी) येथे असलेल्या अतिदक्षता आय.सी.यु. वॉर्ड अतिशय कमी असल्यामुळे रुग्णांची गैरसोय होते व बऱ्याचदा रुग्णांना पुढील तारखेस परत बोलविण्यात येते कींवा दुसऱ्या हॉस्पीटलकडे पाठविण्यात येते. त्यामुळे जास्तीत जास्त वॉर्डस् उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटल जवळ हॉस्पीटल कॅन्टीन्स असून सदरहू जागा अतिशय मोठी आहे त्या ठिकाणी रुग्णांच्या नातेवाईकांना जमिनीवर बसून जेवण वाढण्यात येते वास्तविक पाहता रुग्णांना संस्थानतर्फे मोफत व जागेवर जेवण देण्यात येते. रुग्णांचे नातेवाईक प्रसादालयात जाऊन जेवण घेवू शकतात त्यामुळे ही कॅन्टीनची जागा उपलब्ध झाल्यास तेथे कमीत कमी ७-८ आय. सी. सी. यु. वॉर्डस उपलब्ध होऊ शकतात व रुग्णांच्या नातेवाईकांच्या चहा / पाण्याची सोय / व्यवस्था दुसऱ्या जागेत करता येईल. त्यामुळे हे हॉल्स् शक्य त्या सर्व सुधारणा व सोयी सुविधा उपलब्ध करुन त्याचे वॉर्डमध्ये रुपांतर करावे.

श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलजवळ अपोलो मेडीकल स्टोअर आहे. सदरहू मेडीकल स्टोअरची जागा व त्यावर शक्य असल्यास दुसरा, तिसरा मजला करुन ती जागा हॉस्पीटलला जोडता येईल त्याच प्रमाणे सध्या सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलची जी इमारत आहे तीचे सुध्दा विस्तारीकरण करता येऊ शकेल तेव्हा या संबंधिच्या सर्व शक्यतांचा आढावा घेवून आठ दिवसाचे आत सविस्तर अहवाल समितीपुढे सादर करावा."

**<u>प्रस्तावः</u>** श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पीटलकडील अतिदक्षता विभागातील वॉर्डस्‌ची संख्या अपुरी पडत असल्याने, त्यांची संख्या वाढविणेबाबत मा. अध्यक्ष सोा यांनी सुचित केलेनुसार सदरचे वॉर्डची संख्या वाढविणेसाठी खालीलप्रमाणे व्यवस्था करता येईल.

**श्री साईबाबा हॉस्पीटल** (सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल) परीसरात असलेले अपोलो मेडीकल स्टोअर हे तात्पुरत्या स्वरुपाचे आहेत. सदर मेडीकल स्टोअरची जागा ही रिबन डेव्हलपमेंट ॲक्ट नुसार महामार्गापासून सोडावयाच्या अंतरात येत असल्याने, त्या ठिकाणी बांधकाम अनुज्ञेय नाही.

श्री साईबाबा हॉस्पीटल विस्तारीकरण कामाचे वेळी नव्याने बांधण्यात आलेल्या पश्चिम बाजूकडील इमारत (२४३७.१३ चौ.मी.) व दक्षिण बाजूकडील इमारत (८६५.२५चौ.मी.) या दोन इमारतीवर आर्कीटेक्ट व आर.सी.सी. सल्लागार यांचे सल्ल्यानुसार अतिरीक्त मजल्याचे बांधकाम करुन स्वतंत्र व्यवस्था करुन अतिदक्षता वॉर्डची संख्या वाढविता येईल.

दरम्यानचे काळात दि.०२/१२/२०१३ रोजीचे रुग्णालय कामकाजाचे आढावा बेठकीतील इतिवृत्तातील क्र. (९) अन्वये कळविणेत आलेनुसार वैद्यकीय संचालक यांचे आवश्यकतेनुसार Neuro OT Recovery room, ICCU मध्ये convert करता येतील.

**श्री साईनाथ रुग्णालया**चे पूर्व बाजूला तळमजला व मेझ्रॅनाईन मजल्यासह १०८० चौ. मी. साईजची कॅन्टीन इमारत असून सध्या सदर इमारतीत प्रसाद भोजनाची व्यवस्था करणेत आली आहे. तसेच या इमारतीत श्री साईनाथ रुग्णालयाचे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेसाठी ॲल्युमिनियम पार्टीशन करून १०० चौ.मी. जागेत कार्यालय व्यवस्था करणेत आलेली आहे. सदरहू इमारतीत आवश्यक ते फेर बदल करुन स्वतंत्र व्यवस्था करुन अतिदक्षता वॉर्डची संख्या वाढविता येईल.

याकामी रुग्णालय इमारत नुतनीकरण कामाचे यापुर्वीचे आर्कीटेक्ट काबरे चौधरी, नाशिक यांचेकडून अभिप्राय मागविला असता त्यांनी याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

"..The earlier old building of Sainath hospital was constructed about 40 years back and during renovation, it was observed that, some of the R.C.C. Structural members were deteriorated and needed strengthening. Therefore, it was impossible to add any more floors on it. We could strengthen the existing building and renovated the same for better use.

It is not practical to add columns from outside and construct a new floor, on existing old building. It shall disturb the functioning off the existing hospital use.

We have added two new wings. One on the south side and one on the west side. Which are of Basement +3 floors, we have studied the design and found that we can add one more floor on the existing new building. However, the lifts provided for the existing building are upto 2nd floor level only. We shall have to provide new lifts for the proposed third floor.

My opinion is that: Instead of disturbing the existing hospital building we can construct a new building in existing Open space on the south side of the building which is in use for the parking of hospital staff. The existing hospital can be interconnected by a covered passage in between.

F.S.I. is balance for the new building or for additional floors."

**<u>विभागाचा अभिप्रायः</u>** उपरोक्त प्रमाणे आर्कीटेक्ट यांचा अभिप्राय विचारात घेता, श्री साईबाबा हॉस्पीटल करिता सदर हॉस्पीटल विस्तारीकरण कामाचेवेळी नव्याने बांधण्यात आलेल्या आलेल्या पश्चिम बाजूकडील इमारत (२४३७.१३ चौ.मी.) व दक्षिण बाजूकडील इमारत (८६५.२५ चौ.मी.) या दोन इमारतीवर अतिरिक्त मजल्याचे बांधकाम करून आवश्यक सुविधात व बेडच्या संख्येत वाढ करता येईल. अथवा साईनगर ग्राउंडचे उत्तरेकडील भागात नविन इमारतीचे बांधकाम करून स्वतंत्र व्यवस्था करता येईल.

श्री साईनाथ रुग्णालयासाठी अतिदक्षता वॉर्डसाठी श्री साईनाथ रुग्णालयाकरिता कॅंटीन इमारतीत आवश्यक ते फेर बदल करुन आवश्यक सुविधात व बेडच्या संख्येत वाढ करता येईल. सध्याचे कॅंटीनसाठी रुग्णालय परीसरातील जनरेटर रुमचे समोरील मोकळ्या जागेत शेडची उभारणी करुन व्यवस्था करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.८५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान रुग्णालयांमध्ये दिवसेदिवस रुग्णांची संख्या वाढत असल्याने रुग्णालयाची इमारत कमी पडत आहे. याकरिता श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयांच्या आवश्यक सुविधामध्ये व बेडचे संख्येत वाढ करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच, मा.अध्यक्ष महोदय हे शिर्डी भेटी दरम्यान श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलची व बेडचे संख्येत वाढ करणेसाठी जागेची पाहणी करतील, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०६** **श्री साईनाथ रुग्णालय- गायनिक वॉर्ड मधील प्रसुती कक्ष वाढविणे व टॉयलेट दक्षिणेकडे बाहेरील बाजूस स्थलांतरीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुदः** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**प्रस्ताविकः** संस्थानचे स.नं.१४८ मधील श्री साईनाथ रुग्णालयामध्ये गायनिक वॉर्डची व्यवस्था असून, रुग्णालयामध्ये प्रसुती रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, प्रसुतीसाठी उपलब्ध असलेली जागा अपुरी पडत आहे.

**मागणीः** वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांनी गायनिक वॉर्ड मधील प्रसुती कक्ष वाढविणेबाबत व दक्षिणेकडील बाहेरील बाजूस टॉयलेट स्थलांतरीत करणेबाबत कळविले आहे.

**विभागाचा अभिप्रायः** उपरोक्त प्रमाणे करावयाचे फेरबदलाबाबत वैद्यकिय अधिक्षक यांचे समवेत इकडील विभागामार्फत समक्ष पहाणी करणेत आली असून, सोबत दर्शविलेले ले-आऊट प्लॅननुसार गायनिक वॉर्ड मधील टॉयलेट काढणे व बाहेरील बाजूस स्थलांतरीत करणे. तसेच प्रसुती कक्षाची साईज वाढविणे इत्यादी बदल करुन घेता येतील. याकामासाठी सन २०१३-१४ चे जिल्हा दरसूची (DSR) नुसार तयार केलेले अंदाजपत्रकानुसार रुपये १,६०,६३१/- मात्र खर्च येईल.

तरी याकामी येणारे रुपये १,६०,६३१/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पद्धतीने कोटेशन मागवून करून घेणेकामी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाकडील गायनिक वॉर्ड मधील प्रसुती कक्ष वाढविणे व टॉयलेट दक्षिणेकडे बाहेरील बाजूस स्थलांतरीत करणेचे काम करुन घेणेसाठी विहीत पद्धतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,६०,६३१/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०७** **साई धर्मशाळा येथे बस वेटींग शेडचे बांधकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (त्र) अन्वये, *"भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे;"* अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना :-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे संयुक्त विद्यमाने साई धर्मशाळा या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. दि.२२/०७/२०१३ पासून साई धर्मशाळा प्रकल्प साई भक्तांसाठी खुला करणेत आला आहे. सदर ठिकाणी साई भक्तांना मंदिरात दर्शनाकरीता जाणेसाठी संस्थानतर्फे मोफत बसव्यवस्था उपलब्ध करण्यात आलेली आहे. सदरहू ठिकाणी भक्तांना बस वेटींगची सोय नसल्याने भक्तांची गैरसोय होत आहे. दि.३१/१०/२०१३ रोजी शिर्डी येथे आयोजीत मंदिर सुरक्षा आढावा बैठकीमध्ये साई धर्मशाळा येथे साई भक्तांचे सोयीसाठी बस वेटींग शेडची व्यवस्था करणेकामी सूचना करण्यात आलेल्या आहेत.

**प्रस्ताव :-** साई धर्मशाळा प्रकल्पाचे बी व सी इमारतीचे पूर्वेस असलेल्या गार्डन जवळील जागेत सदर बस शेडचे बांधकाम करता येईल असे मत आहे. याकामी प्लिंथ पर्यंत आर.सी.सी. स्ट्रक्चर त्यावर लोखंडी स्ट्रक्चर व छतास मेटा कलर शिट, गृहीत धरण्यात आले आहे. सदरचे ठिकाणी ६०'X२०' या मापाचे एकूण १२०० चौ.फुट क्षेत्रफळ असलेले सुसज्ज शेडचे बांधकाम करता येईल.याकामी चालू दरसुची नुसार अंदाजे रु.०९.८६ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

**विभागाचा अभिप्राय/ मत :-** साई धर्मशाळा येथे बस वेटींग शेडचे कामासाठी वरीलप्रमाणे एकूण अंदाजे रु.०९.८६ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षित आहे, तसेच सदर शेडचे स्ट्रक्चरल डिझाईन साई आश्रम प्रकल्पाचे आर.सी.सी. कन्सल्टंट श्री.आर.आर. कुलकर्णी, पुणे यांचेकडून करुन घेता येईल असे मत आहे.

तरी वरील विषयांकीत कामासाठी येणारे अंदाजे रु.०९.८६ लक्ष मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेस विनंती. तसेच सदर शेडचे डिझाईन साई आश्रम प्रकल्पाचे आर.सी.सी. कन्सल्टंट श्री.आर.आर.कुलकर्णी, पुणे यांचेकडून करुन घेण्यास व वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेस मान्यता मिळणेकामी सदरहू विषय मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई धर्मशाळा येथे निवास करणाऱ्या साईभक्तांचे सोयीसाठी बस वेटींग शेडचे बांधकाम करणेकामी सदर शेडचे डिझाईन साई आश्रम प्रकल्पाचे आर.सी.सी. कन्सल्टंट श्री.आर.आर.कुलकर्णी, पुणे यांचेकडून करुन घेणेत यावे. तसेच, याकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व येणाऱ्या अंदाजे रु.०९.८६ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०८ श्री साईबाबा हॉस्पीटलमधील अधिकारी/ कर्मचारी यांचे दुचाकी वाहने पार्किंग करणेसाठी शेड उभारणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना:** संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये काम करत असलेले अधिकारी/ कर्मचाऱ्यांकरीता दुचाकी वाहने पार्किंग करणेसाठी साईनगर मैदान परिसरामध्ये उत्तर बाजूने शेडची उभारणी करणेत आलेली असून, सदरची व्यवस्था कमी पडत आहे.

**प्रस्ताव:** वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा रुग्णालये यांनी त्यांचेकडील दिनांक ०६ सप्टेंबर, २०१३ रोजीचे टिपणी अन्वये '... अधिकारी/ कर्मचारी दुचाकी वाहनावरून डयुटीसाठी ये-जा करतात. हॉस्पीटलमधील कर्मचाऱ्यांचे दुचाकी वाहनांसाठी स्वतंत्र पार्कीग व्यवस्था साईनगर मैदान परिसरात असून ती अपुरी पडत आहे. त्यामुळे कर्मचारी व नातेवाईकांची वाहने हॉस्पीटलच्या दक्षिण बाजुस साईनगर मैदानालगत असलेल्या रस्त्याचे दुतर्फा विखुरलेल्या स्वरूपात उभी केलेली असतात. तसेच अलिकडील दोन तीन महिन्यापासून हॉस्पीटलमधील कर्मचाऱ्यांचे पाच ते सहा दुचाकी चोरीस गल्याचे निदर्शनास आले आहे. करिता सदर शेड वाढवुन शेडमध्ये श्री साईनाथ रुग्णालय परिसराप्रमाणे ब्लॉक व लोखंडी बार बसवून स्वतंत्र पार्किंग व्यवस्था करणे बाबत कळविले आहे.

उपरोक्त प्रमाणे मागणीनुसार करावयाचे दुचाकी वाहने पार्किंगसाठी नव्याने करावयाचे ४.७० x २४ मीटर साईजचे शेड उभारणी व त्याअंतर्गत करावयाचे कामांसाठी इकडील विभागामार्फत सन २०१३-१४ चे जिल्हा दरसूची (DSR) नुसार तयार करणेत आलेले अंदाजपत्रकानुसार रुपये ६,०८,५६५/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

**विभागाचा अभिप्राय:** श्री साईबाबा हॉस्पीटल कडील अधिकारी/ कर्मचारी यांचे दुचाकी वाहने पार्किंग करणेसाठीची जागा अपुरी पडत असल्याने, पूर्वीचे शेड शेजारीच नव्याने ४.७० x २४ मीटर साईजचे शेडची उभारणी करुन त्यामध्ये पेव्हिंग ब्लॉक बसवून घेता येईल असे मत आहे.

तरी विषयाकीत कामासाठी येणारे अंदाजे रुपये ६,०८,५६५/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात पसिध्द करुन निविदा मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटलमधील अधिकारी/ कर्मचारी यांचे दुचाकी वाहने पार्किंग करणेसाठी शेड उभारणी करणेकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात पसिध्द करुन निविदांची मागणी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. ६,०८,५६५/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०९ मौजे रुई येथील श्री.लखीचंद कचरदास भंडारी, सौ.पुष्पाताई लखीचंद भंडारी, श्री.राजेंद्र चंदनमल भनसाळी व श्री.सुभाष चंदनमल भनसाळी यांची रुई येथील जमीन संस्थानने खरेदी करणेबाबत, तसेच या जमिनीच्या मालकांच्या विरुध्द श्री.संग्राम माधवराव देशमुख यांनी सिव्हील जज्जसाहेब, सिनियर डिव्हीजन, कोपरगांव यांचे कोर्टात दाखल केलेला स्पे.मु.नं. ५९/२०१२ बाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त नमुद केलेल्या विषयाबाबत दिनांक १७ सप्टेंबर २०१३ रोजीच्या सभेत याबाबत निर्णय क्रमांक ६१६ खालीलप्रमाणे झालेला आहे.

" यावर सविस्तर चर्चा होऊन सदरहू जमिनीचा शासनाचे रेडी रेकनरप्रमाणे रेट घेण्यात यावा व त्यानुसार सुधारीत प्रस्ताव तयार करुन तो व्यवस्थापन समितीसमोर निर्णयार्थ सादर करणेत यावा, असे ठरले ."

सदर निर्णयाप्रमाणे मा. दुय्यम निबंधक, राहाता यांना इकडील पत्र क्रमांक जा.नं. एसएसएस/ बांधकाम/ भूसंपादन/३५७९/२०१३ दिनांक ०८/११/२०१३ रोजी संदर्भिय जमिनीचे मुल्यांकन करणेबाबत पत्र रुपाने विनंती करणेत आली होती.

त्यांना मा.मुद्रांक जिल्हाधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ अहमदनगर यांचेकडे पत्र व त्या सोबतचे कागदपत्र यांचे पत्र क्रमांक मु.शु.व नो.फी./३६७/१३ दिनांक ११/११/२०१३ रोजीचे पाठविलेले आहे. त्यात त्यांनी मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३१ नुसार आवश्यक मुद्रांक शुल्काबाबत निर्णय देण्याचे अधिकार मुद्रांक जिल्हाधिकारी म्हणजेच आपणांस आहे. त्याप्रमाणे कार्यवाही होणेबाबत विनंती केलेली आहे.

सन २०१३ चे रेडी रेकनरची प्रत आणण्यात आली.त्यामध्ये नमुद केलेल्या दराचा विचार करता फ्लॅट (Flate) रेटप्रमाणे येणाऱ्या रेडी रेकनर प्रमाणे खालीलप्रमाणे किंमत येत आहे.

| अ.नं. | गट नंबर | क्षेत्र (हे.आर) | प्रति हेक्टरी दर | Flate दराने होणारी किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | २८८अ | २-९२ | १७,९४,०००/- | ५२,३८,४८०/- |
| २ | २८८ब | ०-५० | १७,९४,०००/- | ८,९७,०००/- |
| ३ | २८८ | ०-९१ | १६,९४,०००/- | १६,३२,५४०/- |
| ३ | २९४ | ५-९० | १७,९४,०००/- | १,०५,८४,६००/- |
| | एकुण क्षेत्र | १०-२३ | | |

यात्रमाणे प्रती एकर रुपये ६,१७,६०० दर येत आहे.

तरी देखील मुद्रांक जिल्हाधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, अहमदनगर यांचेकडून मुल्यांकन आणणेत येत आहे.

श्री. संग्राम माधवराव देशमुख यांनी सिव्हील जज्जसाहेब, सिनिअर डिव्हीजन, कोपरगाव यांचे कोर्टात दाखल केलेल्या स्पे.मु.नं. ५९/२०१२ बाबत टिपणी खालीलप्रमाणे आहे.

**अ) १)** राधा कलियनदास चॅरिटेबल ट्रस्ट यांचे विषयांकित जमिन खरेदीच्या विषयाबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६ सप्टेंबर २००८ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ७४६ अन्वये, उपरोक्त जमिनी रुपये २३ लाख प्रति एकर या दराने सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करुन खरेदी करणेबाबत निर्णय झालेला होता. सदर निर्णयानुसार जमिनी खरेदीची कार्यवाही ही सुरु करण्यात आली होती. परंतू त्यामध्ये काही कायदेशीर त्रूटी आढळल्याने जमिनीची खरेदी प्रलंबित ठेवण्यात आली.

**२)** यानंतर मा.विश्वस्त, राधाकिसन कलियनदास चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांनी त्यांचे दिनांक ३ सप्टेंबर २०१० रोजीचे पत्राने पुन:श्च विषयांकित जमिनीच्या कायदेशीर बाबी संपुष्टात आल्या असून सदर जमिनी संस्थानने रुपये ५० लाख मात्र प्रति एकर या दराने खरेदी घ्याव्यात म्हणून प्रस्ताव दिला होता.

सदर प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १० आक्टोबर २०१० रोजीचे सभेत सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्रमांक ८३१ नुसार विषयांकित जमीनीचा राधा कलियनदास चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांनी खरेदी केल्यानंतर व त्यांचे नांव जमिनीचे अभिलेखास कब्जेदार सदरी लागले, नंतर ट्रस्टमार्फत आवश्यक त्या सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता झालेनंतर संस्थानमार्फत सर्व कायदेशीर बाबीची पडताळणी करुन त्याबाबत कायदेशीर अभिप्राय घेऊन सदर जमीन ४५ लाख प्रति एकर या दराने खरेदी करणेबाबत निर्णय घेणेत आला.

सदर अनुषंगाने दर्यानानी ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त श्री. प्रेम दर्यानानी यांनी १० सप्टेंबर रोजी मा. अध्यक्षसाो.यांचेशी समक्ष भेट घेतली त्यावेळेस मा.कार्यकारी अधिकारी यांचेसह इतर अधिकारी हजर होते. सदर भेटीचे चर्चेत त्यांनी असे सांगितले की, जमिनीचे संबंधित सर्वांनी एकत्र बसून समेटाबाबत चर्चा केली असून त्याबाबत कार्यवाही सुरु केलेली आहे. तथापि जमीन मालकाने संस्थानने देऊ केलेली किंमत मान्य नसल्याचे नमुद करुन संस्थानने जर रुपये ५५ लाख (अक्षरी- पंचावन्न लाख) प्रति एकर देण्यास तयार असल्यास आम्ही संस्थानला सर्व कायदेशीर बाबी पुर्ण करुन जमीन थेट खरेदी देणेस तयार आहोत. याबाबत संस्थानने निर्णय घेतल्यास विषयांकित जमीनीबाबत करावयाची न्यायालयीन कार्यवाही पुर्ण करणेस आम्ही तयार आहोत असे म्हटले आहे. यावर संस्थानचे दिनांक २४ सप्टेंबर २०११ रोजीच्या सभेत निर्णय क्रमांक ७५९ झाला त्याचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

"उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, यापुर्वी मा.व्यवस्थापन मंडळाने दिनांक १० ऑक्टोबर २०१० रोजीचे सभेत घेतलेल्या निर्णयास अनुसरुन,दर्यानानी ट्रस्ट यांची वर नमुद केलेली जमीन सर्व कायदेशीर बाबींची पडताळणी व पुर्तता करुन रुपये ५५ लाख प्रति एकर या दराने खरेदी करणेत यावी. याकामी विहीत पध्दतीने संस्थान वकिलांमार्फत जमिनीचा सर्च रिपोर्टसह अभिप्राय घेणेत यावा. तसेच वकिलाांमार्फत विषयांकित जमिनीबाबत कोणत्याही व्यक्तिची/ संस्थेची हरकत नाही याबाबत वृतपत्रात जाहिर नोटीस प्रसिध्द करुन, जमीनी खरेदीस कोणाची ही हरकत नाही याबाबत पडताळणी करणेत यावी. दर्यानानी ट्रस्ट, संबंधित जमीनमालक व इतर हितसंबंधित व्यक्ति/ संस्था यांचेत असणारे सर्व न्यायालयीन दावे निपटल्यानंतर जमीनमालकांनी संस्थानकडे जमीन विक्रीचा स्वतंत्ररित्या प्रस्ताव सादर करावा..."

जमीन मालक श्री.लखीचंद कचरदास भंडारी व इतर ३ यांनी विषयांकित जमिनी राधा

कलियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट यांचेकडून रक्कम घेऊन जमीन खरेदी देण्यासाठी साठेखत करुन दिले होते त्याबाबत राधा कलियनदास चॅरिटेबल ट्रस्ट यांनी कोर्टात दावे केले होते ते समेटाने मिटलेले आहेत. दरम्यान श्री मयेकर व श्री.संग्राम देशमुख यांचे नांवे जमिन मालकांनी ही रक्कम घेतली व विसार पावती करुन दिली. श्री. सग्राम देशमुख यांनी दिवाणी न्यायालयात याबाबत दावा ४९/२००८ दाखल केला होता. त्यात उपरोक्त जमिनीचे मालक व राधा कलियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट हे प्रतिवादी होते. त्यात अर्जदार व सामनेवाले यांची तडजोड झाली. सदर दाव्यातील तडजोडीच्या अंतर्गत कलम २ मध्ये खालील बाब नमुद केलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांनी जमिनीचा भाव निश्चित केला असून त्यानुसार वादी व प्रतिवादी यांचे प्रपोजल त्यांनी मान्य केलेले आहे. प्रतिवादी १ ते ४ यांनी श्री साईबाबा संस्थान,शिर्डी यांना दावा मिळकतीत त्यांचा हिस्सा कायम खरेदी देण्याचे मान्य केले

त्या व्यवहारास वादी व प्रतिवादी नं. ५ यांनी संमत्ती देण्याचे मान्य केले असून त्यानुसार त्यांनी खरेदीखतावर सहया द्यावयाच्या आहेत. वादी व प्रतवादी क्र. १ ते ५ यांना आता त्यांनी घेतलेला निर्णय बदलणे नाही. दावा मिळकतीत श्री साईबाबा संस्थान,शिर्डी यांनी जी किंमत देवू केली आहे. ती सर्वांना मान्य आहे. तो करार पण सर्वांना मान्य असून तो करार सर्वांना बंधनकारक आहे. वादी व प्रतिवादी यांचेत वाद असणारी मिळकत श्री साईबाबा संस्थान,शिर्डी या धार्मिक ट्रस्टला चांगल्या कामासाठी विक्री होत असल्याने सर्वांनी एकत्रित बसून त्या व्यवहारास संमती दिली आहे.."  यावरुन वादी व प्रतिवादी क्रमांक १ ते ५  यांनी तंटयाची जमीन संस्थानला द्यावयाची आहे हया एकाच कारणास्तव तडजोड झालेली आहे. सदर तडजोड न्यायालयाने मान्य केली व त्याप्रमाणे दिनांक ०६ मार्च, २०१२ रोजी दावा निकाली काढला.

**ब)** १) श्री.लखीचंद कचरदास भंडारी, २) सौ. पुष्पाताई लखीचंद भंडारी ३) श्री. सुभाष चंदनमल भनसाळी ४) श्री. संग्राम माधवराव देशमुख ५) राधा कलियनदास दर्यानानी ट्रस्ट, मुंबई करिता ॲडव्होकेट श्री. व्ही.जी.गवांदे यांनी दिनांक १६/११/२०११ रोजीच्या पत्राने " संस्थानला जागेची गरज असल्याचे समजले वरुन जागा विकत देण्याचा प्रस्ताव तुम्हास देत आहोत. आम्ही तुम्हांस जी जागा विकत देणार आहोत त्या जागेबाबत प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे. दाव्यातील सर्व पार्टीनी आपसात तडजोड करुन वाद मिटविण्याचे ठरविले आहे. ती जागा जर संस्थान विकत घेण्यास तयार असेल तर जागेची किंमत निश्चित करावी .. "

अर्जदार यांना दिनांक २२/११/२०११ रोजीच्या पत्राने दिनांक २४ सप्टेंबर २०११ रोजीच्या सभेतील निर्णय क्रमांक ७५९ पाठवून संस्थान प्रति एकर ५५ लाख रुपये या दराने जमिनी विकत घ्यावयास तयार आहे असे कळविले.

अर्जदाराने त्यानंतर न्यायालयाच्या निर्णयाच्या प्रती, समझोता करावयाच्या प्रती संस्थानकडे दिल्या. संस्थानचे वकिलाकडून सर्च रिपोर्ट प्राप्त करुन घेणेत आला तसेच संस्थान वकील श्री. जे.के.गोंदकर यांचाही अभिप्राय प्राप्त करुन घेणेत आला.

संस्थानचे वकीलाचा अभिप्राय व जमीन मालकांनी हजर केलेली कागदपत्र याची छाननी करण्यात आली. दिनांक ५/१०/२०१२ रोजीच्या पत्राने सर्व जमीन मालक व श्री. संग्राम माधवराव देशमुख व श्री प्रेम कालीयनदास दर्यानानी, कार्यकारी विश्वस्त यांनी खरेदीखताच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पुर्तता करणेबाबत विनंती पत्र दिले.

**क)** दरम्यान दिनांक २४ सप्टेंबर २०१२ चे दैनिंक सार्वमत मध्ये ॲड रविराज लालजी गोतीस, येवला यांनी प्रश्नाधीन जमिनी जमिनीचे मालक त्यांचे अशिलास खरेदी देणार आहेत. सदर जमिनीबाबत कोणाचा दावा, किंवा हक्क असलेबाबत त्यांना १५ दिवसांत कळविणेबाबत नोटीस दिलेली आहे. सदर नोटीस श्री. संग्राम माधवराव देशमुख यांच्या पाहण्यात आली. त्यांनी मा. दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठस्तर, कोपरगांव येथे स्पे.मु.नं. ५९/२०१२ दाखल केला आहे. त्यात सामनेवाले उपरोक्त जमिनीचे मालक, श्री. अभिजित जितेंद्र शहा, राधा कालीयनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट, श्री साईबाबा संस्थान व श्री. रविराज लालजी गोतीस हे आहेत. श्री. संग्राम देशमुख यांची सदर दाव्यात ज्या मागण्या आहेत. त्यांची मागणी (इ) खालीलप्रमाणे आहे.

विक्रीचे करुन प्रतिवादी न. १ ते ५ यांनी केलेल्या ताडजोडी नुसार तसेच करार नाम्यानुसार प्रतिवादी नं.७ (श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ) यांना ठरलेल्या शर्तीनुसार सदर मिळकत विकत घेण्याचा अग्रहक्क असे विकल्पे करुन जाहीर व्हावे व त्यानुसार वादी यांना ठरलेली रक्कम ठरलेल्या शर्तीनुसार नुकसान भरपाईसह वसूल होवून मिळावी.

सदर केसमध्ये संस्थानचे वकील श्री.जे.के. गोंदकर काम पाहत आहेत. अद्यापावेतो संस्थानतर्फे कॅव्हेट अथवा शपथपत्र दाखल झालेले नाही.

**ड)** श्री. संग्राम माधवराव देशमुख यांनी दिवाणी दावा ५९/२०१२ दाखल केलेला आहे.

त्यात दुरुस्तीचा अर्ज श्री.संग्राम माधवराव देशमुख यांनी दिलेला आहे. तरी दुरुस्ती अर्जाचाी प्रत संस्थानचे वकील श्री.जे.के.गोंदकर यांना संस्थान प्रतिनिधी यांनी दिनांक २८ जुन २०१३ रोजी दिलेली आहे.

सदर दुरुस्ती अर्जाचा आशय खालीलप्रमाणे आहे.

प्रतिवादी क्रमांक ४ श्री सुभाष चंदनमल भनसाळी यांनी गट नं. २९४ पैकी २ हे. ९३ आर जमीन समता नागरी पत संस्थेस तारण देवून रु. ५० लाख कर्ज घेतले.

स्पेशल मुकादमा नं.४८ मध्ये दावा तडजोड करताना समता नागरी पत संस्थेचा कर्जाचा कोठेही उल्लेख केलेला नाही

दावा कलम १ क मधील मिळकतीवर बोजा निर्माण केलेल्या संमती पत्र संस्थेने तसेच प्रतिवादी नं. ४ यांनी एक मिळाणी होऊन १०१ प्रकरण सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांचेकडे सादर केले या प्रकरणात प्रतिवादी ४ गैरहजर राहिले.

समता पत संस्थेने ५३,११,०५२/- या रकमेचा दावा कलम १ क मधील मिळकत विशेष वसुली अधिकाऱ्यामार्फत विक्री करण्याचे प्रयत्न चालविले आहेत.

इत्यादी सर्व बाबी नमूद करुन त्यांनी खालीलप्रमाणे दुरुस्ती नमुद करण्यास परवानगी मिळावी म्हणून अर्ज केला.

४अ) प्रतिवादी नं.४ ते ६ यांनी दावा कलम १ क मधील गट नंबर २९४ पैकी २ हे.९३ आर क्षेत्राबाबत प्रतिवादी क्रमांक ९ यांचे कर्जाबाबत प्रतिवादी नं ९ यांचे कर्जाबाबत जे रेकॉर्ड केले त गैर व बेकायदेशीर असल्याचे जाहीर होवून मिळावे. तसेच त्या कर्जाची जबाबदारी दावा कलम १ मधील मिळकतीवर येवू शकत नसल्याचे जाहीर होवून मिळावे. प्रतिवादी नं.४ यांनी प्रतिवादी नं.९ पतसंस्थेतचे चेअरमन बरोबर हातमिळवणी करुन जो कर्जाचा बेबनाव केला आहे ते कृत्य तसेच प्रतिवादी नं.१० ज्या कर्जाची वसुली दावा कलम १ मधील मिळकतीची विक्री होवून मिळावे म्हणून वादीची मागणी आहे. प्रतिवादी नं. ४ ते ६ यांनी जे बेकायदेशीर कृत्य तथाकथित कर्जाबाबत व तडजोडीनंतर केले आहे. ते वादी यांचेवर बंधनकारक नाही असे जाहीर करुन मिळावे.

दावा कलम ११ जी नंतर " जी (१) असे कलम नमूद करुन त्यात पुढीलप्रमाणे विनंती करण्याची परवानगी मिळावी.

" प्रतिवादी नं.९ यांनी प्रतिवादी नं.४ यांचे दावा कलम १ मधील मिळकतीबाबत जे प्रकरण केल्याचे दाखविले ते गैर, बेकायदेशीर व फ्रॉडुल्ट असल्याचे जाहीर होवून मिळावे. तसेच प्रतिवादी नं.१० यांनी प्रतिवादी नं.९ यांच्या कलम १०१ चे दाव्यावर कारवाईस सहकार्य करु नये व ती मिळकत विक्री करु नये म्हणून त्यांचे विरुध्द निरतस्वा ताकीद हुकुम व्हावा.

सदर दुरुस्तीस संस्थानने संमती देणे आवश्यक राहिल जेणे करुन संस्थान खरेदी करु इच्छिणाऱ्या गट नंबर २९४ चे क्षेत्र २ हे. ९३ आर समता पतसंस्थेची रक्कम रु. ५३,११,०५२/- वर बोजाचे निराकरण होणे आवश्यक राहिल.

**इ)** अर्जदार यांनी दाखल केलेल्या स्पेशल स्पेशल मुकादम्यामध्ये त्यांनी (इ) मध्ये मागणी केल्याप्रमाणे कोर्टाने निकाल दिला किंवा त्यांची आपसात तडजोड झाली तर मा. व्यवस्थापन समिती दि.२४ सप्टेंबर २०११ रोजीच्या सभेत जो निर्णय क्र. ७५९ झाला त्याप्रमाणे संस्थानने जमिन घेणे उचित राहील. तसेच त्यात नमूद केलेल्या शर्ती व अटीनुसार जमिनी खरेदी करण्याची कार्यवाही करण्यता येईल.

**तथापी,**

**इ)** मा. उच्च न्यायायल, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे श्री. राजेंद्र भाऊसाहेब गोंदकर यांनी पी.टी.एल. १८/२०११ दाखल केलेला आहे. त्यामध्ये सिव्हील ॲप्लीकेशन १२०५६/२०१२ वर खालील प्रमाणे दिनांक १६ ऑक्टोबर २०१२ रोजी निर्णय झालेला आहे.

We direct that, without prior permission of this court, the committee.

c) Shall no enter into agreement, contract for purchase of any immovable property on behalf of the Respondent No.2 Trust.;

तत्कालीन व्यवस्थापन समितीच्या दिनांक २४ सप्टेंबर २०११ रोजी उपरोक्त जमिनी प्रती एकर ५५ लाख या दराने खरेदी बाबत निर्णय क्रमांक ७५९ झालेला आहे. याचा अर्थ जमिनी खरेदीचा निर्णय पुर्वीच झालेला आहे.

वर नमुद केलेल्या मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांच्या निर्देशानुसार संस्थानने प्रस्तुत जमिनी विकत घ्यावयाच्या किंवा कसे यांचा निर्णय होणे आवश्यक आहे. जर प्रस्तुत जमिनी विकत घेण्याचा निर्णय झाला तर संस्थानचे वकील श्री.जे.के.गोंदकर यांनी स्पे.मु.नं. ५९/२०१२ मध्ये दाखल करावयाचा मसुदा मान्य होऊन कोर्टामध्ये सादर करणे उचित राहील.

**<u>खालील बाबीवर निर्णय होण्याची विनंती आहे.</u>**

श्री.संग्राम माधवराव देशमुख यांनी स्पे.मु.५९/२०१२ मध्ये जो दुरुस्तीसाठी अर्ज दिलेला आहे त्यास सहमती देणे अथवा न देणे

२) मौजे रुई येथील जमिनमालक श्री.लखीचंद कचरदास भंडारी, सौ.पुष्पाताई लखीचंद भंडारी, श्री.राजेंद्र चंदनमल भनसाळी, श्री.सुभाष चंदनमल भनसाळी हे जमीन मालक व हित संबंधित व्यक्ती वादी श्री.संग्राम माधवराव देशमुख व प्रतिवादी श्री.प्रेम कालीयनदास, कार्यकारी विश्वस्त, दर्यानानी ट्रस्ट, मुंबई चेअरमन, समता नागरी पतसंस्था मर्यादित , कोपरगाव यांची स्पे.मु.नं. ५९/२०१२ मध्ये आपसांत तडजोड झाली किंवा मा.कोर्टाने प्रस्तुत जमिनी संस्थानला खरेदी द्याव्यात असा निर्देश दिला तर सर्व कायदेशीर बाबीची पुर्तता झाल्यावर तत्कालीन व्यवस्थापन समितीच्या दिनांक २४ सप्टेंबर २०११ रोजीच्या सभेतील निर्णय क्रमांक ७५९ प्रमाणे प्रती एकर ५५ लाख (पंचावन्न लाख) या दराने खरेदी करणे किंवा खरेदी न करणे . सदर व्यवहार हा मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे चालू असलेल्या पी.टी.एल. १८/२०११ मधील सिव्हील ॲप्लीकेशन १२०५६/२०१२ मधील दिनांक १६ ऑक्टोबर २०१२ रोजी झालेल्या निकालापुर्वीचा असल्याने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन करुन अनुमती मिळण्यासाठी आवश्यकता नसल्याने त्याप्रमाणे अर्ज न करणे.

**किंवा**

२ अ) मौजे रुई येथील जमीन मालक श्री.लखीचंद कचरदास भंडारी, सौ.पुष्पाताई लखीचंद भंडारी, श्री.राजेंद्र चंदनमल भनसाळी, श्री.सुभाष चंदनमल भनसाळी यांच्या जमीनी मालक व हित संबंधीत व्यक्ती वादी श्री.संग्राम माधवराव देशमुख व प्रतिवादी श्री.प्रेम कालीयनदास, कार्यकारी विश्वस्त, दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांचेकडून स्पे.मु. नं. ५९/२०१२ मध्ये आपसांत तडजोड झाली किंवा ना.कोर्टाने प्रस्तुत जमीनी संस्थानला खरेदी द्याव्यात असा निर्देश दिला तर सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता झाल्यावर तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक २४ सप्टेंबर २०११ रोजीच्या सभेतील निर्णय क्रमांक ७५९ प्रमाणे प्रती एकर ५५ लाख (पंचावन्न लाख) या दराने खरेदी करणे अथवा खरेदी न करणे.

**२ ब)** वर नमुद केलेल्या सर्व बाबींची पुर्तता झाल्यावर मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे चालू असलेल्या पी.आय.एल. १८/२०११ मधील सिव्हील ॲप्लीकेशन १२०५६/२०१२ मधील दिनांक १६ ऑक्टोबर २०१२ मध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे प्रस्तुत जमिनी खरेदीबाबत अनुमती मिळणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन करणे.

सदरहू जमीन खरेदी करणे असा त्रिसदसीय समितीचे सभेत निर्णय झाल्यास वरील २ ब नुसार कार्यवाही करणे योग्य होईल तसेच श्री. संग्राम देशमुख यांनी दाखल केलेल्या दाव्या संदर्भात संस्थानने कैफीयत देणेस हरकत नाही, असे मत आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांना सोयी-सुविधा पुरविणेसाठी प्रस्तावित जमिनीची संस्थानला आवश्यकता असून जर सर्व पक्षकार एकत्रितपणे मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठासमोर संस्थानला जमीन देणेकामी लेखी देत असतील तर तसा प्रस्ताव मा.खंडपीठासमोर सादर करता येईल. मात्र तत्पुर्वी याकामी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थानचे वतीने काम पहाणारे ॲड.चौकीदार यांचा सल्ला घेण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१०** **श्री साईबाबा मल्टीमिडीया थिम पार्क प्रकल्पांतर्गत लेझर शो व त्यासाठी आवश्यक सिव्हील वर्कचे कामांबाबत.**

**निर्णय क्र.९०** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.११** **श्रीरामनवमी उत्सव २०१४ तसेच उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूदः** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट - कलम (१) च्या खंड (ख) अन्वये "रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये "भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावनाः-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेतर्फे प्रतीवर्षा प्रमाणे याही वर्षी दि. ०७ एप्रिल, २०१४ ते दि. ०९ एप्रिल, २०१४ अखेर "श्रीं" चा श्रीरामनवमी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीमध्ये साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होत असते. त्यामुळे उन्हापासून साईभक्तांचे संरक्षण व्हावे याकरीता मंदिर परिसर, भक्तनिवासस्थान (५०० रुम) परिसर, श्री साईनाथ रुग्णालय परिसर, व जुने प्रसादालय परिसर या ठिकाणी तसेच मुंबई येथून पायी पालखी घेवून येणारे साईभक्त यांचे सोयीसाठी खर्डी गोलभान, कसारा बायपास, लतिफवाडी, घोटी, सिन्नर, खोपडी, पांगरी, वावी, पाथरे, पोहेगांव, दुशिंगवाडी, मलढोनफाटा, झगडेफाटा व निमगांव-कोऱ्हाळे येथे कापडी/ शामियाना मंडप, कनात, बिछायत व विद्युत व्यवस्थेसह तात्पुरते स्वरुपात उभारणी करणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**(अ) श्री रामनवमी उत्सव २०१४ करीता करावयाची मंडप व्यवस्थाः-**

**अ (१) समाधी मंदिर, जुने प्रसादालय, साईबाबा भक्तनिवासस्थान, साईनगर इ. परिसरात करावयाचे मंडप, स्टेज, पार्टीशन, बॅरेकेटींग व दर्शन रांगेकरीता कनात इ. व्यवस्था.**

(कालावधी दि.०७/०४/२०१४ ते ०९/०४/२०१४)

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | अंदाजे परिमाण/ एकक |
|---|---|---|
| ०१. | मंगल कार्यालय, तसेच पालखी स्वागतासाठी नगरपंचायत व पोलिस स्टेशन जवळ शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह उभारणे. तसेच कुस्ती ग्राउंडवर शामियाना मंडप उभारणे | ८२२० चौ. फुट |
| ०२. | साईनगर मैदानावर कलाकारांचे कार्यक्रमासाठी ३०'x२०' साईजचे स्टेज व इतर व्यवस्था करणे. | ६०० चौ.फुट |
| ०३. | मंदिर परिसरामध्ये सभाकुंड येथे किर्तनासाठी १६'x२४' साईजचे स्टेज व इतर व्यवस्था करणे. | ३८४ चौ.फुट |
| ०४. | दर्शन व भोजन व्यवस्थेसाठी बॅरेकेटींग व्यवस्था | १५०० र.फुट |
| **अ (१) मधिल कामांकरीता येणारा अपेक्षित अंदाजे खर्च रु.** | | १,१०,५७७/- |

**अ (२) मुंबई येथून पायी पालखी घेवून येणारे साईभक्त यांचे सोयीसाठी कापडी/ शामियाना मंडप, कनात, बिछायत तसेच विद्युत व्यवस्थेसह व्यवस्था.**

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल. | परिमाण / एकक | कालावधी |
|---|---|---|---|
| ०१. | मुंबई ते शिर्डी मार्गावर खर्डी गोलभान, कसारा बायपास, लतिफवाडी व घोटी येथे कापडी मंडप, कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवस्थेसह | ३१,६०० चौ. फुट | दि.०१/०४/२०१४ ते ०५/०४/२०१४ अखेर ०५ दिवस |
| ०२. | मुंबई ते शिर्डी मार्गावर सिन्नर, खोपडी, पांगरी व वावी येथे शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवस्थेसह | ७६,६५१. चौ. फुट | दि.०२/०४/२०१४ ते ०६/०४/२०१४ अखेर ०५ दिवस |
| ०३. | मुंबई ते शिर्डी मार्गावर पाथरे व पोहेगांव, दुशिंगवाडी, मलढोनफाटा, झगडेफाटा व निमगांव-कोऱ्हाळे येथे शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवस्थेसह | ३२७३० चौ. फुट | दि. ०२/०४/२०१४ ते ०६/०४/२०१४ अखेर ०५ दिवस |
| **अ (२) मधिल कामांकरीता येणारा अपेक्षित अंदाजे खर्च रु.** | | | ६,५०,८९७/- |
| **श्री रामनवमी उत्सवाकरीता करावयाचे मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्थेसाठी येणारा एकूण अपेक्षित अंदाजे खर्च (अ) रु.** | | | ७,६१,४७४/- |

**(ब) उन्हाळया चे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी करावयाची मंडप व्यवस्था.**

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | अंदाजे परिमाण / एकक | कालावधी |
|---|---|---|---|
| ०१. | **ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (एम.एस पाईप व कैच्यांचे स्ट्रक्चर असलेले) उभारणे:-** मंदिर परिसरामध्ये समाधी मंदिर उत्तर बाजू सभाकुंड तसेच साई कॉम्प्लेक्स समोरील मोकळ्या जागेत (१६ आर ) | २४,६०० चौ.फुट | दि.०१/०३/२०१४ ते १५/०६/२०१४ अखेर १०७ दिवस |
| ०२. | **ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले) उभारणे:-** समाधि मंदिर दक्षिण बाजू, गुरुस्थान मंदिर, श्रीं चे चावडी समोर, नंदादीप मागील बाजू, दर्शनव्दार ते शनिमंदिर गेट, शनि, महादेव, श्री गणेश मंदिर समोर, समाधी मंदिर उत्तरे कडील मंडप ते कॅलेंडर विक्री स्टॉलपर्यंत, श्री मारुती मंदिर ते शाम सुंदर हॉल पर्यंत, गेट नं. ३ ते श्री मारुती मंदिर, गेट नं. ४ चे बाहेरील बाजूने, उदी काउंटर समोर, दिनदर्शिका विक्री केंद्रासमोर, पिंपळवाडी रस्त्यावर नगर मनमाड रस्ता व पिपळवाडी रस्त्याचे फुटपाथवर, दर्शन लाईन प्रवेशव्दार पूर्व व पश्चिम बाजू, लाडू कांऊटर समोर श्री साई प्रसाद निवासस्थान कार्यालया समोर, श्री साई प्रसादालय प्रवेशव्दार ते तिकीट काऊंटरपर्यंत व श्री साईबाबांचे शिल्पापर्यंत, इ. भागात ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणे | ५८,५०० चौ. फुट | |
| ०३. | जुने प्रसादालय, परिसरामध्ये शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह उभारणे | ८५०० चौ.फुट | |
| **उन्हाळयाचे कालावधीत करावयाचे मंडप व्यवस्थेसाठी येणारा अपेक्षित अंदाजे खर्च (ब) रु.** | | | २६,७३,०७३/- |

उपरोक्तप्रमाणे श्रीरामनवमी उत्सव व मुंबई येथून पायी पालखी घेवून येणारे साईभक्त यांचे सोयीसाठी कापडी शामीयाना मंडप कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज, दर्शन व भोजन व्यवस्थेसाठी बॅरेकडींग व्यवस्था इ. अनुषंगीक व्यवस्थेसाठी रु.७.६१ लक्ष तसेच उन्हाळ्यासाठी उभारावयाचे मंडप व्यवस्थेसाठी रु.२६.७३ लक्ष असा एकूण रु.३४.३४ लक्ष मात्र खर्च अपेक्षीत आहे. उपरोक्त श्री रामनवमी उत्सव २०१४ तसेच उन्हाळ्याचे कालावधी करीता साईभक्तांचे सोयी सुविधेसाठी मंडप उभारणीसह इतर अनुषंगीक सुविधा पुरविणेकामी सिलबंद निविदा मागविणेकामी वर्तमान पत्रात व संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा मागविता येतील. उत्सवानिमित्त उभारणेत येणारे डेकोरेशनकरीता बांबु व गोल्टे भाडेतत्वावर घेणेकामी अंदाजे रु.२५,०००/- मात्र खर्च तसेच मंदिर परिसरात आवश्यक ठिकाणी रंगकाम करणेकामी रु.१०,०००/- मात्रचा खर्च असा एकूण रु.३४.६९ लक्ष मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी वरीलप्रमाणे मंडप व इतर व्यवस्था करुन घेणेकामी येणारे एकूण रु.३४.६९ लक्ष मात्रचे खर्चास व या कामासाठी वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर निविदा सूचना प्रसिध्द करुन सिलबंद निविदा मागविणेसाठी मा.त्रीसदस्य समितीचे सभेपुढे मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, याकामी प्राप्त होणाऱ्या निविदा मा.कार्यकारी अधिकारी यांचे उपस्थितीत पुढील उपसमिती सभेमोर उघडणेत येऊन, निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१२** **मंदिर परिसरातील कापडकोठी विक्री काऊंटर रुमचे इंटेरिअर व फर्निचर कामाबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधींचा विनियोग करण्याची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय :-** दि. १८/०२/२०१२ रोजी झालेल्या मा. त्रिसदस्य समितीचे सभेत मंदिर परिसरातील कापडकोठी विक्री काऊंटर रुमचे इंटेरीअर फर्निचर काम करणेकरीता येणारे अंदाजे रु. ४,६२,१२१/- मात्रचे खर्चास व याकामी विहित पध्दतीने निविदा मागविणेस नि. क्र. ५७८ अन्वये मान्यता देण्यात आली.

**प्रस्तावना:-** उपरोक्तप्रमाणे काम करणेसाठी इकडील जा. नं. २४२३ दि. ३१/०८/२०१२ चे पत्रान्वये एकूण १० ठेकेदारांकडून कोटेशन मागविणेत आले होते. त्यानुसार विहित मुदतीत फक्त दोन सिलबंद कोटेशन प्राप्त झाले. त्यानंतर इकडील दि. ०८/११/२०१२ चे टिपणी अन्वये कोटेशन मागविणेकरीता जाहिरात प्रसिध्द करणेस मान्यता देणेत आली. वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द केल्यानंतर विहित मुदतीत फक्त एकच सिलबंद कोटेशन प्राप्त झाले. अशाप्रकारे प्राप्त झालेले एकूण तिन सिलबंद कोटेशन मा. त्रिसदस्य समितीचे दि. २६/०२/२०१३ चे सभेत उघडणेत येवून नि. क्र. १२६ अन्वये " सदर कामासाठी इंटेरीअर डिझाईनरकडून सुधारीत डिझाईन तयार करुन घ्यावे व त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन नव्याने निविदा मागविणेत याव्यात तसेच प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा रद्द करणेत येवून त्या निविदा संबंधीतांना परत करणेत याव्यात" असे ठरले.

याबाबत कोपरगांव येथिल आर्किटेक्ट श्री रविकिरण डाके, (मे. वास्तुरचना, आर्किटेक्टस् अँण्ड इंटेरीअर डिझायनर्स) यांचेशी चर्चा करुन त्यांना सदर कामासाठी सेवा देणेबाबत विनंती केली असता, त्यांनी कामाची प्रत्यक्ष पाहणी करुन सविस्तर प्लॅन तयार करुन रक्कम रु.९,८५,६२०/- मात्र खर्चाचे अंदाजपत्रक दिले आहे.

**प्रस्ताव:-** उपरोक्तप्रमाणे आर्किटेक्ट रविकीरण डाके, कोपरगांव यांचेकडून प्राप्त झालेल्या अंदाजपत्रक व प्लॅन नुसार कापडकोठी विक्री काऊंटर रुमचे इंटेरीअर व फर्निचरचे काम करणेकामी अंदाजे रक्कम रु. ९,८५,६२०/- मात्र खर्च येणार आहे. सदरहू कामाकरीता कोरे निविदा फॉर्म व सविस्तर प्लॅन आर्किटेक्ट यांचेकडून तयार करुन घेता येईल.

तरी वर नमूद कापड विक्री काऊंटर रुमचे इंटेरीअर कामास व त्यासाठी येणारे रु. ९,८५,६२०/- मात्रचे खर्चास तसेच याकामी वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे निविदा मागविणेकामी सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१३** **संस्थानचे सर्व्हे नं.१२४ पैकी मधील भांडार इमारतीचे बाजूने असलेले संरक्षक भिंतीची उंची वाढविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**प्रस्ताविक:** संस्थानचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १२४ पैकी मधील जागेत भांडार इमारतीचे बांधकाम करणेत आलेले आहे. सदरहू इमारतीचे पश्चिम बाजूने संरक्षक भिंतीचे सरासरी ५' उंचीपर्यन्त बांधकाम करुन त्यावर २' उंचीचे तार कम्पांउंड करणेत आलेले आहे. सदरहू कंपाउंड भिंतीचे पश्चिमेकडील बाजूने रहिवाश्यांनी भिंतीलगत घरांचे बांधकाम केल्याने बाहेरील बाजुने कंपांउंडची उंची कमी झाली आहे. त्यामुळे या परिसरात कंपाउंडचे आतील बाजूस कचरा टाकणे, अनधिकृतपणे प्रवेश करणे अशा प्रकारच्या घटना टाळणे तसेच संरक्षणाचे दृष्टीने सदरहू संरक्षक भिंतीची उंची वाढविणे आवश्यक आहे तसेच पूर्व व दक्षिण बाजूने असलेले सरंक्षक भिंतीची उंची वाढविणेही सुरक्षीततेच्या दृष्टीने उचित राहील असे मत आहे. करीता सध्याचे कंपाउंड भिंतीवर ३' उंचीचे बांधकाम करुन त्यावर सध्याचे २' उंचीचे तार कम्पांउंड बसवून घेता येईल. सदरचे ९२५' लांबीचे भिंतीवर वाढीव ३' उंचीचे नविन बांधकाम व इतर अनुषंगिक कामासाठी तयार करणेत आलेले अंदाजपत्रकानुसार रुपये ९,७६,३५९/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

**विभागाचा अभिप्राय:** सुरक्षीततेच्या दृष्टीने मध्यवर्ती भांडार इमारतीचे पश्चिम बाजूने असलेले सरंक्षक भिंतीची उंची वाढविणे आवश्यक आहे तसेच पूर्व व दक्षिण बाजूने असलेले सरंक्षक भिंतीची ३' उंची वाढविणेही सुरक्षीततेच्या दृष्टीने उचित राहील असे मत आहे.

तरी विषयांकीत कामासाठी येणारे अंदाजे रुपये ९,७६,३५९/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून करून घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे सर्व्हे नं.१२४ पैकी मधील भांडार इमारतीचे बाजूने असलेले संरक्षक भिंतीची उंची वाढविणेकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९,७६,३५९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१४** **मंदिर परिसराचे पुर्वेकडील साई कॉम्प्लेक्स इमारतीतील दुसऱ्या मजल्यावरील ऑडीटोरीयम करीता ॲकॉस्टीक ट्रिटमेंट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील (१) च्या खंड (क) अन्वये *"मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधीचा विनियोग करण्याची तरतूद आहे. "*

**प्रस्तावना :-** शिर्डी नगरपंचायत यांनी मंदिर परिसराचे पूर्वेस असलेल्या साई कॉम्पलेक्स इमारतीतील दुसऱ्या मजल्यावरील हॉल (ऑडिटोरीअम) संस्थानचे ताब्यात दिलेला आहे. सदर हॉलचा सेमीनार, व्याख्याने इ.साठी चांगला वापर होऊ शकतो. मा. कार्यकारी अधिकारी यांनी सदर ठिकाणी ॲकॉस्टीक ट्रिटमेंट करण्याच्या सूचना केलेल्या आहेत.

साई कॉम्पलेक्स मधील दुकानगाळे, ऑडिटोरीयम व दर्शनरांगांबाबत महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एमयुएन ११०८/५२९/प्र.क्र.९९/नवि-१७, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२, दि.०१/०८/२००९, मध्ये खालिलप्रमाणे नमूद करण्यात आलेला आहे.

"२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी आरक्षण क्र. ०८ येथे जिल्हा परिषद शाळेचे बांधकाम करुन दिल्यामुळे श्री साईबाबा संस्थान यांना श्री साईबाबा मंदिराचे पूर्व बाजूस असलेली नगरपंचायतीच्या मालकीची ५ आर जागा तसेच आरक्षण क्र.०९ येथील बांधकामापैकी दि.२०/०९/२००८ च्या विशेष सभेत निश्चित केल्याप्रमाणे तळमजल्यावरील ८४.७६ चौ.मीटर व दुसऱ्या मजल्यावरील ५६७.१८ चौ.मीटर बांधकाम रु.१/- या नाममात्र वार्षिक भाड्याने कायमस्वरुपी भाडेतत्वावर देण्यास व दुसऱ्या मजल्यावरील दर्शन रांगेचा कायमस्वरुपी नि :शुल्क वापर करण्यास मान्यता देण्यात येत आहे".

उपरोक्त निर्णयान्वये, शिर्डी नगरपंचायत यांचेशी वार्षिक भाडेपट्टा करारनामा होणे गरजेचे आहे. सदर करारनामा अद्याप झालेला नाही.

**प्रस्ताव:-** याकामी इकडील विभागामार्फत पाहणी करुन प्रत्यक्ष साईटवरील मोजमापानुसार प्लॅन तयार करण्यात आला आहे. सदरहू प्लॅन सल्लागार श्री. व्ही.एन. पुरंदरे ॲण्ड असो., पुणे यांना ई-मेल करण्यात आला होता. श्री. विजय पुरंदरे यांचेकडून संस्थानमार्फत बांधण्यात आलेल्या जि.प. प्राथ. शाळेचे ॲकॉस्टीकचे कामासाठी यापुर्वी सल्लासेवा घेण्यात आली होती.

वर नमूद ॲकॉस्टीकचे कामासाठी श्री. विजय पुरंदरे यांनी ढोबळ अंदाजानुसार जास्तीत जास्त रु.१५.०० लक्ष मात्र इतका खर्च कळविला आहे. सदर हॉलचे ॲकॉस्टीक्स् करणेकामी श्री. विजय पुरंदरे, पुणे यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करता येईल असे मत आहे.

**विभगाचा अभिप्राय/ मत:-** मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी पी.आय.एल. नं.१८/२०११ मधिल सिव्हिल ॲप्लीकेशन नं.१२०५६/२०१२ वर दि.१६/१०/२०१२ रोजी दिलेल्या आदेशानुसार सदरहू प्रकल्प हा मोठ्या खर्चाचा असल्याने त्यासाठी प्रथम मा.त्रीसदस्य समितीची मान्यता घेऊन मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची परवानगी घेणे आवश्यक आहे.

तरी वरील विषयांकीत कामासाठी प्राथमिक अंदाजानुसार रु.१५.०० लक्ष मात्रचे खर्चास तसेच सदर ॲकॉस्टीकचे कामासाठी श्री. व्ही.एन. पुरंदरे ॲण्ड असो., पुणे यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करणेकामी निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसराचे पुर्वेकडील साई कॉम्प्लेक्स इमारतीतील दुसऱ्या मजल्यावरील ऑडीटोरीयम करीता ॲकॉस्टीक ट्रिटमेंट करणेकामी श्री. व्ही.एन. पुरंदरे ॲण्ड असो., पुणे यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच, याकामी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, निविदांची मागणी करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१५** **संस्थानचे नियोजित साईगार्डन प्रकल्पाअंतर्गत लेजर शो उभारणी कामाचे ठेकेदार मे.लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचे बीलांबाबत.**

**निर्णय क्र.९५** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख )

---

**विषय नं.१६** **संस्थानचे नियोजित साईगार्डन प्रकल्पाअंतर्गत लेजर शो उभारणी कामाचे ठेकेदार मे.लेजर व्हिजन., हॉंगकॉंग यांचे संदर्भात ऑस्ट्रेलियन ट्रेड कमिशन यांनी पाठविलेल्या पत्राबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुद: अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

प्रस्ताव: मौजे निमागांव कोऱ्हाळे संस्थानचे गट नं. १९८,१९९, २०० व २०१ मध्ये मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १७/०२/२००७ रोजीचे सभेत साईगार्डन करण्याचे ठरले आहे. सदर प्रकल्पातंर्गत श्री साईबाबांच्या जिवनावर अधारीत मल्टीमिडीया थिम पार्क करण्याचे ठरविण्यात आले आहे.

सदर मल्टीमिडीया थिमपार्क करीता अंतराष्ट्रीय स्तरावर जाहिरात देऊन निविदा मागविणेत आल्या होत्या. त्यानुसार मा. व्यवस्थापन समीतीचे दि. ०५/१२/२०१० राजीचे सभेतील नि. क्रं. ९७४ नुसार ठेकेदार लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांना US$ ५५,००,००० मात्रचा कार्यादेश देणेत आला.

Laser Vision यांचे प्रतिनीधींनी मा. उपसमीती सभेचे दि. ०४/०३/२०१२ रोजीचे सभेपुढे कथानकांचे सादरीकरण केले. लेजर व्हिजन लि., यांनी मा.विश्वस्तांनी दिलेल्या सूचनांप्रमाणे कथानकामधे व लेजर शोच्या प्रतिमांमधे बदल करुन पुन:श्च प्रत्येक कक्षानकाचे सविस्तर व वर्णनानुसार सादरीकरण केले. तद्नंतर लेजर व्हिजनने कथानक तयार करुन त्यानुसार प्रत्यक्ष कलाकारांचे चित्रीकरण करणे, Computer Graphic Creation व Digital Sequencing करुन लेजर शो पूर्ण करणेस सूचना देणेत आल्या. कार्यादेर्शानुसार लेजर व्हिजन यांना पुढील टप्प्यांची रक्कम विहित पध्दतीने अदा करण्यात यावी असे ठरले.

त्याप्रमाणे Laser Vision यांना Payment Stages ०१ ते ०४ व ०७ ते ०८ पोटी US$ २१,४५,००० अदा करणेत आलेले आहे. Laser Vision Ltd., Hong Kong यांनी त्यांचे दि.०५/११/२०१२, दि.१७/१२/२०१२ व दि.२६/०२/२०१३ अन्वये करारनाम्यातील Payment Schedule नुसार US$ १५,४०,००० ची बिले सादर केली आहेत.

उपरोक्त बिलाबाबत आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असोशिएटस्, नवी दिल्ली यांनी जा.क्र.A-५२३/११-१२/UK/२९, दि.३०/०१/२०१३ रोजीचे पत्राद्वारे अभिप्राय सादर केलेला आहे. आर्किटेक्ट यांचे अभिप्रायानुसार बिले अदा करणेबाबत मा. त्रिसदस्य समितीचे दि.०७/०२/२०१३ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्रमांक ११० झालेला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, करारनाम्यातील शर्त क्र.१७/१ नुसार, साई गार्डन प्रकल्पाच्या बांधकामास होणाऱ्या संभाव्य विलंबाबाबत मे. लेजर व्हिजन लि. हॉंगकॉंग यांना त्यांचे देयक तुर्त स्थगीत ठेवणेत आलेले आहे व त्यांचेमार्फत लेजर शो चे प्रकल्पावर होत असलेले सर्व कामही तुर्तास थांबवावे, असे संस्थानतर्फे विनंती पत्राद्वारे कळविण्यात यावे तसेच आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असोशिएटस्, नवी दिल्ली यांच्या अभिप्रायानुसार मे.लेजर व्हीजन लि., हॉंगकॉंग यांना तुर्तास रक्कम आदा करणेत येऊ नये व सदरची कार्यवाही करणेपुर्वी मा. औरगाबाद खंडपीठात संस्थानच्या वतीने काम पहाणारे ॲड. चौकीदार यांचा सल्ला घेण्यात यावा, असे ठरले."

उपरोक्त निर्णयानुसार मे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांना इकडील जा.नं.५५६६/२०१३ दि.०७/०३/२०१३ रोजीचे पत्राने तुर्तास पेमेंट स्थगीत ठेवण्यात आल्याचे व प्रकल्पावर त्यांचेमार्फत होत असलेले काम स्थगीत ठेवणेबाबत कळविले आहे. तसेच सदरहू प्रकरणी ॲड. चौकीदार यांना इकडील जा. नं. ५८२३/२०१३ दि. २०/०३/२०१३ रोजी पत्र देण्यात आले. तसेच वेळोवेळी संपर्क करण्यात आला.

तद्नंतर, Australian Consulate General, Mumbai, India यांनी त्यांचेकडील दिनांक १३ जून, २०१३ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, मे. लेजर व्हिजन मेगामिडीया लि., हाँगकाँग यांचेमार्फत आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असोशिएटस्, नवि दिल्ली यांचे सही व शिक्यासह Complete Design Phase Documents सादर केले आहेत.

Australian Consulate General, Mumbai, India यांचे वरील पत्रानुसार Complete Design Phase Deliverables संस्थानकडे प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार ठेकेदार मे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचेशी केलेल्या करारनाम्यानुसार त्यांनी Payment ०५ व Payment ०६ च्या टप्पें पूर्ण केलेले आहेत.

वरील विषयाबाबत अपर मुख्य सचिव व मुख्य राज शिष्टाचार अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील दिनांक २४/१०/२०१३ रोजीच्या पत्राने मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अग्रेषित केलेल्या पत्रामध्ये लेजर व्हिजन लि., हॅागकाँग यांचेमार्फत करणेत येणाऱ्या श्री साईबाबा मल्टीमिडीया थिमपार्क प्रकल्पातंर्गत उभारण्यात येणाऱ्या लेजर शो बाबत नमूद केले असून, याकामी ठेकेदार मे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांना देय्य बिलांबाबत आपले स्तरावर मा. उच्च न्यायालयाची परवनगी मिळणेकामी सहकार्य करावे असे नमूद केले आहे.

मा. कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक सांसवि-२०१३/ सं. क्र.. ५३७/ का- १६, दिनांक ०२ नोव्हेंबर, २०१३ रोजीचे पत्रान्वये विषयांकीत प्रकरणी ठेकेदार लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचे बिलाबाबत खुलासा सादर करणेस कळविले आहे. त्यानुसार संस्थानचे जा. क्र. ३५५१/२०१३ दिनांक ०६ नोव्हेंबर, २०१३ अन्वये त्यांना प्रस्तुत प्रकरणी खुलासा सादर करणेत आला असून, मा. त्रिसदस्य समितीचे निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे कळविणेत आले आहे.

प्रस्तुत प्रकरणी संस्थान ॲड. संजय चौकीदार यांनी त्यांचे दिनांक ०९ नोव्हेंबर, २०१३ रोजीचे e-mail अन्वये मा. शासनास सादर करावयाचे पत्राचा मसुदा सादर केला आहे. परंतू याबाबत मा. शासनास दिनांक ०६ नोव्हेंबर, २०१३ रोजीचे पत्राने खुलासा सादर करणेत आलेला आहे.

विभागाचा अभिप्रायः ठेकेदार मे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचे प्रलंबीत असलेले बिलांबाबत करणेत येत असलेल्या कार्यवाही विषयी त्यांना ॲड. चौकीदार यांचे अभिप्रायानुसार सोबतचे प्रमाणे पत्र देऊन माहिती देता येईल असे मत आहे.

तरी याबाबत वर नमूद शासनाचे पत्र व ऑस्ट्रेलीयन ट्रेड कमिशन यांचेकडील पत्र व मे. लेजर व्हिजन यांना संस्थानकडून द्यावयाच्या पत्राचा ॲड. चौकीदार यांनी दिलेल्या मसुद्यास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांना संस्थानकडून द्यावयाच्या पत्राचा अंतीम मसुदा मा.औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थानचे वतीने काम पहाणारे ॲड. चौकीदार यांचेकडून तयार करुन घेण्यात येऊन, त्यावर मा.अध्यक्ष महोदय यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे व त्यानंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख/विधी अधिकारी)

---

**विषय नं.१७** **श्री साईनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिर्डी यांना शाळेत स्वयंपाकगृह बांधणेकामी नाहरकत प्रमाणपत्र देणेबाबत.**

**निर्णय क्र.९७** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१८** **साईकॉम्प्लेक्स इमारतीतील देणगी कार्यालयाचे इंटेरिअर काम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतूदः-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधींचा विनियोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावनाः-** शिर्डी येथे "श्रींचे" दर्शनासाठी देश विदेशातून येणाऱ्या साई भक्तांच्या संख्येत दिवसेंदिवस मोठया प्रमाणात वाढ होत आहे. शिर्डी येथे येणारे साईभक्त "श्रींना" सोने, चांदी, पैसे मौल्यवान वस्तू देणगी म्हणून अर्पन करतात तसेच रोख स्वरुपात देणगी देतात. संस्थानमार्फत मंदिर परिसरात दोन ठिकाणी देणगी काऊंटर सुरु आहे. श्री साईभक्तांना गर्दीच्या काळामध्ये देणगी देणेसाठी मंदिर परिसरात न येता बाहेर देणगी देता यावी या हेतूने साई कॉम्पलेक्स इमारतीमध्ये देणगी स्विकारणेसाठी एक संगणकीय

काऊंटरवर सुविधा उपलब्ध केलेली आहे. साई कॉम्पलेक्स येथे बाहेरील व्यक्तींची मोठया प्रमाणात वर्दळ असते तसेच शेजारी खाजगी गाळाधारक असल्याने त्यांच्या गाळयातील साऊंड मोठया आवाजात करुन तेथील शांतता भंग करत असतात. त्यामुळे देणगीदार भक्त काय बोलतो आहे हे बऱ्याचवेळा स्पष्ट कळत नाही. सदरहू गाळा तिनही बाजूने मोकळा असल्याने भक्त देत असलेल्या पैशावर पाकिटमार व इतर गुन्हेगार नजर ठेवून असतात. मुख्य लेखाधिकारी यांनी संदर्भिय पत्रान्वये साई कॉम्पलेक्स येथील देणगी काऊंटर पूर्ण बंदिस्त कॅबीन तयार करुन देणगी स्विकारणेसाठी आकर्षक काऊंटर बनवून मिळणेबाबत कळविले आहे.

**प्रस्तावः-** साई कॉम्पलेक्स येथील देणगी काऊंटरला सुरक्षेच्या व शांततेच्या दृष्टीने बंदिस्त व आकर्षक करणेकामी इंटेरीअर डिझाईनर आर्किटेक्ट रविकिरण डाके, मे. वास्तुरचना, कोपरगांव व लेखाधिकारी श्री. अशोक औटी यांनी समक्ष पाहणी केली. आर्किटेक्ट रविकिरण डाके, यांनी देणगी काऊंटर व फर्निचर कामाचे सविस्तर प्लॅन व रक्कम रु. ६,३०,८८३/- मात्र खर्चाचे अंदाजपत्रक दिलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय/ मतः-** वरीलप्रमाणे साई कॉम्पलेक्स येथील देणगी कार्यालयाचे इंटेरीअर फर्निचरचे काम करणेकामी आर्किटेक्ट रविकिरण डाके, कोपरगांव यांचेकडून Lum-Sum आर्किटेक्ट फि देऊन कोरे निविदा फॉर्म व सविस्तर प्लॅन तयार करुन घेता येईल. तरी याप्रमाणे त्यांची सेवा घेणेस, तसेच वर नमूद कामासाठी अपेक्षित रु.६,३०,८८३/- मात्रचे अंदाजे खर्चास व सदर कामासाठी वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे निविदा मागविणेकामी सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.९८ **साईकॉम्प्लेक्स इमारतीतील देणगी कार्यालयाचे इंटेरिअर काम करणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदांची मागणी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६,३०,८८३/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.१९ **श्री साईनाथ रुग्णालयातील अतिदक्षता विभागाचे विस्तारीकरण व बेडचे संख्येत वाढ करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयात यापुर्वी ०४ खाटांचा अतिदक्षता वार्ड कार्यान्वीत होता. रुग्णालयात येणा-या हदय विकारासारखा अत्यवस्त रुग्णांचे वाढते प्रमाण व होत असलेली गैरसोय लक्षात घेऊन, सदर वार्डचे विस्तारीकरण करुन, खाटांच्या संख्येत वाढ करणेत आली आहे. सध्या रुग्णालयात ०८/०९ खाटांचा अतिदक्षता वार्ड रुग्णसेवेसाठी उपलब्ध आहे. तरी देखील रुग्णालयात येणा-या रुग्णांच्या संख्येपेक्षा उपलब्ध खाटा कमी असल्याने, आजही खाटांअभावी काही वेळेस रुग्णांची गैरसोय होत आहे. त्यासाठी अतिदक्षता वार्डमध्ये वाढ करुन, खाटांच्या संख्येतही वाढ करणे आवश्यक आहे. परंतू त्यासाठी रुग्णालयात आवश्यक तेवढी जागा उपलब्ध नसल्याने पर्यायी जागा उपलब्ध करुन, सदर वार्डमध्ये वाढ करता येईल, असे मत आहे.

याबाबत मा. श्री. ज. द. कुळकर्णी, अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, यांनी रुग्णालयातील अतिदक्षता वार्डमध्ये खांटाअभावी रुग्णांची होत असलेली गैरसोय लक्षात घेता, श्री साईनाथ रुग्णालयाकरीता रुग्णालय परिसरात असलेल्या कॅन्टीनची जागा अतिशय मोठी असून, सदर ठिकाणी रुग्णांच्या नातेवाईकांना जमीनीवर बसून जेवण वाढण्यात येते. वास्तविक पाहता रुग्णांना संस्थान तर्फे मोफत व जागेवर जेवण देण्यात येते. रुग्णांचे नातेवाईक प्रसादालयात जाऊन, जेवण घेऊ शकतात. त्यामुळे ही कॅन्टीनची जागा उपलब्ध झाल्यास तेथे प्रशस्त अशा स्वरुपाचा अतिदक्षता वार्ड होऊ शकतो व रुग्णांच्या नातेवाईक व साईभक्तांची चहापाण्याची सोय/ व्यवस्था दुस-या जागेत करता येईल. असे सुचित केले आहे. त्याप्रमाणे तेथे आवश्यक त्या सुधारणा करुन, सदर विभाग सुरु करता येईल.

**<u>अभिप्राय/स्पष्ट मत</u>**:- अतिदक्षता विभाग सुरु केल्यास त्याठिकाणी रुग्णसेवेसाठी २४ तास आर.एम.ओ. डॉक्टर आवश्यक असतात. सध्या रुग्णालयात केवळ ७ आर.एम.ओ. डॉक्टर उपलब्ध आहेत. त्यांचेवर अपघात विभाग, अतिदक्षता विभाग, मोबाईल वैद्यकीय सेवा, प्रथमोपचार केंद्र इ. सेवा अवलंबून आहेत. त्यामुळे अतिदक्षता विभागात सध्या आर.एम.ओ. डॉक्टर उपलब्ध करता येत नाही. त्यामुळे तेथील रुग्णसेवेवर सध्याही विपरीत परिणाम होत आहे. नवीन आर.एम.ओ. मिळत नसलेने सध्याच्या बहुतेक वैद्यकीय सेवा विस्कळीत आहेत.

तसेच साईनाथ रुग्णालयात अनेक वर्षापासून केवळ एकच फिजिशियन आहे. त्यांचेवरच संपूर्ण मेडिसीन विभाग अवलंबून आहे.

नवीन ICCU विभाग सुरु केल्यास रुग्णांची सोय होईल, परंतू फिजिशियन व आर.एम.ओ. डॉक्टरांअभावी रुग्णांकडे दुर्लक्ष, होण्याची शक्यता आहे. त्यामुळे फिजिशियन व आर.एम.ओ. डॉक्टर यांच्या आवश्यक उपलब्धतेनंतरच असा विभाग सुरु करावा, असे मत आहे.

तरी सदरच्या प्रस्तावावर चर्चा होऊन, निर्णयास्तव सविनय सादर.

निर्णय क्र.९९ **सदरहू प्रस्तावाबाबत उपरोक्त विषय नं.०५ निर्णय क्र.८५ मध्ये चर्चा झालेली असून त्याप्रमाणे कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२०** **जीवनदायी योजनेअंतर्गत शस्त्रक्रियांसाठी वापरण्यात येणाऱ्या साधणसामुग्रींचे ओरीजीनल टॅक्स इन्व्हाईसेस उपलब्ध होऊ शकत नसलेल्या शस्त्रक्रियांच्या बीलांमधून टॅक्स इन्व्हाईसेस पोटी रक्कम कपात करणेस मान्यता देण्यात येऊन बीले सादर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** जीवनदायी आरोग्य योजने अंतर्गत, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये करण्यात आलेल्या हृदय शस्त्रक्रियांच्या बिलांसोबत, शस्त्रक्रियांसाठी वापरण्यात येणारे Balloons, Octopus, Oxygenators या साधन सामुग्रीचे (कन्झुमेबल्स्, डिस्पोजिबल्स्) चे ओरिजनल टॅक्स इनव्हॉईसेस् बिलांसोबत जोडुन देण्याबाबत, मा.उपसंचालक, आरोग्य, नाशिक, यांच्या कार्यालयाकडुन, मागील सुमारे २ वर्षांपासुन सतत मागणी करण्यात येत असून, सन, २००७-०८ ते आजतागायत सादर करण्यात आलेल्या, परंतु अद्याप प्रलंबित असलेल्या व हॉस्पिटलकडुन सादर करणे बाकी असलेल्या बिलांसोबत टॅक्स इनव्हॉइसेस् जोडुन देण्याची खालील कारणांमुळे पुर्तता करता येवु शकलेली नाही.

**१.** शस्त्रक्रियांसाठी वापरण्यात येणारे Balloons, Octopus ही साधन सामुग्री निर्जंतुकीकरण (ETO) करून एकापेक्षा जास्त, साधारण ५/६ किंवा क्वचित प्रसंगी अधिक रूग्णांच्या शस्त्रक्रियांसाठी वापरण्यात येत असते, परंतु, अशा वस्तुंचा पुरवठादारांकडून एकच टॅक्स इनव्हॉईस प्राप्त होत असतो, त्यामुळे, अशा वस्तुंची किंमत रूग्णांच्या बिलांमध्ये विभागुन आकारण्याचे ठरविले तरी, किती रूग्णांसाठी सदर वस्तु Reuse केली पाहिजे किंवा केली जाते, हे रूग्णाची प्रकृती, आजाराची गंभीरता, शस्त्रक्रियेतील गुतागुंत, डॉक्टर्स्, तंत्रज्ञ व स्टाफ यांची हाताळणी इ. कारणांमुळे निश्चित नसल्यामुळे, अशा वस्तुंची किंमत विभागुनही, प्रत्येक रूग्णाच्या बिला सोबत ओरिजनल टॅक्स इनव्हॉइस जोडणे शक्य झालेले नाही.

**२.** सदर साधन सामुग्रीचे काही पुरवठादार वर्षीक टेंडर पध्दतीने बदलत असल्यामुळे, बदलले गेलेले किंवा व्यवसाय बंद केलेल्या खालील पुरवठादारांकडुन मागील काळातील टॅक्स इनव्हॉइसेस्, औषध खरेदी विभागाकडुन सतत पाठपुरावा करूनही प्राप्त होवु शकलेले नाहीत, सोबत, औषध खरेदी विभागाकडील पत्र जोडण्यात आलेले आहे.

१. जेएमजी कॉर्पोरेशन, मुंबई, २. व्हिजन-मेडि डिस्ट्रिब्युटर्स्, मुंबई, ३. साई मेडिकल, जळगाव, ४. निलेश सर्जिकल, मुंबई, ५. हार्ट केअर फार्मा, मुंबई, ६. स्पंदन मेडिकल सिस्टमस्, पुणे.

सादर करावयाच्या व उपरोक्त कारणांमुळे टॅक्स इनव्हॉइसेस् जोडता येणे शक्य नसलेल्या बिलांचा तपशिल खालील प्रमाणेः-

| क्र. | बिलांचा तपशिल | बिल संख्या | एकुण रू. (कोटी) |
|---|---|---|---|
| १. | सादर करण्यात आलेली, परंतु परत करण्यात आलेली बिले | ३१०७ | ३१.०० |
| २. | सादर करावयाची बाकी असलेली बिले | ४२९३ | ३३.०० |
| | **एकुण सादर करावयाची बिलेः-** | **७४००** | **६४.००** |
| ३. | टॅक्स इनव्हॉइसेस् उपलब्ध होवु शकत असलेली अंदाजित बिले | ५५०० | ४५.०० |
| ४. | टॅक्स इनव्हॉइसेस् उपलब्ध होवु शकत **नसलेली** अंदाजित बिले | २००० | १६.०० |
| ५. | टॅक्स इनव्हॉइसेस् न जोडता प्राप्त होवु शकणारी अंदाजित रक्कम | - | १५.२० |
| ६ | टॅक्स इनव्हॉइसेस् पोटी कपात होवु शकणारी अंदाजित रक्कम | - | .८० |

***टिपः-*** *१. मेडिकल स्टोअर्स विभागाकडील दि.३१.१.२०१४ च्या पत्रानुसार, पुरवठादारांकडुन मागणी करण्यात आलेल्या बिलांपैकी जास्तित जास्त किती टॅक्स इनव्हॉइसेस् लवकरात लवकर प्राप्त होवु शकतील, त्या नुसार, टॅक्स इनव्हॉइसेस् पोटी कपात होवु शकणारी अंदाजित रक्कम कमी/जास्त होवु शकेल.*

*२. जीवनदायी योजने अंतर्गत विभागीय तज्ञ समिताच्या बैठकीत, बिले मंजुर करताना, साधारणपणे १०/१५ टक्के इतकी रक्कम कपात करण्यात येत असते.*

तसेच, शस्त्रक्रियांसाठी वापरण्यात आलेल्या साधन सामुग्रीच्या किमती, रूग्णांच्या बिलांत समप्रमाणात/ Propotionately विभागुन आकारण्यात येत असल्यामुळे, टॅक्स इनव्हॉइसेस्पोटी कपात आली तरीही, आर्थिक नुकसान होत नाही, कारण, जेवढी साधन सामुग्री खरेदी केली/वापरण्यात आली, त्यांची किंमत विभागुन आकारली जाणार असल्यामुळे, फक्त, प्रमाणापेक्षा जास्त वेळा वापर करण्यात आलेल्या, ज्यांचे टॅक्स इनव्हॉइसेस् प्राप्त होवु शकत नाहीत, अशा काही बिलांमधुन, कपात करण्यास परवानगी देण्यात यावी असे मत आहे (सरासरी रू.४,०००/- इतकी कपात होवु शकेल), कारण त्या शिवाय सदर बिले तयार करून सादर केली जावु शकत नाही.

त्यामुळे फार मोठया संख्येने व ६० कोटी पेक्षा जास्त रकमेची बिले अडकुन पडल्यामुळे, होणारे आर्थिक नुकसान विचारात घेता, तसेच, शासनाकडुन जुनी जीवनदायी योजना कायम स्वरूपी पुर्णपणे बंद करण्यात आलेली असल्याने, प्रमाणापेक्षा जास्त वेळेस वापरण्यात आलेल्या Balloons, Octopus ही साधन सामुग्रीचे टॅक्स इनव्हॉइसेस् प्राप्त होवु न शकणाऱ्या बिलांमध्ये कपात करण्यास परवानगी देणे फायदेशीर होवु शकते.

या बाबत, संबंधित कर्डियोलॉजिस्ट व कर्डियाक सर्जन्स् यांचेकडील, शस्त्रक्रियांसाठी वापरण्यात येणाऱ्या साधन सामुग्रीच्या पर्नवापराबाबत, कोणतेही निकष व नियम नसल्यामुळे, अशी उच्च दर्जाची साधन सामुग्री, निर्जंतुकीकरण (ETO) करून अनेक शस्त्रक्रियांसाठी Resuse करण्यात आलेली असल्याचे पत्र जोडण्यात आलेले आहे.

मा.उपसंचालक, आरोग्य विभाग, नाशिक, यांनी दि.२७.१.२०१४ रोजी दुरध्वनीवरून सुचित केल्या नुसार, अशा बिलांच्या टॅक्स इनव्हॉइसेस् अभावी अनुज्ञेय होवु शकत नसलेली रक्कम कपात करण्यास संमती देण्याबाबतचे, मा.कार्यकारी अधिकारी सा़ो. यांच्या स्वाक्षारीनीशी पत्र देण्यात येवून, त्या नुसार बिले तयार करून लवकरात लवकर सादर करण्यात करण्यात यावीत, असे सुचित केले आहे,

तरी, उपरोक्त विषयी मा.उपसंचालक, आरोग्य विभाग, नाशिक, यांचे नावे, शस्त्रक्रियांसाठी वापरण्यात येणाऱ्या साधन सामुग्रीचे ओरिजनल टॅक्स इनव्हॉईसेस् उपलब्ध होवु शकत नसलेल्या, शस्त्रक्रियांच्या बिलांमधुन, टॅक्स इनव्हॉईसेपोटी रक्कम कपात करण्यास मान्यता देण्याबाबतचे, मा.कार्यकारी अधिकारी, यांच्या स्वाक्षरीनीशी पत्र देण्यात येवुन, सदर विषय मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**निर्णय क्र.१००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे इनव्हॉइसेस् उपलब्ध होऊ शकत असलेल्या एकुण ५५०० रुग्णांच्या फाईल तात्काळ मा.उपसंचालक, आरोग्य विभाग, नाशिक कार्यालयात सादर करणेत याव्यात व उर्वरित २००० बीलांसाठी आवश्यक असलेल्या टॅक्स इनव्हॉईसेस् अभावी अनुज्ञेय होऊ शकत नसलेली रक्कम कपात करुन मिळणेबाबत पत्रव्यवहार करणेत यावा.**

**वैद्यकिय संचालक यांनी सदरची बीले वेळेवर मा.उपसंचालक, आरोग्य विभाग, नाशिक यांचे कार्यालयात सादर केलेली नसल्यामुळे मोठया प्रमाणावर रक्कम प्रलंबीत राहीली आहे. या त्यांच्या निष्काळजीपणामुळे संस्थानचे किती आर्थिक नुकसान होणार आहे याचा व यामध्ये वैद्यकिय संचालकासह जबाबदार अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या निश्चित करुन त्याचा अहवाल पुढील सभेपुढे सादर करणेत यावा.**

**तसेच, सर्व प्रलंबीत बीले दि.३१ मार्च, २०१४ अखेर मा.उपसंचालक, आरोग्य विभाग, नाशिक यांचेकडे सादर करणेत यावीत, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२१** **मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१८.१०.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८३४ मध्ये दुरुस्ती करणेबाबत.**

**निर्णय क्र.१०१** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२२** **सन २०१२-१३ मधील वार्षीक खरेदीमधील मंजूर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य अतिरिक्त खरेदीबाबत.**

**प्रस्ताव- अ)** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०८/२०१२ निर्णय क्रमांक ७२० Clause No.६ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. २५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी/ माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

**प्रस्ताविकः-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्याकरीता सन २०१२-२०१३ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने एकुण ११७ पुरवठा धारकांना एकुण रक्कम रु.२४,९२,४८,०३०/- चे दि.२६/११/२०१२ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा चालू आहे तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्यापैकी काही आयटमचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही. सदरचे औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे. तसेच दोन्ही रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना कार्यान्वित झालेली आहे. सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यानंतर १० दिवसांची औषधे मोफत दयावी लागतात त्यामुळे औषधांचा खप हा वाढलेला आहे, त्यामुळे जसाजसा खप वाढेल व जशी जशी लागेल तशी तशी औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य खरेदी करावी लागणार आहेत.

सदर औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य वार्षिक मंजुर दरानुसार वेगवेगळ्या मंजूर पुरवठा धारकांकडून सदरचे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु. ९४४८०४.९३ इतका खर्च येणार आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच अर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. त्यासाठी संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येते. सदर रुग्णालयकरिता औषधे/ सर्जिकल/ लॅबोरॅटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजने अंतर्गत उपचार घेणारे रुग्णांकरीता खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी सदरचे खरेदीकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु. ९४४८०५/- चे खर्चाची नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.१०२ अ) यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची व खर्चाची नोंद घेणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**ब) व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०८/२०१२ निर्णय क्रमांक ७२० Clause No.६ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. २५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

**प्रस्ताविक:-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्याकरीता सन २०१२-२०१३ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने एकुण ११७ पुरवठा धारकांना एकुण रक्कम रु. २४,९२,४८,०३०/- चे दि.२६/११/२०१२ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा चालू आहे तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्यापैकी काही आयटमचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही. सदरचे औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे. तसेच दोन्ही रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना कार्यान्वित झालेली आहे. सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यानंतर १० दिवसांची औषधे मोफत दयावी लागतात त्यामुळे औषधांचा खप हा वाढलेला आहे, त्यामुळे जसाजसा खप वाढेल व जशी जशी लागेल तशी तशी औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य खरेदी करावी लागणार आहेत.

सदर औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य वार्षिक मंजुर दरानुसार वेगवेगळ्या मंजूर पुरवठा धारकांकडून सदरचे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु. ९९३१३५.८९ इतका खर्च येणार आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच अर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. त्यासाठी संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येते. सदर रुग्णालयकरिता औषधे/ सर्जिकल/ लॅबोरॅटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजने अंतर्गत उपचार घेणारे रुग्णांकरीता खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी सदरचे खरेदीकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु. ९९३१३६/- चे खर्चाची नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.१०२ ब) यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची व खर्चाची नोंद घेणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**क) व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०८/२०१२ निर्णय क्रमांक ७२० Clause No.६ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. २५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

**प्रस्ताविक:-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्याकरीता सन २०१२-२०१३ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने

एकुण ११७ पुरवठा धारकांना एकुण रक्कम रु. २४,९२,४८,०३०/- चे दि.२६/११/२०१२ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा चालू आहे तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्यापैकी काही आयटमचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही. सदरचे औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे. तसेच दोन्ही रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना कार्यान्वित झालेली आहे. सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यानंतर १० दिवसांची औषधे मोफत दयावी लागतात त्यामुळे औषधांचा खप हा वाढलेला आहे, त्यामुळे जसाजसा खप वाढेल व जशी जशी लागेल तशी तशी औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य खरेदी करावी लागणार आहेत.

सदर औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य वार्षिक मंजुर दरानुसार वेगवेगळ्या मंजूर पुरवठा धारकांकडून सदरचे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु. ९२९१६२.३ इतका खर्च येणार आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच अर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. त्यासाठी संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येते. सदर रुग्णालयकरिता औषधे / सर्जिकल / लॅबोरॅटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजने अंतर्गत उपचार घेणारे रुग्णांकरीता खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी सदरचे खरेदीकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु. ९२९१६२/- चे खर्चाची नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.१०२ क) यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची व खर्चाची नोंद घेणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

ड) **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०८/२०१२ निर्णय क्रमांक ७२० Clause No.६ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. २५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी/ माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

**प्रस्ताविकः-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्याकरीता सन २०१२-२०१३ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने एकुण ११७ पुरवठा धारकांना एकुण रक्कम रु. २४,९२,४८,०३०/- चे दि.२६/११/२०१२ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा चालू आहे तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्यापैकी काही आयटमचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही. सदरचे औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे. तसेच दोन्ही रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना कार्यान्वित झालेली आहे. सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यानंतर १० दिवसांची औषधे मोफत दयावी लागतात त्यामुळे औषधांचा खप हा वाढलेला आहे, त्यामुळे जसाजसा खप वाढेल व जशी जशी लागेल तशी तशी औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य खरेदी करावी लागणार आहेत.

सदर औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य वार्षिक मंजुर दरानुसार वेगवेगळ्या मंजूर पुरवठा धारकांकडून सदरचे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु. ९९९५५८/- इतका खर्च येणार आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच अर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. त्यासाठी संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येते. सदर रुग्णालयकरिता औषधे/ सर्जिकल/ लॅबोरॅटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजने अंतर्गत उपचार घेणारे रुग्णांकरीता खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी सदरचे खरेदीकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु. ९९९५५८/- चे खर्चाची नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.१०२ ड) यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची व खर्चाची नोंद घेणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२३ व्हेंटीलेटर (Model- Evita २ Dura) मशिनचे दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागांमध्ये मे. ड्रॅगर मेडीकल इंडिया प्रा. ली. मुंबई या कंपनीचे ०१ नग व्हेंटीलेटर मशीन (Model-Evita २ Dura) अत्यवस्थ रुग्णांना कृत्रीम श्वासोच्छवास देण्यासाठी वापरले जाते. सदर व्हेंटीलेटर मशीनचे दुरुस्ती व देखभालीकरीता कंपनीकडे दि. ०१/०४/२०१३ ते ३१/०३/२०१४ या कालावधीकरीता एकुण रू २३,५९६/-इतक्या रकमेत वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेत आले आहे. सदर AMC कालावधीत दुरूस्तीसाठी आवश्यक असणारे सर्व स्पेअर पार्ट व कन्झ्युमेबलची किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

सध्या सदर विभागाने व्हेंटीलेटर मशीन व्यवस्थीत काम देत नसल्याचे कळविले आहे. त्यासाठी कंपनी इंजिनीअर त्यांचे तातडीच्या भेटी करीता आले असता त्यांनी व्हेंटीलेटर मशिनची तपासणी करुन व्हेंटीलेटरचा Service Set पार्ट खराब झाल्यामुळे बदलण्याची आवश्यकता असल्याचे त्यांचे सर्व्हीस रिपोर्ट दि.१०/११/२०१३ अन्वये कळविले आहे. सदर मशिन नियमीत वापरात असल्यामुळे तातडीने दुरूस्त करणेस आवश्यक आहे. त्यासाठी कंपनीने त्यांचे पत्र क्र DMIPL/१२५, दि.०२/१२/२०१३ अन्वये व्हेंटीलेटर मशीनचे स्पेअर पार्ट बदलणेकामी सर्व करांसहीत एकुण रू ५०,४५६/- (अक्षरी रू. पन्नास हजार चारशे छपन्न मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. सदर व्हेंटीलेटर मशीनचे स्पेअर पार्ट करीता मे. ड्रॅगर मेडीकल इंडिया प्रा. ली. मुंबई, हे एकमेव पुरवठाधारक आहेत

तरी मे. ड्रॅगर मेडीकल इंडिया प्रा. ली. मुंबई, यांचेकडुन व्हेंटीलेटर मशिनचे स्पेअर पार्ट बदलणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रू. ५०,४५६/- च्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१०३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२४ डिफीब्रीलेटर मशिनचे दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल व साईनाथ रुग्णालयाचे अतिदक्षता विभाग, ऑपरेशन थिएटर्स विभागाकरीता संदर्भ क्र. १ अन्वये मे. एल. ॲन्ड टी. लि. पुणे (सध्याची मे.स्कॅनरे हेल्थकेअर प्रा.लि.मैसूर) यांचेकडुन Zoll Biphasic M Series डिफीब्रीलेटर्स ०३ नग एकुण रू. ९,००,०००/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहेत. सदरचे डिफीब्रीलेटर्स दि. २५/०८/२००५ रोजी कार्यान्वीत करणेत आले आहेत. कंपनीने सदर मशीन्सकरीता दिलेला एक वर्षांचा वॉरंटी कालावधी संपलेनंतर मशीनचे दुरुस्ती व देखभालीकरीता कंपनीकडे ३१/०३/२०१३ पर्यत वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेत आले होते. परंतु यापुढे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करीता विचारणा केली असता कंपनीने AMC/ CMC करीत नसल्याचे कळविले आहे. त्यामुळे सदर डिफीब्रीलेटर्सची दुरुस्ती व देखभाल श्री साईबाबा हॉस्पिटलचे बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जात आहे. परंतु दुरूस्ती करीता आवश्यक असलेले स्पेअर पार्ट विविध पुरवठाधारक कंपनीकडुन खरेदी केले जाते.

सध्या आय.सी.सी.यु. विभागातील डिफीब्रीलेटर मशीन व्यवस्थीत काम देत नसल्याचे सदर विभागाने कळविले आहे. त्यानुसार मशीन दुरूस्ती करीता मे. स्कॅनरे हेल्थकेअर, मैसुर (पुर्वीची मे. एल. ॲन्ड टी.) यांचे अधिकृत सर्व्हीस डिलर मे. एक्सेल कार्पोरेशन, नाशिक यांचेकडे विचारणा केली असता कंपनीने सदर डिफीब्रीलेटर मशिनचे स्पेअर पार्ट उपलब्ध नसल्याचे त्याचे ई-मेल दि. २७/०८/२०१३ अन्वये कळविले आहे. सदर डिफीब्रीलेटर मशिन नियमीत वापरात असल्यामुळे तातडीने दुरूस्त करणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा प्रकारचे डिफीब्रीलेटर मशिनचे सध्याचे अधिकृत सर्व्हीस डिलर मे. बायोमेडीकॉन सर्व्हीसेस इं. प्रा.लि. मुंबई यांचेकडे विचारणा केली असता डिफीब्रीलेटर मशिन दुरुस्त होत असल्याचे कळविले आहे. त्यानुसार इकडील पत्र क्र. ११०४, दि. १५/११/२०१३ अन्वये कंपनीकडे पाठविणेत आले आहे. कंपनीने डिफीब्रीलेटर मशिनची तपासणी करून त्यांचे पत्र क्र. PI/BM/ SER/०७५/२०१२-१३, Dt. २६/१२/२०१३ अन्वये दुरूस्तीचे सर्व करांसहीत एकुण रु. ३५,९१०/- (अक्षरी रु. पस्तीस हजार नउशे दहा मात्र) इतका खर्च येणार असल्याचे कळविले असुन कंपनीने सदर रक्कमेची आगाउ मागणी केलेली आहे. परंतु कंपनी प्रतिनिधीशी झालेल्या चर्चेअंती वरील डिफीब्रीलेटर मशिन श्री साईनाथ रूग्णालयामध्ये प्राप्त झ ााल्यानंतर सदर रक्कम अदा होणेस कंपनीने स्वीकृती दर्शविली आहे. तसेच सदर पार्टस् विशिष्ट रचना व स्पेसीफिकेशन असलेली असतात. सदर कंपनी एकमेव पुरवठाधारक आहेत, त्यामुळे इतर पुरवठाधारक कंपनीकडे याप्रकारचे पार्टस् उपलब्ध होत नाही.

तरी मे. बायोमेडीकॉन सर्व्हीसेस इं. प्रा.लि. मुंबई, यांचेकडुन डिफीब्रीलेटर मशीनचे स्पेअर पार्ट बदलुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु. ३५,९१०/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१०४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२५ श्री साईबाबा रुग्णालयातील Dental विभागाकरीता Air Rotar Handpiece व Fiber Optic Air Rotar Handpiece खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील Dental या विभागाने दि.०५/०८/२०१३ रोजीचे मागणी पत्रकान्वये NSK कंपनीचे Air Rotar Handpiece व Fiber Optic Air Rotar Handpiece प्रत्येकी ०१ नग याप्रमाणे एकुण ०२ नगांची मागणी केलेली आहे. यापुर्वी सन २००६ या वर्षात Handpiece खरेदी करण्यात आले होते, परंतु दैनंदिन वापरामुळे ते खराब झालेले आहेत व दुरुस्त देखील होत नाहीत त्यामुळे त्यांनी नविन मागणी केलेली आहेत.

उपरोक्त Air Rotar Handpiece व Fiber Optic Air Rotar Handpiece खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Confident Sales India Pvt. Ltd., Bangalore यांचेकडुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांनी दि.१०/१२/२०१३ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे दर कळविलेले आहे.

| Sr. No. | Description | Qty. | App. Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Air Rotar Handpiece | 01 No. | 26796.00 | 26796.00 |
| 2 | Fiber Optic Air Rotar Handpiece | 01 No. | 26796.00 | 26796.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **53592.00** |

**मागणी:-** श्री साईबाबा रुग्णालयातील Dental विभाग यांचे दि.०५/०८/२०१३ (औषध भांडार प्राप्त दि.२०/०९/२०१३) रोजीचे मागणी पत्र.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**स्पष्ट मत/ विभागाचा अभिप्राय:-** यापुर्वी सन २००६ या वर्षात Handpiece खरेदी करण्यात आले होते, परंतु दैनंदिन वापरामुळे ते खराब झालेले आहेत व दुरुस्त देखील होत नाहीत त्यामुळे नविन खरेदी करणेस हरकत नाही.

तरी वरीलप्रमाणे Air Rotar Handpiece व Fiber Optic Air Rotar Handpiece प्रत्येकी ०१ नग याप्रमाणे ०२ नग विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.५३,५९२/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१०५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील Dental विभागाकरीता ०१ नग Air Rotar Handpiece व ०१ नग Fiber Optic Air Rotar Handpiece विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.५३,५९२/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२६ इलेक्ट्रोलाईट ॲनालयझर Na, CI- Electrode व P.P.Tube खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे पॅथोलॉजी लॅब विभागाकरीता मे. रोश डायग्नॉस्टीक्स, मुंबई या कंपनीचे एक इलेक्ट्रोलाईट ॲनालायझर मशीन (Model: Roche ९१८०) एकुण रु. १,५६,०००/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आले असून नियमीत वापरात आहे. सदर मशीनकरीता कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. १७/०२/२००९ रोजी संपला आहे. पुढील कालावधीत मशीनचे दुरुस्ती व देखभालीकरीता कंपनीकडे दि. ०१/०४/२०१३ ते दि. ३१/०३/२०१४ या कालावधीकरीता एकुण रू. १४,५००/- इतक्या रकमेत वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) करणेत आले आहे. सदर कालावधीत दुरुस्ती व देखभालीकरीता आवश्यक असलेले स्पेअर पार्ट व कंझ्युमेबल ॲक्सेसरीज संस्थानला स्वखर्चाने बदलावे लागणार आहेत.

सध्या उपरोक्त मशिन व्यवस्थीत काम देत नसल्याचे सदर विभागाने कळविले आहे. त्यानुसार सदर मशिन तपासणी केली असता मशिनचे Na, CL Electrode व P. P. Tube हे कंझ्युमेबल पार्ट खराब झाल्यामुळे बदलण्याची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा प्रकारच्या विविध मशिनरीजचे कन्झ्युमेबल अक्सेसरीजचे वार्षिक खरेदी मेडीकल स्टोअर विभागामार्फत करणेबाबत मान्यता घेणेस्तव स्वतंत्र प्रस्ताव सादर करणेत येत आहे. सदर कन्झ्युमेबल अक्सेसरीजची वार्षिक खरेदी ई- टेंडर पध्दतीने करण्यात येणार असुन सदर कार्यवाही पुर्ण होणेस अंदाजे तीन ते चार महिन्यांचा कालावधी लागणार आहे.सदर मशिन नियमीत वापरात असल्यामुळे तातडीने दुरूस्त करणे आवश्यक आहे. त्यासाठी कंपनीने त्यांचे पत्र दि. १९/१२/२०१३,अन्वये इलेक्ट्रोलाईट ॲनालायझर मशिनचे कन्झ युमेबल पार्ट बदलणेकरीता सर्व करांसहीत एकुण रु.४४,१९३/- (अक्षरी रु. चव्वेचाळीस हजार एकशे त्र्यान्नव मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. सदर Na Electrode करीता आठ महिने व CL

Electrode करीता कंपनीने सहा महिन्यांची वॉरंटी दिलेली आहे. सदर इलेक्ट्रोलाईट ॲनालायझर मशिनचे स्पेअर पार्ट करीता मे. रोश डायग्नॉस्टीक्स, मुंबई यांचे अधिकृत डीलर मे. सास एंटरप्रायजेस, औरंगाबाद हे एकमेव पुरवठाधारक आहेत.

तरी मे. सास एंटरप्रायजेस, औरंगाबाद यांचेकडुन इलेक्ट्रोलाईट ॲनालायझर मशिनचे कन्झ्युमेबल पार्ट खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रू. ४४,१९३/- च्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२७** **श्री साईबाबा हॉस्पिटल येथील कॅन्टीन ठेकेदारी पध्दतीने चालविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटल येथील कॅन्टीन विहित पध्दतीने रितसर वाटाघाटी करुन मा. त्रिसदस्यीय समितीचे मान्यतेने दि. ०८/१०/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७८३ नुसार एन.पी. डिस्ट्रीब्यूटर्स, शिरडी यांचे उच्चतम दर असल्याने निविदेतील अटी-शर्तीनुसार एक वर्ष कालावधीसाठी चालविणेस देणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यानुसार जा. नं. एसएसएस/एसएसबीएच/एचआर/६८५०/१८/०१/२०१४ अन्वये एन.पी. डिस्ट्रीब्यूटर्स, शिरडी यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार त्यांनी दि. ०१/०२/२०१४ पासून कॅन्टीनचे कामकाज सुरु केलेले आहे. परंतु, त्याच दिवशी दुपारी काही ग्रामस्थांनी धरणे आंदोलन केले. त्याबाबत त्यांनी व्यवस्थापनास निवेदन सादर केले आहे. सदरचे निवेदन व्यवस्थापनामार्फत श्री साईबाबा हॉस्पीटलचे प्र. वैद्यकिय संचालक डॉ. कौशिक मकवाना यांनी स्विकारले आहे. त्यात असे म्हटले आहे की, श्री साईबाबा हॉस्पीटल येथील चहा कॅन्टीन संस्थान खाजगी व्यक्तीला भाडेतत्वावर देत असून चहा, कॉफी, दूध व नाष्टा पॅकेटस् बंद करण्यात आले आहे. त्यामुळे गोर गरीब जनतेचे हाल होतात. तरी सदर निर्णय श्री साईबाबा संस्थानने मागे घ्यावा. सदर कॅन्टीन संस्थाननेच चालवावी. गोर गरीब जनतेला वेढीस न धरता चहा, कॉफी, दूध व नाष्ट्याची सोय उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा राहाता तालुका काँग्रेस तर्फे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

वास्तविक परिस्थिती अशी आहे की, सदरचे कॅन्टीनचे कंत्राट मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे दि.०२/०८/२०१३ रोजीचे आदेशानुसार विहित पध्दतीचा अवलंब करुन देण्यात आलेले आहे. सदरचे कंत्राटदारामार्फत जे खाद्यान्न रुग्ण किंवा त्यांचे नातेवाईक यांना पुरविण्यात येईल त्यांचे माफक दर संस्थानने निश्चित करुन दिलेले आहे. त्यापेक्षा जास्त दराने विक्री केली जात नाही. सदर कंत्राट देण्यापूर्वी रुग्णांचे नातेवाईकांसाठी श्री साईबाबा हॉस्पीटल येथे संस्थानचे कॅन्टीन विभागामार्फत पहाटे ४ ते दु. १२ व दु. १२ ते रात्री ८ वा. या दोन शिफ्टमध्ये चहा, कॉफी, दुध याची विक्री केली जात असे. तसेच सकाळी ७ ते ९ या दरम्यान फुडपॅकेटची विक्री केली जात असे. याशिवाय अन्य सुविधा रुग्णांचे नातेवाईकांस उपलब्ध नव्हत्या. त्या बाबींचा विचार करुन संस्थानने कंत्राटदारामार्फत रुग्णांचे नातेवाईकांस माफक दरात सुविधा पुरविण्याच्या चांगल्या हेतुने कॅन्टीन खाजगी कंत्राटदारास विहित पध्दतीने चालविणेस देणेचा निर्णय घेतलेला आहे.

अशा परिस्थितीत आंदोलनकर्त्यांचे म्हणणे योग्य दिसून येत नाही. खाजगी कंत्राटदाराची सेवा बंद केल्यास रुग्णांच्या नातेवाईकांना आवश्यक त्या सेवा माफक दरात पुरविता येणार नाहीत. त्यामुळे त्यांची गैरसोय होईल. तथापि रुग्णांचे नातेवाईकांना चहा, काफी, दुध संस्थानचे कॅन्टीन विभागामार्फत पुरविता येईल किंवा आंदोलनकत्याचे निवेदन दप्तरी दाखल करुन रुग्णांचे नातेवाईकांना सर्व सुविधा खाजगी कंत्राटदारामार्फत पुरविता येईल. याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलचे दक्षिण बाजुस असलेल्या कंत्राटी संरक्षण कर्मचारी कार्यालयाजवळ रुग्णांचे नातेवाईकांकरिता संस्थानचे कॅन्टीन विभागामार्फत चहा, कॉफी, दुध, उपलब्ध करुन देणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२८** **संस्थान रुग्णालयांसाठी वैद्यकिय संचालक, निवासी उपवैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक, वैद्यकिय अधिकारी व इतर कर्मचारी पदे भरणेसाठी घेतलेल्या मुलाखतींबाबत.**

**निर्णय क्र.१०८** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२९** **श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर या विभागाकरीता Endoscopy Trolley व Central Suction Trolley खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर या विभागाने दि.१३/०८/२०१३ रोजीचे मागणी पत्रकान्वये Endoscopy Trolley 01 नग व Central Suction Trolley 04 नगांची मागणी केलेली आहे. कारण जनरल ऑपरेशन थिएटर (आर्थो) यांचेकडे Endoscopy Trolley नसल्यामुळे व Central Suction Trolley दैनंदिन वापरामुळे खराब झालेली आहे, त्यामुळे त्यांनी नविन मागणी केलेली आहेत.

उपरोक्त Endoscopy Trolley 01 नग व Central Suction Trolley 04 खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी खालीलप्रमाणे पुरवठाधारकांकडून ई-मेल व्दारे दरपत्रक मागविण्यात आले होते-

| Sr. No. | Description | Name of Supplier | Qty. | App. Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Endoscopy Trolley | Quali Surge Surgicals Pvt. Ltd., Pune | 01 No. | 19260.00 | 19260.00 |
| 2 | Central Suction Trolley | Al-Med Equipments, Mumbai | 04 Nos. | 14100.00 | 56400.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | | **75660.00** |

**मागणी:-** श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभाग यांचे दि.१३/०८/२०१३ (औषध भांडार प्राप्त दि.२२/१०/२०१३) रोजीचे मागणी पत्र.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**स्पष्ट मत/ विभागाचा अभिप्राय:-** जनरल ऑपरेशन थिएटर (आर्थो) यांचेकडे Endoscopy Trolley नसल्यामुळे व Central Suction Trolley दैनंदिन वापरामुळे खराब झालेली आहे, त्यामुळे नविन खरेदी करणेस हरकत नाही.

तरी वरीलप्रमाणे Endoscopy Trolley ०१ नग व Central Suction Trolley ०४ नग विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.७५,६६०/- चे खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.१०९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर या विभागाकरीता ०१ नग Endoscopy Trolley व ०४ नग Central Suction Trolley विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.७५,६६०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.३० **श्री साईनाथ रुग्णालयातील Ophthalmic OPD या विभागाकरिता Capsulotomy Lens for Yag Laser खरेदीबाबत.**

प्रस्ताव- श्री साईनाथ रुग्णालयातील Ophthalmic OPD या विभागाने दि.१४/११/२०१३ रोजीचे मागणी पत्रकान्वये Capsulotomy Lens for Yag Laser ०१ नगांची मागणी केलेली आहे. यापुर्वी मशिनसोबत आलेली लेन्स दैनंदिन वापरामुळे खराब झालेली आहे व ती दुरुस्त देखील होत नाहीत, त्यामुळे त्यांनी नविन मागणी केलेली आहेत.

उपरोक्त Capsulotomy Lens for Yag Laser खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Medicure Instruments, Delhi यांचेकडुन ई-मेल व्दारे दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांनी दि.२७/११/२०१३ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे दर कळविलेले आहे.

| Sr. No. | Description | Qty. | App. Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Abraham Yag Capsulotomy Lens | 01 No. | 27825.00 | 27825.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **27825.00** |

**मागणी:-** श्री साईनाथ रुग्णालयातील Ophthalmic OPD विभाग यांचे दि.१४/११/२०१३ (औषध भांडार प्राप्त दि.०७/०१/२०१३) रोजीचे मागणी पत्र.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**स्पष्ट मत/ विभागाचा अभिप्राय:-** यापुर्वी मशिनसोबत आलेली लेन्स दैनंदिन वापरामुळे खराब झालेली आहे व ती दुरुस्त देखील होत नाहीत, त्यामुळे नविन खरेदी करणेस हरकत नाही.

तरी वरीलप्रमाणे Capsulotomy Lens for Yag Laser ०१ नग विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.२७,८२५/- चे खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.११० **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील Ophthalmic OPD या विभागाकरिता ०१ नग Capsulotomy Lens for Yag Laser विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु. २७,८२५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३१ श्री साईनाथ रुग्णालयातील Ophthalmic OPD या विभागाकरिता Applanation Tonometer खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील Ophthalmic OPD या विभागाने दि.०५/१२/२०१३ रोजीचे मागणी पत्रकान्वये Zeiss कंपनीचेच Applanation Tonometer ०१ नगांची मागणी केलेली आहे. यापुर्वी सन २००६ मध्ये मे. कार्ल झेईस या कंपनीकडून खरेदी करण्यात आले होते, परंतु दैनंदिन वापरामुळे खराब झालेले असून ते दुरुस्त देखील होत नाहीत, त्यामुळे त्यांनी नविन मागणी केलेली आहेत.

उपरोक्त Applanation Tonometer हे त्यांना Carl Zeiss या कंपनीचेच पाहिजे असल्यामुळे सदर खरेदीकामी Carl Zeiss India Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले असून खालीलप्रमाणे दर कळविलेले आहे.

| Sr. No. | Description | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Applanation Tonometer AT020 Complete | 01 | 98115.00 | 98115.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **98115.00** |

**मागणी:-** श्री साईनाथ रुग्णालयातील Ophthalmic OPD विभाग यांचे दि.०५/१२/२०१३ (औषध भांडार प्राप्त दि.०७/०१/२०१३) रोजीचे मागणी पत्र.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**स्पष्ट मत/ विभागाचा अभिप्राय:-** यापुर्वी सन २००६ मध्ये मे. कार्ल झेईस या कंपनीकडून खरेदी करण्यात आले होते, परंतु दैनंदिन वापरामुळे ते खराब झालेले व ते दुरुस्त देखील होत नाहीत, तसेच त्यांना Carl Zeiss या कंपनीचेच Applanation Tonometer पाहीजे असल्यामुळे M/s. Carl Zeiss India Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून नविन खरेदी करणेस हरकत नाही.

तरी वरीलप्रमाणे Applanation Tonometer ०१ नग M/s. Carl Zeiss India Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.९८,११५/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१११ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील Ophthalmic OPD या विभागाकरिता ०१ नग Applanation Tonometer, M/s. Carl Zeiss India Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.९८,११५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३२ श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी. नं.१ करिता Epoxy Flooring चे कामास मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. १ मधील Epoxy Flooring सध्या निघालेले आहे. सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. १ मध्ये शस्त्रक्रियेच्या कामामुळे ते साधारणत: ३ ते ४ वर्षात खराब होऊन जाते. त्यामुळे त्यात पाणी जाऊन शस्त्रक्रिया गृहात जंतु संसर्ग निर्माण होण्याची शक्यता असते. पर्यायाने याचा त्रास रुग्णांना लवकर बरे न होण्यास (Recover) होतो, त्यामुळे सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. १ या विभागाने दि.१६/१०/२०१३ (औषध भांडार प्राप्त दि.२०/११/२०१३) चे मागणी पत्रकान्वये Epoxy Flooring चे काम करुन मिळावे असे कळविलेले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | विभागाचे नाव | साईज | अंदाजे दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. १ | २९४.५०sq. ft. | १२०.२४ / sqft. | ३५४१०.६८ |

वरीलप्रमाणे काम करुन घेणेकामी अंदाजे रु.३५,४११/- इतका खर्च अपेक्षित आहे. श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.व्ही.टी.एस ओ.टी. नं.२ करीता Epoxy Flooring चे काम विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीकामीचा अंदाजे रक्कम रु.३७,६९५/- चा प्रस्ताव दि.१३/१२/२०१३ रोजीचे मा. त्रीसदस्य समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला होता. सदर प्रस्तावास निर्णय क्र.९५७ अन्वये मान्यता मिळालेली असून त्यानुसार याकामी इकडील पत्र क्र. ६१९१ दि.०३/०१/२०१४ अन्वये ९ कोटेशनधारकांकडून दि.१४/०१/२०१४ अखेर कोटेशन मागविण्यात आलेले असून पुढील कार्यवाही चालु आहे. तेंव्हा सदरचे प्रस्तावामध्ये चर्चा/ वाटाघाटी केल्यानंतर मंजुर झालेल्या दराने सदरचे काम करुन घेता येईल.

तरी उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. १ मधील Epoxy Flooring चे काम चर्चा/ वाटाघाटीनंतरचे मंजुर दराने करुन घेणेकामीच्या प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.११२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३३ Stent चे तातडीने केलेल्या खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्र.५३३ अन्वये रुग्णालयामध्ये लागणारे विविध प्रकारचे व विविध साईजचे तसेच नविन प्रकारचे व नविन कंपन्याचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर आदी तत्सम साहित्य जर रुग्णांना बसविण्याची गरज असेल तर ती वैद्यकिय संचालक यांनी संबंधित डॉक्टर यांचेशी विचार विनिमय करुन वैद्यकिय संचालक यांनी रुग्णालयात On Consignment Basis वर बाजारातून खरेदी करुन वापरलेल्या साहित्याचे बील संबंधितास अदा करण्यात यावे, असे ठरले आहे.

**प्रस्ताविकः-** डॉ. वर्मा यांनी वरील रुग्णाकरीता Stent ची दि.१६/१२/२०१३ अन्वये मागणी केली होती. त्यानुसार M/s. Shivam Trading Company, Mumbai यांचेकडून बील क्र.३९९९ दि.१७/१२/२०१३ (डिलेव्हरी चलन नं. ३०७४ दि.१६/१२/२०१३) अन्वये एक नग रु.१,५४,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करुन रुग्णास दि.१६/१२/२०१३ रोजी शस्त्रक्रिया करुन बसविण्यात आलेला आहे.

सदर Stent बसविणेसाठी श्री. मालपानी जयनारायण कचरुलाल यांना रु.१,९५,६४०/- इतका खर्च आलेला आहे.

**मागणी :-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागात श्री. मालपानी जयनारायण कचरुलाल या पेशंटला दि.१६/१२/२०१३ रोजी Abbott Co. चा Absorb BVS Stent RX ३.०० * १८mm हा विशिष्ट प्रकारचा ०१ नग Stent वापरलेला आहे.

सदर Stent करीता सन २०१२-१३ चे वार्षीक खरेदीमध्ये On Consignment Basis वर पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही. कारण वार्षीकमध्ये सदर Stent साठी मागणी नव्हती शिवाय असा Stent हा क्वचित प्रसंगी लागतो. डॉ. वर्मा यांनी वरील रुग्णाकरीता Stent ची दि. १६/१२/२०१३ चे पत्रान्वये मागणी केली होती.

सदर रुग्णास वरील Stent वापरण्यात आला होता कारण सदर Stent ला Metalic Frame Work असून सदर Stent हा विशिष्ट प्रकारच्या Polymer पासून बनविलेला आहे व तो शरीरात दिड वर्षापर्यंत राहतो व दिड वर्षानंतर तो विरघळतो त्यामुळे रुग्णांस कमीत कमी औषधे घ्यावी लागतात व पुढील Restonosis ची शक्यता देखील खूप कमी असते.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात

सदर Stent खरेदीकामी व रुग्णालयातील खर्चाची संपुर्ण रक्कम रु. १,९५,६४०/- ही रुग्णांने संस्थानमध्ये पावती नं. २१०७४३३५ अन्वये रोख भरलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** तरी उपरोक्त प्रमाणे M/s. Shivam Trading Company, Mumbai यांच्याकडून खरेदी करण्यात आलेल्या उपरोक्त Stent चे बीलाची रक्कम रु. १,५४,०००/- चे खर्चाची नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

निर्णय क्र.११३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात येऊन, प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**समितीने यापुर्वी पुरवठाधारक कंपन्यांचे स्टेंट समप्रमाणात वापरण्यात यावेत, असा निर्णय घेतलेला आहे, परंतु वास्तविक पहाता समप्रमाणात स्टेंट वापरण्यात येत नाहीत, काही कंपन्यांचे जास्त प्रमाणात व काही कंपन्यांचे कमी प्रमाणात स्टेंट वापरले जातात, असे समितीच्या निदर्शनास आले आहे. यावरुन वैद्यकिय संचालक यांनी समितीने घेतलेल्या निर्णयाचे पालन केले नाही व संस्थानचे आर्थिक नुकसान होणार नाही, असे कळवून समितीला अंधारात ठेवले आहे. याबाबत वैद्यकिय संचालक व दोन्ही कार्डीओलॉजिस्ट यांचेकडून खुलासा घेण्यात यावा.**

**तसेच, कोणते डॉक्टर कोणत्या कंपनीचे स्टेंट वापरतात आणि त्यामुळे संस्थानला किती आर्थिक अनुदान भरावे लागत आहे, याबाबतचा सविस्तर अहवाल पुढील सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३४ श्रींचे आराधना विधीबाबत.**

निर्णय क्र.११४ **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं.३५ श्री गुरुस्थान मंदिरामधील महादेवाच्या पिंडीकरीता चांदीचा मुखवटा व पिंडकव्हर देणगी स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.भावेश देसाई, रा.मुंबई यांनी दि.०१/०२/२०१४ रोजीचे पत्राद्वारे श्री गुरुस्थान मंदिरातील महादेवाच्या पींडीकरिता चांदीचा मुखवटा व पींडीचे कव्हर देणगी देण्याची इच्छा व्यक्त केलेली आहे.

श्रीगुरुस्थान मंदिरामध्ये श्रींचे रामनवमी, गुरुपौर्णिमा व पुण्यतिथी उत्सवाचे वेळी तसेच महाशिवरात्रीचे वेळी सध्या (सन- १९४९ पासून) असलेला चांदीचा मुखवटा व पींड कव्हर वापरण्यात येते. सदर मुखवटा व पींड कव्हर फार जुने झालेले आहे. त्यामुळे ते सुस्थीतीत नाही.

तरी श्री भावेश देसाई, रा.मुंबई यांचे इच्छेनुसार श्री गुरुस्थान मंदिरातील महादेवाच्या पींडीकरिता चांदीचा मुखवटा व पींडकव्हर देणगी स्विकारणेबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.११५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री भावेश देसाई, रा.मुंबई यांचे इच्छेनुसार श्री गुरुस्थान मंदिरातील महादेवाच्या पींडीकरिता चांदीचा मुखवटा व पींडकव्हर देणगी स्वरुपात स्विकारणेत येऊन, अतिरिक्त म्हणून मंदिर विभागाकडे ठेवणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं.३६ गोवरी, फुटाणे, विडयाची पाने व पावडर मार्बल मुर्ती खरेदी करणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन बंद निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** साईभक्तांना पवित्र उदीचे वाटप करण्यासाठी मंदिर विभागामार्फत प्रति वर्षी श्रींचे द्वारकामाईचे धुनीकरिता गोवरी खरेदी करण्यात येतात. मागील वर्षी सन-२०१३-१४ करिता १,००,००० किलो रानशेणी व २५,००० किलो प्लॅस्टीक कागदावर थापलेली व वाळविलेली गोवरी घेण्यात आली होती. माहे- मार्च-२०१४ अखेर सदर निविदेची मुदत संपणार आहे. सईभक्तांची सतत गर्दी वाढत आहे. त्यामुळे पुढील वर्षासाठी अंदाजे १,५०,००० किलो रानशेणी व ५०,००० किलो प्लॅस्टीक कागदावर थापलेली व वाळविलेली गोवरी खरेदी करावी लागणार आहे. त्याकामी मंदिर विभागाचे बजेटमध्ये रु.१५,००,०००ची तरतूद करण्यात आलेली आहे.

**ब)** मंदिर विभागात श्रींचे धुपारतीनंतर दर शुक्रवारी एकादशीचे दिवस वगळता फुटाणेचा प्रसाद वाटण्यात येतो. प्रति वर्षी स्थानिक फुटाण्याचे व्यापारी यांचेकडुन दर शुक्रवारी ९ किलो फुटाणे न्युनतम दराने मंजूर करुन खरेदी करण्यात येतात. माहे-मार्च-२०१४ अखेर सदर फुटाणे खरेदीची मुदत संपणार आहे. करिता माहे एप्रिल २०१४ ते माहे मार्च २०१५ अखेर या आर्थिक वर्षात प्रसादासाठी एकादशीचे दिवस वगळता दर शुक्रवारी ९ किलो प्रमाणे अंदाजे वार्षिक खरेदीत ४५० किलो फुटाणे खरेदी करणे आवश्यक आहे. त्याकामी समाधी मंदिराचे उपबजेटमध्ये रु.१,००,०००ची तरतूद करण्यात आलेली आहे.

**क)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत मंदिर परिसरात श्री साईसत्यव्रत पूजा हॉलमध्ये दररोज श्री साईसत्यव्रत पूजा करण्याची सुविधा आहे. प्रत्येक पूजेकरीता पुजेच्या चौरंगांवर दोन विड्याची पाने ठेवावी लागतात. दैनंदिन कमीत कमी अंदाजे ४०० ते ६०० नग विड्याची पाने लागतात. करीता स्थानिक दुकानदार यांचेकडुन प्रति शेकडा या न्युनतम दराने विड्याची पाने खरेदी करण्यात येतात. माहे-मार्च-२०१४ अखेर सदर विड्याची पाने खरेदीची मुदत संपणार आहे. करिता माहे एप्रिल २०१४ ते माहे मार्च २०१५ अखेर या आर्थिक वर्षात सत्यनारायण पूजेकरिता विड्याची पाने खरेदी करणे आवश्यक आहे. त्याकामी मंदिर विभागाचे बजेटमध्ये रु.१,६०,०००ची तरतूद करण्यात आलेली आहे.

**ड)** श्री साईबाबांच्या दर्शनासाठी देशातुन तसेच विदेशातुन अनेक सन्माननीय व्यक्ति येत असतात. या मान्यवर अतिर्थीचा संस्थानचे वतीने यथोचित सत्कार करण्यात येतो. सत्कारामध्ये मा.अध्यक्ष साहेब, मा.उपाध्यक्ष साहेब, मा.विश्वस्त, मा.कार्यकारी अधिकारी साहेब अथवा मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब जनसंपर्क अधिकारी सूचनेनुसार मान्यवरांचे सत्कार प्रसंगी पावडरमार्बल मूर्ती देण्यात येते. करिता प्रति वर्षी मागणीनुसार ३ नंबर, ४ नंबर, व ५ नंबरच्या पावडर मार्बल मूर्ती खरेदी करण्यात येतात. सन-२०१३-१४ची पावडर मार्बल मूर्ती पुरविण्याची मुदत दि.३१ मार्च,२०१४ अखेर संपत असल्यामुळे माहे-एप्रिल-२०१४ ते माहे-मार्च-२०१५ या वर्षाकरिता पावडर मार्बल मूर्ती खरेदी करणे कामी दरपत्रके (निविदा) मागविणे आवश्यक आहे.

**इ)** तसेच मा.राष्ट्रपती, मा.उपराष्ट्रपती, मा.मंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, भारत सरकार, मा.सुप्रिम कोर्ट व इतर कोर्ट, मा.खासदार किंवा व्ही.व्ही.आय.पी., व्ही.आय.पी. व इतर महत्वाचे व्यक्ती श्रींचे दर्शनासाठी समाधी मंदिरात येत असतात. त्यांचा संस्थानचे वतीने शॉल, श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात येतो. काही व्यक्तिंना वेळप्रसंगी प्युअर मार्बल मूर्ती संस्थानमार्फत भेट देण्यात येते. ती ऐनवेळी शिर्डीतील स्थानिक मार्केट मधुन थेट खरेदी करण्यात येते. अशा प्युअर मार्बल मूर्ती आवश्यकतेप्रमाणे थेट खरेदी करणेस व त्याचे होणारे बीलाची रक्कम लेखाशाखा विभागामार्फत अदा होणेस मान्यता असावी ही विनंती.

तसेच व्हीव्हीआयपीसाठी प्युअर मार्बल मूर्ती स्थानिक व्यापारी यांचेकडुन आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी थेट खरेदी करणेकामी व सदर बील लेखाशाखाविभागामार्फत अदा होणेस मान्यता मिळावी, ही विनंती. सदर पावडर मार्बल व प्युअर मार्बल मूर्ती खरेदीकामी मंदिर विभागाचे बजेटमध्ये रु.७,००,०००ची तरतूद करण्यात आलेली आहे.

तरी खालीलप्रमाणे साहित्य खरेदीकामी पुरवठादारांकडून दरपत्रक (निविदा) मागविणेसाठी वृत्तपत्रात जाहिरात देणे गरजेचे आहे.

| अ.क्र | तपशील | अंदाजे मागणी | अंदाजे दर | | | अंदाजे खर्च रुपये | एकूण खर्च रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | रुपये | पैसे | प्रमाण | | |
| अ) | **गोवरी खरेदी** रानशेणी गोवरी | १,५०,००० किलो | ०७ | ५० | /किलो | ११,२५,०००/- | १५,००,०००/- |
| | थापील गोवरी | ५०,००० किलो | ०७ | ५० | /किलो | ३,७५,०००/- | |
| ब) | **चणा-फुटाणा** | ४५० किलो | ६० | ०० | /किलो | २७,०००/- | २७,०००/- |
| क) | **नागीणीचे पाने** | ४,००,००० नग | ०३ | ०० | /नग | १,२०,०००/- | १,२०,०००/- |
| ड) | **पावडर मार्बल मूर्ती** ०३ नंबर मूर्ती | ५० नग | ११० | ०० | /नग | ५,५००/- | ६१,०००/- |
| | ०४ नंबर मूर्ती | १०० नग | १६५ | ०० | /नग | १६,५००/- | |
| | ०५ नंबर मूर्ती | ७५ नग | ५२० | ०० | /नग | ३९,०००/- | |

तरी उपरोक्त नमूद केल्यानुसार प्रति वर्षाप्रमाणे माहे-एप्रिल-२०१४ ते माहे-मार्च-२०१५ अखेर या आर्थिक वर्षाकरिता **इ** प्रमाणे प्युअर मार्बल मूर्ती आवश्यकतेप्रमाणे थेट खरेदी करणेस व त्याचे होणारे बीलाची रक्कम लेखाशाखा विभागामार्फत अदा होणेस मान्यता असावी ही विनंती. तसेच **अ, ब, क, ड** करीता जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमान पत्रात जाहिरात देवून बंद पाकिटात निविदा (दरपत्रके) मागविणेसाठी मान्यता घेणेकामी मा त्रिसदस्यीय समितीचे सभेत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.११६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं.३७** **माहे फेब्रुवारी- २०१४ अखेर गुंतवणूकीविषयी निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** माहे **फेब्रुवारी,२०१४** अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|
| १) आंध्रा बँक, शिर्डी (NPAY) | १०/०२/२०१४ | ४१,६१,५६० /- |
| २) सेंट्रल बँक अ ॉफ इंडिया,शिर्डी | ०२/०२/२०१४ | १६,४२,१९,२१६/- |
| ३) सेंट्रल बँक अ ॉफ इंडिया,शिर्डी | १६/०२/२०१४ | १०,९४,७९,४७७/- |
| ४) सेंट्रल बँक अ ॉफ इंडिया,शिर्डी | १६/०२/२०१४ | १,०९,४७,९४८/- |
| ५) कॅनरा बँक | २५/०२/२०१४ | १९,७४,४८,६४४/- |
| ६) कॅनरा बँक | २८/०२/२०१४ | १४,२६,८५,४२२/- |
| ७) दैनंदिन खर्च वजा जाता माहे फेब्रुवारी -२०१४ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | १०,००,००,०००/- |
| **एकूण रक्कम** | | **७२,८९,४२,२६७/-** |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम रु. ७२.८९ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याजदराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवून जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे:-

१) आंध्र बँक, शिर्डी
२) बँक ऑफ बरोडा, नासिक
३) बँक ऑफ इंडीया, शिर्डी
४) कॅनरा बँक, शिर्डी
५) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
६) कॉर्पोरेशन बँक, शिर्डी
७) देना बँक, शिर्डी
८) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
९) युको बँक, शिर्डी
१०) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
११) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
१२) विजया बँक, शिर्डी
१३) इंडीयन बँक, शिर्डी
१४) ओरीएंटल बँक ऑफ कॉमर्स, शिर्डी

१५) स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिर्डी

तरी अ.नं. १ ते १५ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवून जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.७२.८९ कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी सदरचा विषय मा व्यवस्थापन समितीच्या मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.११७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अ.नं. १ ते १५ या स्थानिक राष्ट्रीयीकृत सेवा देणाऱ्या बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.७२.८९ कोटी मात्रची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.३८** **संस्थानचे संपर्क व्यवस्थेसाठी असलेल्या ग्रुपमोबाईल सेवेबाबत.**

**विषय नं.३९** **श्री साईभक्तांकरीता मार्गदर्शनासाठी IVRS (Interactive Voice Response System) सुविधा सुरु करणेबाबत**

**निर्णय क्र.११८** **विषय नं.३८ व ३९ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.४०** **लोखंडी बॅरीकेटस् तयार करुन मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** व्दारावती भक्तनिवास इमारतीचे पश्चिमेकडील बाजुस संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालय व उप प्रसादालय आहे. तसेच इमारतीचे समोर दक्षिणेकडील बाजुस बगीचा आहे. एकंदरीत या सर्व कारणांमुळे इमारतीचे परीसरात येणा-या जाणा-यांची मोठया प्रमाणात वर्दळ सुरु असते. तसेच इमारतीचे समोरील बगीचामध्ये सकाळ व संध्याकाळी गावातील/ परीसरातील नागरीक व्दारावती इमारती समोर दुचाकी वाहने लावून निघून जातात. त्यामुळे भक्तांना त्यांची वाहने पार्कींगमध्ये लावणेस अडचण निर्माण होते. याकरीता व्दारावती भक्तनिवास इमारती समोरील गेटवर बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन मागवून बॅरीकेटस् तयार करुन घ्यावे लागणार आहे. बॅरीकेटस् तयार करणेकरीता लागणा-या मटेरीअलचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | एम.एस.`सी ` चॅनल,<br>साईजः- १२५ x ६५ x ६५ एम.एम. | ४६० किलो. | रु. ५५/-<br>(प्रति किलो) | रु. २५,३००/- |
| ०२) | एम.एस.राऊंड पाईप, हेवी<br>साईज :- ५० x ३ एम.एम. | २४० फूट | रु. ५०/-<br>(प्रति फूट) | रु. १२,०००/- |
| ०३) | एम.एस.राऊंड टिकल्या,<br>साईज :- ५० x २ x ३ एम.एम. | ५ किलो. | रु. ७०/-<br>(प्रति किलो) | रु. ००,३५०/- |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु. ३७,६५०/-** |

उपरोक्तप्रमाणे लोखंडी बॅरीकेटस तयार करणेकामी अंदाजे रक्कम रुपये ३७,६५०/- मात्र खर्च येणे अपेक्षित आहे.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.११९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती भक्तनिवास इमारती समोरील गेटवर बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन मागवून बॅरीकेटस् तयार करुन घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३७,६५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.४१** **कॅन्टीन विभागासाठी कॅरेटस खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग-१) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम मधील १७ (१) मधील कलमानुसार भक्तांना आवशक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

**प्रास्ताविक-** कॅन्टीन विभागाकडे सध्या पूर्वीची ३३२ व संदर्भिय आदेशान्वये खरेदी केलेले ५० असे एकुण ३८२ कॅरेटस् असून त्यापैकी ६० कॅरेटस् तुटले असून स्टोअरमध्ये जमा आहेत.त्यापैकी फक्त ३२२ कॅरेटस् वापरात आहेत.कॅरेटस्चा वापर मोफत लाडु प्रसादाची पाकीटे ,विक्रीसाठी असलेली लाडुप्रसादाची पाकीटे, नाष्टा पाकीटे व दुधाच्या पिशव्या ठेवणेसाठी करण्यात येतो.तसेच कॅरेटसचा् दैनंदिन वापर असलेने व सदरचे कॅरेटस् प्लास्टीकचे असलेने तुटून निकामी होतात.तुटलेले कॅरेटस् वापरता येत नाहीत.त्यामुळे वेळोवेळी कॅरेटस् खरेदी करणे गरजेचे आहे.सध्या साईभक्तांची प्रचंड गर्दी असलेने उपलब्ध असलेले कॅरेटस् कमी पडत आहेत.लाडु प्रसाद विक्री व मोफत लाडु प्रसादाचे वाटपाचे ठिकाणी जास्तीत जास्त कॅरेटस्मध्ये लाडु प्रसादाची पाकीटे भरुन ठेवणे गरजेचे आहे. त्याकरीता आणखी जादा कॅरेटस् खरेदी करणे आवश्यक आहे.

**मागणी-** प्रसादालयाकडून कॅरेटस् भरुन वाहनाव्दारे विक्रीचे व मोफत लाडु प्रसाद वाटपाचे ठिकाणी भरलेली कॅरेटस् आणवी लागतात,सध्या उपलब्ध असलेले कॅरेटस् कमी पडत असलेने आणखी २०० नग कॅरेटस् खरेदी करणे आवशक आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** यापुर्वी निलकमल कंपनीचे JCB५४०(L) X३६०(B) X४०० (H) या साइजचे ५० कॅरेटस् खरेदी केले असून सदरचे कॅरेटस् मजबूत व टिकाऊ आहेत.तरी याच कंपनीचे आणखी २०० कॅरेटस् खरेदी कामी रु. १०००/- प्रति नग यादराप्रमाणे एकुण रु.२,००,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी कॅन्टीन विभागाकरीता निलकमल कंपनीचे प्लॅस्टीक कॅरेटस् खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने खरेदी करणेचे प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा होवून निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१२० **यावर सविस्तर चर्चा होऊन, कॅन्टीन विभागासाठी आवश्यक असलेले निलकमल कंपनीचे JCB५४०(L) X३६०(B) X४०० (H) या साइजचे २०० कॅरेटस् विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

विषय नं.४२ **प्रसादलाडू, नाष्टापाकिटावरील छपाई केलेले श्री साईबाबांचे नाव काढणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद:** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग चार) मध्ये महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीनुसार आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणेबाबतची तरतुद केलेली आहे.

**प्रस्ताविक:** साईभक्त अनुराधा धीमान, नोईडा यांनी त्यांचे दि.०९/१०/२०१३ चे पत्राने लाडू प्रसादाच्या पाकिटावर श्री साईबाबांचे नाव छापील असून, प्रसादलाडू खाल्ल्यानंतर भक्त सदरील पाकिटे फेकून देत असल्याने ते पायाखाली येत आहे. त्यामुळे कोऱ्या पाकिटामध्ये प्रसादलाडूचे वितरण करावे असे नमुद केलेले आहे.

साईबाबा संस्थान मार्फत दि.१५ ऑगष्ट २०१३ पासून सर्व साईभक्तांना सकाळी मंदिर उघडल्यापासून ते मंदिर बंद होईपर्यंत जे साईभक्त दर्शन लाईनमधून दर्शन घेतील अशा साईभक्तांना ५० ग्रॅमचे २ लाडूचे पाकीट देण्यास सुरुवात केलेली असून ते कमी पडणार नाही याकडे जातीने लक्ष घालीत आहे. तसेच या व्यतिरीक्त ज्या भक्तांना प्रसादरुपी जादा लाडूचे पाकिटे पाहिजे आहे अशा साईभक्तांसाठी पुर्वीच्या ठिकाणी असलेल्या लाडू काऊंटरवर जादा काऊंटर सुरु ठेवण्यात आले असून त्यांची विक्री करण्यात येत आहे. सदरील प्रसादलाडूसाठी ६x७ साईजची, ग्लासिन लॅमिनेटेड पेपर पिशवी वापरणेत येत असून सदरील पिशवीवर श्रद्धा, सबुरी, सबका मालीक एक, श्री साईबाबा संस्थान व इतर लाडूबाबत माहिती असून दुसऱ्या बाजूस श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) असे मराठीत व इंग्रजीत असून श्रद्धा, सबुरी, पत्ता व वेबसाईट, ई-मेल, दूरध्वनी क्रमांकाची छपाई केलेली आहे. तसेच सकाळी सकाळी ६ ते १० या वेळेत प्रसादलाडू काऊंटर शेजारील काऊंटरवर, साईबाबा भक्तनिवासस्थान व द्वारावती येथे नाष्टा पाकिटाचे वितरण होत असून सदरील ८x१० साईजच्या पिशवीवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी असे मराठी व इंग्रजीत एका बाजूस छपाई केलेले आहे.

लाडूप्रसाद व नाष्टापाकिटाच्या पिशवीवर साईबाबा संस्थानचे नाव, पत्ता, वेबसाईट व इ-मेल छपाई केलेले असल्याने त्यात श्री साईंचे नाव येते. सदरील पाकिटे लाडू अथवा नाष्टा खाल्ल्यानंतर सदरचे पाकिटे कचऱ्यात अथवा खाली इतरत्र टाकल्याने पायदळी येतात. परिणामी साईभक्तांच्या भावना दुखावल्या जातात अशा वेळी साईभक्त पाकिटावर साईबाबांचे नाव, फोटो टाकू नये बाबत सुचना करतात.

**मागणी :** साईभक्तांच्या मागणीनुसार सदरील पाकिटावरील ज्या ठिकाणी साईबाबांचे नाव तसेच श्रद्धा व सबुरी नांव येते असे सर्व नावे काढून टाकणेत येऊन त्याऐवजी श्री साईबाबा संस्थान शिरडी ट्रस्टचा इंग्रजीमधील शॉर्टफॉर्म S.S.S.T.Shirdi असे नाव टाकणेत येऊन लाडूबाबत इतर आवश्यक ती माहिती ठेवता येईल.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत:** प्रसादलाडू व नाष्टा पाकिटावरील ज्या ठिकाणी साईबाबांचे नाव, श्रद्धा, सबुरी येते असे सर्व नाव काढून टाकणेत येऊन त्याऐवजी श्री साईबाबा संस्थान शिरडी ट्रस्टचा इंग्रजीमधील शॉर्टफॉर्म S.S.S.T.Shirdi व इतर आवश्यक माहिती टाकणेकामी सदरील विषय मा.व्यवस्थापन त्रिसदस्यीय समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१२१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसादलाडू व नाष्टा पाकिटावरील ज्या ठिकाणी साईबाबांचे नाव, श्रद्धा, सबुरी येते असे सर्व नाव काढून टाकणेत येऊन, त्याऐवजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीचा इंग्रजीमधील शॉर्टफॉर्म S.S.S.T.Shirdi व इतर आवश्यक माहिती छपाई करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.४३** **संगणक प्रि-प्रिंटेड मोफत भोजन तिकीटे (प्रि-प्रिंटेड कंटीन्युअस) छपाईबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग चार) मध्ये महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीनुसार आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेण्याचे तसेच २१ (१-घ) नुसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

**प्रस्ताविक**: श्री साई प्रसादालयामध्ये संगणकाद्वारे साईभक्तांसाठी पेड भोजन, मोफत भोजन व विशेष भोजनासाठी तिकीटस/कुपन्स देण्यात येत आहे. यापूर्वी जा क्र.एसएसएस/खरेदी-प्रसाद/६०८६/२०१२ दि.०३/०३/२०१२ अन्वये खरेदी विभागामार्फत २५ लाख फॉर्म्स रु.४०.९५ प्रती फॉर्म्स दराने मे.विनायका कंटीन्युअस स्टेशनरी प्रा.लि, पुणे यांना छपाई करणेकामी पुरवठा आदेश देणेत आलेला होता. सदरील छपाई ही दि.१५/०६/२०१२ रोजी आलेली होती. सदरील छपाईचा साठा पुरेशा प्रमाणात असल्यामुळे सदरची छपाई

सन २०१३-१४ च्या वार्षिक छपाई मध्ये देण्यात आलेली नव्हती. परंतु मोफत भोजन देणाऱ्या देणगीदार भक्तांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे सदर छपाईचा साठा साधारणपणे एक महिनाभर पुरेल इतका शिल्लक आहे. त्यामुळे सदरील प्रि-प्रिंटेड मोफत भोजन कुपन्स छपाई करणे गरजेचे आहे. श्री साईभक्तांच्या वाढत्या देणगी रकमेचा विचार करीता ४० लाख फॉर्म्स छपाई करावी लागेल.

**मागणी:** संगणक प्रि-प्रिंटेड मोफत भोजन कुपन्स ४० लाख फॉम्स छपाई करणेस अंदाजे खर्च रु.३,२०,०००/- अपेक्षित आहे. सदरील मोफत प्रसादभोजन कुपन्सची छपाई ही खरेदी विभागामार्फत करता येईल.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत:** साईभक्तांची प्रसादभोजन घेणेकामी गैरसोय होऊ नये म्हणून सदरील संगणक प्रि-प्रिंटेड मोफत प्रसादभोजन कुपन्सची छपाई करणे अत्यंत गरजेचे आहे. तरी ४० लाख फॉर्म्स छपाई खरेदी विभागामार्फत करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३,२०,०००/-पर्यंतचे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१२२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयासाठी आवश्यक असणारी संगणक प्रि-प्रिंटेड मोफत भोजन तिकीटांची (प्रि-प्रिंटेड कंटीन्युअस) ४० लाख फॉर्म्स विहीत पध्दतीने छपाई करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३,२०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.४४** **स्टीम बॉयलरकरीता स्पेअरपार्ट खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

**प्रास्ताविक:-** श्री साई प्रसादालयात दर्‌रोज सरासरी सुमारे ४२,००० साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेतात. तसेच गर्दीचे कालावधीमध्ये ८५००० साईभक्त प्रसादभोजााचा लाभ घेतात. श्री साई प्रसादालयात दैनंदिन प्रसाद भोजन तयार करणेकरीता लागणा-या वाफेची निर्मीती सोलर प्रकल्पाद्वारे तसेच थरमॅक्स कंपनीच्या बॉयलरद्वारे केली जाते. सन १९९८ पासून स्टिम निर्मीतीकरीता थरमॅक्सचा बॉयलर ४०० कि.ग्रॅ/तास क्षमतेचा तसेच जानेवारी २००९ पासून ८५० क्रि.ग्रॅ./तास क्षमतेचा दुसरा बॉयलर कार्यान्वित आहे. बॉयलर व्यवस्थीत चालू रहाणेसाठी थर्मेक्स कंपनीचे सर्व्हीस डिलर मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना गेल्या आठ वर्षापासून बॉयलर सर्व्हीसींगचे वार्षिक सर्व्हीस कॉंट्रॅक्ट दिलेले आहे.

RXD- ८५० स्टीम बॉयलरची क्वॉईल, इकोनोमायझर टाकून तीन वर्ष होत आलेली आहे. क्वॉईल व इकोनोमायझर लिकेज झालेस सदरचे स्पेअरपार्ट स्टॉक मध्ये असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे दैनंदिन वापराने फोटो सेल खराब होऊन स्टिम बॉयलर बंद राहु शकतो. त्यामुळे क्वॉईल, इकोनोमायझर, फोटो सेल व इतर आवश्यक स्पेअरपार्ट स्टॉकमध्ये असणे आवश्यक आहे. तशी मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचे टेक्नीशियनने दिनांक ३.१२.२०१३ रोजीचे स्टीम बॉयलर सर्व्हिसींगचे वेळेस अत्यावश्यक स्पेअरपार्ट बाबत सर्व्हिसरिपोर्ट मध्ये नोंद केलेली आहे.

थर्मेक्स बॉयलरचे स्पेअरपार्ट सर्व्हीस डिलर मार्फतच मिळत असलेने व इतरत्र बाजारात मिळत नाही. अचानक बॉयलर ब्रेकडाऊन झाल्यास लागणाऱ्या स्पेअरपार्ट अभावी बॉयलर बंद राहून प्रसादालयातील प्रसादभोजनाच्या सेवेवर त्याचा परिणाम होतो. त्यामुळे मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना दुरध्वनीव्दारे व बॉयलर सर्व्हिसींगला आलेल्या टेक्नीशियनला दरपत्रक पाठविणेस कळविणेत आलेले होते. त्यानुसार त्यांचेकडुन दिनांक १३.१२.२०१३ रोजी दरपत्रक प्राप्त झालेले आहे. त्यानुसार उपरोक्त संदर्भिय दरपत्रक व दोन्ही बॉयलरसाठी आवश्यक स्पेअरपार्ट खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कोड नंबर | स्पेअरपार्टचे नाव | नग | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1. | P22BE30040 | 8603112400 Photoresistor QRA10C | 02 | 55710.00 | 111420.00 |
| 2. | PRXECO0020 | ECONOMISER FOR 850 | 01 | 78937.00 | 78937.00 |
| 3 | PGRX262122 | COIL FOR 850 | 01 | 160620.00 | 160620.00 |
| 4 | P36SS2013M | VALVE SAFETY FOR 850 | 01 | 6630.00 | 6630.00 |
| 5 | PBR5730009 | DIFFUSER PLATE FOR 850 | 02 | 593.00 | 1186.00 |
| 6 | PBR5730001 | DIFFUSER PLATE FOR 400 | 01 | 539.00 | 539.00 |
| 7 | PBR 5730011 | STUDE FOR DIFFUSER PLATE | 09 | 143.00 | 1287.00 |
| 8 | P41PG10160 | PRESSURE GAUGE 0-25 100mm 3/8 BSP BACK | 01 | 848.00 | 848.00 |
| | | | | Total | **361467.00** |
| | | | | M. Vat @12.5% | 45183.37 |
| | | | | Packing & forward@4 % | 16266.01 |
| | | | | **Total =** | **4,22,916.38** |
| | | | | **Grand Total =** | **4,22,916.00** |

(अक्षरी रुपये चार लाख बावीस हजार नऊशे सोळा मात्र + वाहतुक.)

**मागणी:-** वरीलप्रमाणे स्टीम बॉयलरचे स्पेअरपार्ट मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून खरेदी करता येतील. त्याकामी येणाऱ्या रक्कम रु. ४,२२,९१६/- + वाहतुक खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** तरी वरीलप्रमाणे स्पेअरपार्ट मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु. ४,२२,९१६/- (अक्षरी रुपये चार लाख बावीस हजार नऊशे सोळा मात्र) + वाहतुक चे खर्चास मान्यता घेणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालमधील स्टीम बॉयलरकरीता प्रस्तावात नमुद केलेले स्पेअरपार्ट मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु. ४,२२,९१६/- मात्र + वाहतुक चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.४५** **श्री साईप्रसादालयाकरीता हायड्रोलिक पॅलेट ट्रक खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम व २१ (१- घ) नुसार भक्तांना जेवन पुरवणे व अन्नछत्र चालवणे.

**प्रास्ताविक:-** श्री साईप्रसादालयात साईभक्तांना प्रसाद भोजन बनविणेकामी प्रसादालयातील आटा, गहू, लाडुप्रसाद मटेरियल, नाष्टापाकिट मटेरियल, भाजीपाला व प्रसादभोजन मटेरीयल वाहणेकामी नविन प्रसादालय सुरु झालेपासुन निलकमल लि. यांचेकडुन सन २००८ मध्ये खरेदी केलेल्या NK- २५ DF मॉडेलच्या चार व NK- २५ BF मॉडेलच्या दोन एकुण सहा हायड्रोलिक पॅलेट ट्रकचा वापर करणेत येत आहे.

पाच-सहा वर्षापासून नेहमीचे वापराने काही हायड्रोलिक पॅलेट ट्रक खराब झालेल्या आहेत. काही ट्रकचे फ्रेम, शॉफ्ट, हॅन्डल व व्हिलचे पट्ट्या दैनंदिन वापराने बेन्ड झालेल्या आहे. हायड्रोलिक पॅलेट ट्रकचा वापर जास्त असल्याने वेळोवेळी दुरुस्ती करण्यात येतात. परंतु मेन्टेनंन्स जास्त वाढल्याने ट्रकचे स्पेअर पार्टची किमंत ट्रकच्या किमंती एवढी होत आहे. त्यामुळे नविन ट्रक खरेदी करणे उचित राहील. एका हॅड्रोलिक पॅलेट ट्रक साठी अंदाजे रु.३०,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

**मागणी:-** श्री साईप्रसादालयातील भाजीपाला, आटा, कडधान्य, तांदुळ, किरणा मटेरियल, लाडू प्रसादसाठी तुप, बेसन, तसेच तयार झालेले चपाती, पुरी, लाडूप्रसाद, नाष्टा पाकीट इत्यादी ची वाहतुक हायड्रोलिक पॅलेट ट्रकचा अत्यंत उपयोग होत आहे. दररोज अंदाजे २००- २५० क्विंटल मटेरीयलची वाहतुक करण्यात येते. प्रसादालयील कामकाजात गतीमानता येणेकरीता हायड्रोलिक पॅलेट ट्रक अत्यंत महत्वाचे काम करत आहे. प्रसादालयातील गरजेनुसार एकुण सहा हॅड्रोलिक पॅलेट ट्रकची आवश्यकता आहे. त्यामुळे सहा हायड्रोलिक पॅलेट ट्रककरीता अंदाजे रक्कम रु. २,००,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे. सदरच्या खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन विहीत पद्धतीने हॅायड्रोलिक पॅलेट ट्रक खरेदी करता येतील.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** तरी साईप्रसादालया करीता ६ नग हाड्रोलिक पॅलेट ट्रक विहीत पद्धतीने खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख मात्र) पर्यतच्या खर्चास मान्यता घेणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयाकरीता ६ नग हायड्रोलिक पॅलेट ट्रक विहीत पद्धतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.४६** **श्री साईप्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्पास केन्द्रीय अपारंपारीक उर्जा मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडून मिळालेल्या पुरस्काराचा वृत्तांत मा.व्यवस्थापन समिती सभेस अवलोकनार्थ सादर.**

**प्रस्ताव-** अपारंपारीक उर्जा मंत्रालयाचे दिनांक ६.१२.२०१३ रोजीचे ईमेल पत्रानुसार केंद्र सरकारच्या अपारंपारीक उर्जा मंत्रालयाने श्री साईबाबा संस्थानने श्री साईप्रसादालयात धार्मिक क्षेत्रातील सर्वात मोठा सोलर स्टीम कुकींग प्रकल्प उभारलेबद्दल पुरस्कार जाहीर केलेचे व पुरस्कार स्विकारणेकामी दि. १७.१२.२०१३ रोजी हॉटेल अशोक नवि दिल्ली येथे आमंत्रित केलेले होते.

त्यानुसार दि. १७.१२.२०१३ रोजी सकाळी ९.०० वाजता हॉटेल अशोक येथे पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम झाला. संस्थानचे वतीने मा.डॉ. संजीवकुमार, जिल्हाधीकारी तथा सदस्य, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था व श्री अमृत जगताप, सहाय्यक अभियंता हे नवि दिल्ली येथे पुरस्कार स्विकारणेकामी उपस्थित राहणार होते. परंतु काही कारणास्तव मा. जिल्हाधिकारी सो. उपस्थित राहू शकले नाही. त्यामुळे मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचे सुचनेनुसार श्री अमृत जगताप सहाय्यक अभियंता यांनी मा. श्री फारुख अब्दुला ( केंद्रीय अपारंपारीक उर्जा मंत्री, नवि दिल्ली ) यांचे हस्ते तसेच श्री सतिष अग्निहोत्री (मुख्य सेक्रेटरी, अपारंपारीक उर्जा मंत्रालय, नवि दिल्ली) व श्री तरुन कपूर (जॉईन्ट सेक्रेटरी, अपारंपारीक उर्जा मंत्रालय, नवि दिल्ली) यांचे प्रमुख उपस्थितीत संस्थानचे वतीने पुरस्कार स्विकारलेला आहे. पुरस्कारामध्ये ट्रॉफी व प्रशस्तीपत्रक दिलेले आहे. तसेच संस्थानचे सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाबाबत माहिती घेऊन इतर क्षेत्रातील संस्थाना अपारंपारीक सौर उर्जाचा वापर करणेची प्रेरणा मिळणेकरीता संस्थान प्रकल्पाची सिडी व पुस्तिका केद्रीय अपारंपारीक उर्जा मंत्रालयाने प्रकाशित केलेली आहे.

**मागणीः-** अपारंपारीक उर्जा क्षेत्रात श्री साईबाबा संस्थानला केंद्र शासनाच्या वतीने मिळालेला पुरस्कारामुळे संस्थानचे नावलौकीकात भर पडलेली आहे. सदर पुरस्काराबाबत मा. व्यवस्थापन समितीस कळविणे आवश्यक आहे.

**विभागाचा अभिप्राय /स्पष्ट मतः-** श्री साईप्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्पास देशातील धार्मिक क्षेत्रातील सर्वात मोठा प्रकल्प म्हणून केद्रीय अपांरपारीक उर्जा मंत्रालयाकडून दिनांक १७.१२.२०१३ रोजी नवि दिल्ली येथै श्री फारुक अब्दुला, केद्रीय अपारंपारीक उर्जा मंत्री, भारत सरकार यांचे हस्ते गौरविणेत आलेले आहे. तरी सदरची माहीती मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर अवलोकानार्थ सादर.

**निर्णय क्र.१२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.४७** **इंडियन ऑईल कॉर्प्रोरेशन लि., यांचेकडील एल.पी.गॅस खरेदीकामी ॲडव्हान्स रक्कमेत वाढ करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूदः-** सन्न २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नूसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

**प्रस्ताविकः-** मा.व्यवस्थापन समिती दिनांक ३१/०३/२००७ चे सभेतील निर्णय क्रं.२४९ (९) दि.११/०८/२००७ चे सभेतील निर्णय क्रं. ६८४ व दि.१२/०६/२०११ चे सभेतील निर्णय क्रं. ४१७ व मा.व्यवस्थापन समिती दिनांक ६.४.२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३३७ अन्वये श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजन, मोतीचूर लाडू व बर्फी व अन्नपाकीटे तयार करणेसाठी इंडियन ऑईल कार्पो.लि. या पेट्रोलियम कंपनीकडून गॅस खरेदीस व त्याकामी दोन गॅस टँकरचे (सुमारे २४ टन) लोडकरीता रक्कम रु.२०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.वीस लाख मात्र) इंडियन ऑईल कार्पो.लि. यांचेकडे ॲडव्हान्स म्हणून जमा केलेली आहे.

आज मितीस एल.पी. गॅसचा प्रती किलोचा दर रु. १०९/- आहे. त्यामुळे १२ टन गॅस टॅकरसाठी रक्कम रु. १३,०८,०००/- खर्च येत आहे. दिवसेंदिवस गॅसचे दरात मोठी वाढ होत आहे. दोन टँकर गॅससाठी (२४ टन) सध्या रु.४०,००,०००/- इंडियन ऑईल कार्पो.लि. यांचेकडे ॲडव्हान्स म्हणून जमा करणे आवश्यक आहे. गॅस टँकर आल्यानंतर गॅस बीलाची दप्तरी नोंद घेणे, प्रशासकिय मान्यता घेऊन बीले लेखाशाखेत पाठविणे, लेखाशाखेकडून बीलाची तपासणी होऊन बीलाची रक्कम R.T.G.S द्वारे इंडियन ऑईल कार्पो.लि. वर्ग करणेस सुमारे ८-१० दिवसाचा कालावधी जातो. त्यादरम्यान भक्तांच्या

गर्दीत वाढ झाल्यानंतर गॅस टँकरची मागणी करावी लागल्यास व पूर्वीचे बीलाचे रक्कम कंपनीकडे वर्ग झालेली नसल्यास टँकर भरुन मिळत नाही. गॅसचा साठा मर्यादेपेक्षा कमी झाल्यास गॅसचा प्रेशर कमी होवून प्रसादभोजन, प्रसाद लाडू, अन्नपाकीटे इत्यादी बनविणेकामी विलंब लागतो.

**मागणी:-** गर्दीच्या वेळी किचनमध्ये गॅसअभावी प्रसादभोजन बनविणेकामी अडचणी येऊ नये व प्रत्येक वेळी बीलाची रक्कम कंपनीकडे तातडीने वर्ग करणे गरजेचे असते. त्यामुळे सध्या इंडियन ऑईल कार्पोरेशन लि. या कंपनीकडे रक्कम रु.२०,००,०००/- (अक्षरी रु.वीस लाख मात्र) अॅडव्हान्स म्हणून देण्यात आलेले आहे. परंतू दिवसेदिवस गॅसच्या दरात मोठया प्रमाणात वाढ होत असल्यामुळे सदरील रक्कम अपुरी पडत असून वेळेवर गॅस टँकर भरुन मिळत नाही. साईभक्तांना विना विलंब प्रसादभोजन,लाडू प्रसाद,अन्नपाकीटे, इत्यादी सुविधा पुरविणे गरजेचे असल्यामुळे सध्याची गॅस दरवाढ व भाविष्यात होणारी दरवाढ लक्षात घेता इंडियन ऑईल कार्पो.लि. या कंपनीकडे आणखी रक्कम रु.२०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.वीस लाख मात्र) अॅडव्हान्स म्हणून जमा करणे गरजेचे आहे. त्यामुळे रक्कम रु.वीस लाख मात्र लेखाशाखेमार्फत इंडियन ऑईल कार्पो.लि. यांना अॅडव्हान्स आदा करुन सदरचे कार्योत्तर खर्चास मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समितीची मान्यता घेता येईल.

**विभागाचा अभिप्राय व स्पष्ट मत:-** साईभक्तांना विना विलंब प्रसादभोजन, लाडू प्रसाद, अन्नपाकीटे, इत्यादी सुविधा पुरविणेकामी पुरेसा एल.पी.जी.गॅस साठा संस्थानकडे उपलब्ध असणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे विषयाचे गांभिर्य लक्षात घेता इंडियन ऑईल कार्पो.लि. या कंपनीकडे आणखी रक्कम रु.२०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.वीस लाख मात्र) अॅडव्हान्स म्हणून जमा करणेस व सदरील कार्योत्तर खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती सभेपुढे निणयार्थ सादर.

निर्णय क्र.१२६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

विषय नं.४८ **एल.पी. गॅस स्टोअरेज टँक परवाना नुतनीकरण करणेकामी झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

**प्रस्ताविक:-** जुन्या गॅस प्लॅटला १० टन क्षमतेच्या २ टाक्या बसविणेत आलेल्या असुन सदर गॅसचा उपयोग लाडू प्रसाद तयार करणेसाठी व कॅन्टिन विभागाच्या चहा,दुध व कॉफीसाठी करणेत येत आहेत. तसेच श्री साईप्रसादालयातील मांउुडेड गॅस प्लॅन्ट १० टन क्षमतेच्या दोन टाक्या बसविण्यात आलेल्या आहे. दोन्ही गॅस प्लॅट यंत्रणा चालविणेकामी विस्फोटक विभाग, भारत सरकार (जॉईट चिफ कंट्रोलर ऑफ एक्सप्लोझीव्ह, वेस्ट सर्कल, नवी मुंबई यांचे कार्यलयाचे कार्यकक्षेत) यांचेकडून परवाना घेण्यात आलेला असून दि. ३१.३.२०१४ पर्यत दोन्ही परवाने नुतनीकरण करणेत आलेला आहे.

**मागणी:-** जुन्या गॅस प्लॅट व मांउडेड गॅस प्लॅन्टचा परवाना मुदत दिनांक ३१.३.२०१४ रोजी संपत असल्याने नुतनीकरण करणे आवश्यक होते. जुन्या प्रसादालयात लाडु बनविणेचे काम चालु ठेवावे लागणार असल्याने १ एप्रिल २०१४ ते ३१ मार्च २०१६ या दोन वर्षासाठी व मांउडेड गॅस प्लॅन्ट करीता १ एप्रिल २०१४ ते ३१ मार्च २०१७ या तीन वर्षासाठी जॉईट चिफ कंट्रोलर ऑफ एक्सप्लोझीव्ह, पश्चिम विभाग, भारत सरकार यांचेकडुन परवाना नुतनीकरण करणे गरजेचे आहे. प्रती वर्षासाठी प्रती गॅस प्लॅन्ट नुतनीकरण फी रक्कम रु.१०,०००/- आहे. जुन्या गॅस प्लॅन्ट पुढिल दोन वर्ष व मांउडेड गॅस प्लॅन्टच्या तीन वर्षाच्या कालावधीकरीता परवाना नुतनीकरणसाठी रक्कम रु. २०,०००/- + रु. ३०,०००/- अशी एकुण रु. ५०,०००/- फी भरावी लागणार आहे. त्यानुसार जॉईट चिफ कंट्रोलर ऑफ एक्सप्लोझीव्ह, वेस्ट सर्कल, नवी मुंबई या नावाने रु. ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार मात्र) चा डी. डी. काढलेला आहे. सदरचा खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** तरी गॅस प्लॅन्टचे परवाने नुतनीकरण करणेकामी झालेल्या रक्कम रु. ५०,०००/- चे कार्यात्तर खर्चास व भविष्यात गॅस प्लॅन्ट वापरासाठी एक्सप्लोझीव्ह विभाग भारत सरकार यांची परवाना मुदत संपलेनंतर त्याकालावधीत लागू असलेल्या शासकिय फि भरणेस मा. व्यवस्थापन समितीची लेखापरिक्षणाच्या दृष्टीने कायमस्वरुपी मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१२७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील गॅस प्लॅन्टचे परवाने नुतनीकरण करणेकामी झालेल्या रक्कम रु. ५०,०००/- चे खर्चास कार्यात्तर व भविष्यात गॅस प्लॅन्ट वापरासाठी एक्सप्लोझीव्ह विभाग भारत सरकार यांची परवाना मुदत संपलेनंतर त्याकालावधीत लागू असलेल्या शासकिय फि भरणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.४९ गावरान तुपाचे पुरवठादार यांचे प्लॅन्टच्या केलेल्या पहाणीचा अहवाल.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.११.२०१३ रोजीचे सभेत माहे.नोव्हें.१३ ते मार्च-१४ करीता आवश्यक ६००० क्विंटल गावरान तुप खरेदीबाबत निर्णय होऊन मे.अजंता राज प्रोटिन्स लि., आग्रा यांना न्युनतम दर प्रति क्विंटल रु.२९,९५०/- मात्र याप्रमाणे पुरवठा आदेश देणेबाबत निर्णय झालेला आहे. तसेच सदरचे सभेत मा.अध्यक्ष महोदय यांनी सदर पुरवठाधारक मे.अजंता राज प्रोटिन्स लि,. आग्रा यांचे प्लॅन्टची प्रत्यक्ष पाहणी करणेकामी संस्थानचे प्रतिनिधी पाठवावेत अशा सुचना दिल्या होत्या.

त्यानुसार खरेदी/भांडार विभागाकडील दि.२३.११.२०१३ चे मंजुर टिपणीन्वये दिनेश कानडे लिपीक टंकलेखक खरेदी विभाग, गोरक्षनाथ नलगे, लिपीक टंकलेखक भांडार विभाग व नवनाथ मते लिपीक टंकलेखक प्रसादालय विभाग हे तिन कर्मचारी मे.अजंता राज प्रोटिन्स लि., आग्रा येथे प्लॅन्टची पाहणी करण्यासाठी शुक्रवार दि.२९.११.२०१३ रोजी गेले होते त्यांनी केलेल्या कार्यवाहीचा तसेच पाहणीचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

१. प्रथमतः मा.वरिष्ठ पोलीस अधिक्षक, आग्रा (एस.एस.पी) यांचे कार्यालयात जाऊन तेथिल अधिकारी यांना पत्र दाखविले व त्यांनी विचारलेली आवश्यक माहिती दिली असता त्यांनी वरिष्ठ पोलीस अधिक्षक यांना समक्ष भेटण्यास सांगितले परंतु त्यावेळी ते कार्यालयात नव्हते.

२. त्यानंतर मा.जिल्हाधिकारी यांचे कार्यालयात गेलो असता तेथील उपस्थित कर्मचारी यांनी पत्र आवक विभागात देण्यास सांगितले. आवक विभागातील कर्मचाऱ्यांनी प्रथम पत्र स्विकारण्यास नकार दिला पत्र पोस्टाने पाठविण्यास सांगितले. त्यांना पत्राची पार्श्वभुमी सांगीतली असता त्यांनी पत्र स्विकारले व पत्राची पोहच दिली.

३. त्यानंतर मा.अन्न सुरक्षा अधिकारी यांचे कायार्लयात गेलो असता त्या ठिकाणी श्री.रामनरेश यादव मो.नं.०९४५४४६८३३९ हे अधिकारी उपस्थित होते. त्यांनी सदरचे पत्र स्विकारण्यास तसेच त्याची पोहच देण्यास नकार दिला तसेच पुरवठादार यांचेवर कोणत्याही प्रकारची केस दाखल झालेली नाही कोणतेही प्रकरण सुरु नाही अशी तोंडी माहिती दिली परंतु त्यावेळी अशाप्रकारचे पत्र आम्ही दिल्यास त्याचा त्या पत्राचा गैरवापर होऊ शकतो असे सांगितले. आपणास जर सदर गावरान तुपाबाबत काही शंका असल्यास आपण आम्हांस दुरध्वनीव्दारे कळवा, आम्ही या ठिकाणी सदर पुरवठाधारकावर कार्यवाही करु, असे आश्वासन दिले.

४. त्यानंतर आम्ही पुन्हा वरिष्ठ पोलिस अधिक्षक यांचे कार्यालयात जाऊन त्यांची भेट घेतली त्यांनी पत्र वाचून त्यावर कार्यवाहीकरीता शेरा मारला व सदरचे पत्र कार्यवाहीस संबधित कार्यालयास दिले परंतु त्यांचे कार्यालयाकडून पत्राची पोहच दिली नाही. त्या पत्रावर मारलेल्या शेऱ्यासह त्या पत्राचा फोटो संस्थानचे कॅमेऱ्यामध्ये काढण्यात आला आहे.

५. त्यानंतर आग्रा येथुन सुमारे ५०-६० कि.मी. अंतरावर असलेल्या (आग्रा-बाह रोड, गाव - मानिकपुरा, जि.आग्रा) मे.अजंता राज प्रोटिन्स लि, यांचे प्लॅन्टची पहाणी करण्यासाठी गेलो. प्लॅन्ट मध्ये दररोज सुमारे ४ लाख लिटर दुधाची आवक होते व या दुधापासून गावरान तुप तसेच दुध पावडर निर्माण केली जाते. प्लॅन्ट हा ॲटोमॅटिक असुन त्यामध्ये कुशल व अकुशल मिळून ६५ कर्मचारी काम करत होते. प्लॅन्टमधील कर्मचाऱ्यांबरोबर चर्चा केली. तसेच सदर पुरवठाधारकांनी निविदासोबत दिलेल्या कागदपत्रांच्य मुळ प्रती व इतर कागदपत्रांची पहाणी केली.

६. दैनिक आवक झालेल्या दुधाचा दर्जा प्रथमतः त्यांचे लॅबमध्ये तपासुन दुध स्विकारले जाते. स्विकारलेले दुध टॅंकमध्ये साठविले जाते, त्यानंतर पाश्चराईज्ड करुन दुधापासून बटर बनविले जाते, बटरपासून प्रक्रिया करुन गावरान तुप तयार करण्यात येत होते. गावरान तुप तयार झाल्यानंतर ते टिनमध्ये पॅकिंग करुन कोल्ड स्टोअरेजमध्ये साठविण्यात येते. प्लॅन्टमध्ये सध्या दुधापासून गावरान तुप व दुधपावडर हे दोन उत्पादन घेण्यात येतात. गावरान तुप बनविण्याचे प्लॅन्टचे फुड सेफ्टी व स्टॅन्डर्ड ॲथोरटी ऑफ इंडीया यांचेमार्फत देण्यात आलेल्या लायसन्स नुसार गावरान तुप उत्पादनाची वार्षिक क्षमता ३६०० टनाची आहे.

७. प्लॅन्टमध्ये दुध तसेच तुप तपासणीकरीता प्रयोगशाळा, चिलिंग प्लॅन्ट, पाश्चराईझ युनिट, कोल्ड स्टोरेज, बॉयलर रुम, डी.जी.रुम. पॅकिंग रुम, स्टोअर, वेस्ट वॉटर ट्रिटमेंट प्लॅन्ट इत्यादी युनिट होते त्याची पहाणी केली. तसेच कॅमेऱ्यामध्ये फोटो काढण्यात आले.

उपरोक्त प्रमाणे पाहणी अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे अवलोकनार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.१२८ यावर सविस्तर चर्चा होऊन, गावरान तुपाचे पुरवठादार मे.अजंता राज प्रोटिन्स लि., आग्रा यांचे प्लॅन्टच्या केलेल्या पहाणीच्या अहवालाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, भांडार विभाग)

---

**विषय नं.५० साईभक्तांना लाडू विक्री काऊंटरवर पुरेशा प्रमाणात लाडू पाकिटे उपलब्ध करुन देणे व लाडू विक्री पाकिटाचे किंमतीत वाढ करणेबाबत.**

**विषय नं.५१ सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरीता द्वारावती भक्तनिवास व परिसर स्वच्छता/ हाऊसकिपींग (आऊट सोर्सिंग) कामाबाबत.**

**निर्णय क्र.१२९ विषय नं.५० व ५१ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली.**

---

**विषय नं.५२ रबर डोअर मॅट खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** द्वारावती भक्तनिवास इमारतीमधील एकुण ३१६ खोल्या दि.५/०३/२००९ पासून साईभक्तांचे निवासाकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.या सर्व खोल्या दैनंदिन पुर्णपणे भरलेल्या असतात.

इमारतीच्या खोल्यांमध्ये भक्तांचे बुट/ चप्पलला लागलेली धुळ आत जाऊ नये तसेच खोलीमध्ये प्रवेश करतेवेळी भक्तांनी पायपुसुन आत जावे यासाठी प्रत्येक खोलीच्या दरवाजाच्या समोर (डोअर मॅट) टाकण्यात याव्यात अशी सुचना मा.प्रशासकीय अधिकारी ( निवासस्थाने) सो,यांनी राऊंडमध्ये केलेली आहे.त्यानुसार खालील तपशिलात नमुद केलेल्या डोअर मॅट खरेदी करणे आवश्यक आहे.

| अ.नं. | तपशील | साईज | १ नगाची सर्व करासह किंमत | ३५० नगाची सर्व करांसह किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | रबर डोअर मॅट<br>कंपनी- प्रेस्टीज रबर मॅट, नेपाळ किंवा इतर नामांकीत कंपनी<br>वरची व खालची बाजु- पी.व्ही.सी. रबर | २४" x १६" | १७०/- | ५९,५००/- |

उपरोक्त तपशीलात नमुद केलेप्रमाणे ३५० नग रबर मॅट खरेदी करणेसाठी अंदाजे ५९,५००/- (अक्षरी रु.एकोनसाठ हजार पाचशे मात्र) अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेस व खरेदी विभागामार्फत खरेदी करणे बाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.१३० **यावर सविस्तर चर्चा होऊन, द्वारावती भक्तनिवास इमारतीमधील खोल्यांसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ३५० नग रबर मॅट विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे ५९,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, द्वारावती निवासस्थान)

---

**विषय नं.५३ खोल्यांमध्ये छोटा साबण ठेवणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद-** २१- (१) चा (ग)- साईभक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यास सोयी व सुविधा पुरविणे.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव-** दि.१४/११/२०१३ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे बैठकीमधील विषय नंबर १० निर्णय क्रं - ९२९

**प्रस्ताविक-** श्री साईबाबा संस्थानकडील सर्व निवासस्थानातील खोल्यांमध्ये साईभक्तांना हात धुण्यासाठी छोटा साबण ठेवण्यात यावा. असा निर्णय संदर्भिय सभेत संमत झालेला आहे.

साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडे सध्या खालीलप्रमाणे खोल्या साईभक्तांचे वापरात आहेत.

| अ.क्र. | एकूण खोल्या | कायम वास्तव्यासाठी दिलेल्या खोल्या | भक्तांचे वापरासाठी शिल्लक खोल्या |
|---|---|---|---|
| १ | ५४४ | ६४ | ४८० |

उपरोक्तप्रमाणे ४८० खोल्यांमध्ये प्रत्येकी १२ ग्रॅम वजनाचा ०१ नग साबण प्रति दिवशी प्रत्येक रुममध्ये ठेवणेकामी खालीलप्रमाणे अंदाजे नग तथा खर्च अपेक्षित आहे.

| अ. क्र. | एकूण खोल्या | प्रति दिवशी आवश्यक साबण वडया | एक महिन्यासाठी आवश्यक साबण वडया | एक वर्षासाठी आवश्यक साबण वडया | अंदाजे दर रु. पै. | एकुण अंदाजे खर्च रु. पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४८० | ४८० (प्रत्येकी १२ ग्रॅमचा) | १४,४०० | १,७२,८०० | ०२. ०० | ३,४५,६००.०० |

(अक्षरी रुपये तीन लाख पंचेचाळीस हजार, सहाशे मात्र इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे.)

सदर खर्चाची तरतूद सन-२०१३/२०१४ चे मंजुर अर्थसंकल्पीय रकमेतून करता येईल.

तरी आपणास आवश्यक साबण वडया (प्रत्येकी १२ ग्रॅम वजन) नग- १,७२,८०० खरेदीकामी येणा-या रक्कम रुपये- ३,४५,६००/- अक्षरी रुपये तीन लाख पंचेचाळीस हजार, सहाशे मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस तथा खरेदी विभागामार्फत विहित पध्दतीने सदरची खरेदी करणेस व प्रत्येक रुममध्ये दररोज ०१ वडी भक्तांचे वापरास देणेचे मान्यतेस्तव सदर प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१३१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील खोल्यांमध्ये ठेवणेसाठी आवश्यक असलेल्या साबण वडया (प्रत्येकी १२ ग्रॅम वजन) १,७२,८०० नग विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रुपये- ३,४५,६००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साईबाबा भक्तनिवास)

---

**विषय नं.५४** **निवासस्थानांचे नावाबाबत.**

**विषय नं.५५** **यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ. मेन्टनन्स्/ स्वच्छता कामी मे.बी.व्ही.जी. लि.,पुणे यांना आऊटसोर्सिंग पध्दतीने दिलेल्या कामास मुदतवाढ देणे अथवा निविदा मागविणेबाबत.**

**विषय नं.५६** **साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील पेस्ट- कंट्रोल, रोडेंट कंट्रोल, फॉगिंग ट्रिटमेंट (धुरीकरण) व डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी (Anti Larval) इत्यादी कामे आहे त्याच मंजुर दरात परंतु सर्व्हिस टॅक्स लागु करुन सन दि.०१.०४.२०१४ पासुन तीन वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देऊन दर मंजुर करणेबाबत.**

**विषय नं.५७** **साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील बेडशीट, उशीकव्हर, टॉवेल व चादर धुणे/ इस्त्री करण्याचे कामास, आहे त्याच मागील वर्षाचे दरामध्ये मुदतवाढ देणेबाबत.**

**विषय नं.५८** **साईधर्मशाळा विभागाकडील बेडशिट उशीकव्हर व चादर धुणे/ इस्त्री करण्याचे कामाबाबत.**

**निर्णय क्र.१३२** **विषय नं.५४ ते ५८ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली.**

---

**विषय नं.५९** **सन २०१३-२०१४ करिता वार्षिक साहित्य खरेदी करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** बगीचा विभागा मार्फत संस्थान परिसरात मंदीर परिसर, लेंडीबाग ,नविन भक्त निवास परिसर, व्दरावती निवासस्थान इमारत परिसर, नविन प्रसादालय परिसर, शै.संकूल परिसर, साई आश्रम निवासस्थान , साई धर्मशाळा इ. ठिकाणी बाग बगीचा तयार करण्यात आलेला आहे. तसेच साठवण तलाव परिसर व साईनगर परिसर नविन भक्त निवास परिसर व धर्मशाळा परिसर या ठिकाणी नारळ झाडे लावण्यात आलेली आहेत.

संस्थान परिसरात लावण्यात आलेल्या बागेतील झाडे, रोपे व नारळ झाडे यांना वेळो-वेळी वेगवेळया प्रकारच्या खते द्यावी लागतात. तसेच या झाडांवर पडणाऱ्या रोगांसाठी, किंडीसाठी या झाडांवर वेगवेगळी किडनाशक, बुरशीनाशक, संजीवके इ. औषधांची फवारणी करणे आवश्यक असते. ऋतूमानाप्रमाणे, वातावरणातील बदल्यानुसार झाडांवर, रोपांवर औषध फवारणी करावी लागते.

सन २०१३-२०१४ या वर्षासाठी वार्षीक खर्चासाठी बगीचा विभागासाठी खालील प्रमाणे खते, औषधे व इतर बागकामाच्या वस्तूची आवश्यकता असल्याने त्या साधारणतः वर्ष भरासाठी खालील प्रमाणे मालाची/ साहित्याची आवश्यकता आहे. तपशिल खालील प्रमाणे-

| अ.नं. | मालाचा तपशिल | मागणी | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| | **औषधे** | | | |
| ०१ | राऊन्ड अप | १०० लि . | ३४० लि. | ३४००० |
| ०२ | कॉन्टाफ | ०५ लि | ५०० लि. | २५०० |
| ०३ | रोगर | ०५ लि | ३४० लि | १७०० |
| ०४ | लिडेन पावडर(फॉली डस्ट) | २० कि | १० कि रु. २०० प्रमाणे | ४०० |
| ०५ | लिफान | ०३ लि | ५५० लि | १६५० |
| | **एकुण** | | **अ** | **४०२५०** |
| | **खते** | | | |
| ०१ | डि.ए.पी. | १५ गोणी | १२५५ प्रती गोणी | १८८२५ |
| ०२ | युरिया | २० गोणी | ३२० प्रती गोणी | ६४०० |
| ०३ | निबोळी पेड | ६० गोणी | ४८० प्रती गोणी | २८८०० |
| ०४ | १०:२६:२६ | १० गोणी | ११०० प्रती गोणी | ११००० |
| ०५ | सुपर फॉस्फेट | ३० गोणी | ३६५ प्रती गोणी | १०९५० |
| ०६ | पोटॅश | २० गोणी | ८४० प्रती गोणी | १६८०० |
| | **एकुण** | | **ब** | **९२७७५** |
| | **इतर** | | | |
| ०१ | गेरु | १०० कि | रु. १२ कि | १२०० |
| ०२ | चुना | १०० कि | रु.१२ कि | १२०० |
| | एकुण | | **क** | २४०० |
| | **एकुण** | | **अ + ब + क** | **१३५४२५** |

बगीचा विभागासाठी आवश्यक असणारे खते, औषधे व बागेतील झाडांना रंगदेणेसाठी आवश्यक असणारे सामान/ साहित्य खरेदी करणेसाठी अंदाजे रु.१,३५,५००/- (रु. एक लाख पस्तीस हजार पाचशे) मात्र खर्च अपेक्षित आहे.

बगीचा विभागासाठी आवश्यक असणारे खते,औषधे इ. माल/ साहित्य खरेदी ही विहीत पध्दतीने दरपत्रक घेवून खरेदी विभागा मार्फत खरेदी करता येईल.

बगीचा विभागासाठी आवश्यक असणारे खते, औषधे इ. खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणस विंनती.

**निर्णय क्र.१३३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**
(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.६० बसेसच्या शिटांना नवीन कुशन करणे तसेच कापडी खोळी शिवणेबाबत.**

**प्रस्ताव-** वाहन विभागाकडील वापरात असलेल्या खालील तपशिलातील बसेसच्या शिटांचे कुशन व त्यावरील कापडी खोळी सततच्या वापरामुळे खराब झालेल्या आहेत.

| अ.नं. | बस क्रमांक | खरेदी दिनांक | वापर | आसन क्षमता |
|---|---|---|---|---|
| ०१ | एमएच-१७/सी-८८५१ | १३/०२/२००२ | इंग्लिश मिडीयम स्कुलबस | ५४ सिटर |
| ०२ | एमएच-१७/टी-७१०९ | २८/०८/२००६ | साईभक्तांना नगरसुल रेल्वेस्टे.ने-आण करणे | ५४ सिटर |
| ०३ | एमएच-१७/टी-७११० | २८/०८/२००६ | | ५४ सिटर |
| ०४ | एमएच-१७/टी-३३०१ | २२/११/२००८ | साईभक्तांना भक्तनिवासस्थान ते मंदीर परिसर ने-आण करणे | ५४ सिटर |
| ०५ | एमएच-१७/टी-३३०२ | २२/११/२००८ | | ५४ सिटर |
| ०६ | एमएच-१७/टी-८५०४ | २०/०३/२००७ | | ५४ सिटर |
| ०७ | एमएच-१७/टी-८५०५ | २०/०३/२००७ | | ५४ सिटर |

उपरोक्त प्रमाणे ०७ बसेसच्या शिटांना नवीन कुशन करणे कामी अंदाजे ५५० मीटर रेक्झीन तसेच शिटांना कापडी खोळी शिवणे कामी ६०० मिटर कापडाची आवश्यकता आहे.

वरील प्रमाणे आवश्यक कापड व रेक्झीन खरेदी विभागामार्फत खरेदी करण्यात येईल. तसेच खराब झालेले स्पंज बदलुन शिटांना रेक्झीन कुशन करणे कामी (सोल्युशन, तार, स्क्रु इ. मटेरिअलसह) परिसरातील कुशन वर्क्स यांचेकडून कोटेशन मागवुन करुन घेता येईल.

शिटांना कुशन करणे कामी रेक्झीन व खोळी शिवणे कामी कापड खरेदी करणेस तसेच नवीन कुशन करुन, खोळी शिलाई मजुरी या कामी अंदाजे रु.३,५०,०००/- (अक्षरी रक्कम रु. तीन लाख पन्नास हजार) पर्यंत खर्च अपेक्षीत आहे.

तरी वरील प्रमाणे ०७ बसेसच्या शिटांकरीता नवीन कुशन करुन कापडी खोळी शिवणेस व या कामी येणाऱ्या अंदाजे रु.३,५०,०००/- (अक्षरी रक्कम रु. तीन लाख पन्नास हजार) मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१३४ यावर सविस्तर चर्चा होऊन, वाहन विभागामधील प्रस्तावात नमुद केलेल्या ०७ बसेसच्या शिटांकरीता नवीन कुशन करुन कापडी खोळी शिवणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.६१ संस्थान परिसरातील पाणी नियोजनाबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे सर्व विभागांना व परिसरातील इमारतींना कनकुरी साठवण येथील साठवण तलावातून पाणी पुरवठा करण्यात येतो. कनकुरी साठवण तलाव ते ओहर हेड टँक येथून साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), व्दारावती, श्री साईप्रसादालय इमारत, रुग्णालय साईप्रसाद इ. ठिकाणी पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडुन पिण्याचे पाणी पुरवठा आवर्तन संस्थानचे साठवण तलावात ४ डिसेंबर २०१३ ते ७ डिसेंबर २०१३ या कालावधीत देण्यात येवून संस्थान साठवण तलाव भरुन देण्यात आलेला आहे. आज रोजी दि.२५ जानेवारी २०१४ अखेर पर्यंत संस्थान साठवण तलावात ३ फुट पाणी शिल्लक आहे. पुढील आवर्तनाबाबत पाटबंधारे विभागाकडे दुरध्वनीवरुन चौकशी केली असता, त्यांनी पुढील १० ते १५ दिवसात पाणी येणेबाबत सांगितलेले आहे.

मा.जिल्हा न्यायालय, अहमदनगर यांचे पत्र क्रं.३०६,सन २०१४, दिनांक १८ जानेवारी २०१४ प्राप्त झालेले आहे. उपरोक्त पत्रात मागील वर्षी मार्च महिन्यात पिण्याचे पाण्याची टंचाई जाणवली होती. त्यामुळे पाणी वाचवण्याकरीता व पाण्याच्या उपलब्धतेकरीताच्या उपाययोजनांविषयी ताबडतोब मिटींग बोलविण्यात यावी. त्यावर सविस्तर अहवाल ८ दिवसांचे आत समितीसमोर सादर करावा. असे सुचविण्यात आलेले आहे.

मागील वर्षीची परिस्थिती विचारात घेता, पाणी पुरवठा विभागाकडुन याबाबत खालीलप्रमाणे नियोजन करण्यात आलेले आहे.

**१)** संस्थान परिसरातील ज्या बोअरवेल मध्ये पाणी उपलब्ध आहे. याबाबत तपासणी करण्यात येत असून, ज्या बोअरवेलमध्ये पाणी उपलब्ध आहे त्यामध्ये इले. मोटारी बसवून ते पाणी वापरास घेणेसाठीचे नियोजन करण्यात येत आहे.

२) विहीरीतील पाणी वापरास घेणेसाठी त्या विहीरीतील गाळ काढणे तसेच विहीरीची खोली वाढविणे आवश्यक आहे. यामुळे विहीरीतील पाणी पातळीतही वाढ होईल. याकरीता विहीरीतील गाळ काढणे व विहीरीची खोली वाढविणे यासाठी स्थानिक ठेकेदारांकडुन काम करुन घेणेसाठी बांधकाम विभागामार्फत निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. त्या पुढील करावयाची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

३) पिंपळवाडी गावांसाठी पुरविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठयात माहे मार्च २०१४ पासून कपात करण्याचे नियोजित आहे.

४) कनकुरी गावांसाठी पुरविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठयात माहे मार्च २०१४ पासून कपात करण्याचे नियोजित आहे.

५) संस्थान कर्मचारी वसाहतीसाठी सोडण्यात येणाऱ्या पाण्यात कपात करण्यात आलेली आहे

६) संस्थान कर्मचारी स्टाफ-क्वॉर्टर करीता माहे मार्च २०१४ पासून दररोज एक तास पाणी पुरवठा करण्याचे नियोजित आहे. (वेळ सकाळी ७ ते ८)

७) मागील वर्षीप्रमाणेच नविन प्रसादालयकरीता श्री गोविंद कोते यांचे ४" सायफनव्दारे आवश्यकतेप्रमाणे पाणी घेण्याचे नियोजित असून त्याप्रमाणे त्यांचेबरोबर चर्चा करण्यात आलेली असून त्यांनी पाणी उपलब्ध करुन देण्याचे मान्य केलेले आहे. (साधारणतः दररोज ३ ते ४ लाख लि.पाणी उपलब्ध होईल.)

८) नविन भक्तनिवासस्थान येथे श्री कैलास जगताप यांचे ४" सायफनव्दारे आवश्यकतेप्रमाणे पाणी घेण्याचे नियोजित असून त्याप्रमाणे त्यांचेबरोबर चर्चा करण्यात आलेली असून त्यांनी पाणी उपलब्ध करुन देण्याचे मान्य केलेले आहे. (साधारणतः दररोज १ ते २ लाख लि.पाणी उपलब्ध होईल.)

९) साईनगर विहीरीचे पाणी बगीचासाठी बंद करुन त्या पाण्याचा वापर स्टाफ क्वॉर्टर येथे पिण्यासाठी करता येईल. (साधारणतः दररोज ३० हजार लि.पाणी उपलब्ध होईल.)

१०) साईआश्रम २ करीता संस्थानचे नियोजित साईगार्डन प्रकल्प येथील बोअरवल व विहीरीतून पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

११) नाताळ उत्सव कालावधीत साईभक्तांचे वापरासाठी पुर्वी जोडण्यात आलेले ठिकठिकाणचे अतिरिक्त नळ कनेक्शन बंद करण्यात आलेले आहे.

१२) व्दारावती इमारतीमधील फ्लश व्हॉल माहे मार्च २०१४ पासून बंद करुन पाणी कपात करण्याचे नियोजित आहे.

१३) धबधबा व मंदिर परिसर, नविन भक्तनिवासस्थान व धर्मशाळा परिसरातील कारंजाचे पाणी माहे फेब्रुवारी पासून बंद करण्याचे नियोजित आहे.

१४) साईआश्रम १ येथे बोअरवेल घेवून त्याव्दारे उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा वापर तेथे नव्याने विकसीत करण्यात आलेल्या बगीचासाठी करण्यात येत आहे.

१५) साईगार्डन येथील बोअरवेल व विहीरीत इले.मोटारी बसविण्यात येवून ते पाणी साईआश्रम २ येथे पुरविण्यात येत आहे. तसेच सदरचे पाणी संस्थान ओहरहेड टँक येथे आणणेसाठी यापुर्वी ओहर हेड टँक ते नविन सेवाधाम इमारतीपर्यंत टाकलेली पाईपलाईन पर्यंत टाकावयाची पाईपलाईन जोडण्यात आलेली आहे.

१६) नविन प्रसादालय येथील बोअरवेलच्या पाण्याचा वापर तेथील बगीचा व साफ-सफाईसाठी करणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

१७) कर्मचारी सोसायटीचे नविन प्रसादालय जवळील बोअरवेलचे पाणी जोडून ते प्रसादालयात साफ-सफाईसाठी वापरण्याचे नियोजित आहे.

१८) सुलभ शौचालयासाठी ओहर हेड टँक विहीरीवरुन करण्यात आलेल्या पाण्यात कपात करण्यात आलेली आहे.

१९) आवश्यकतेप्रमाणे मागील वर्षीप्रमाणेच कनकुरी साठवण तलावाचे बाजूच्या विहीरींचे पाणी फिल्टरमध्ये घेवून ते पाणी पिण्यासाठी वापरण्यास घेण्याचे नियोजित आहे.

अदयापपर्यंत पाटबंधारे विभागाकडुन वेळेवर रोटेशन येत असल्याने पाणी वितरणात अडचण आलेली नाही. परंतू पाटबंधारे विभागाकडुन रोटेशन कालावधीत विलंब झाल्यास वरील प्रमाणे नियोजन करुन पाणी वितरण करण्याचे नियोजन पाणी पुरवठा विभागाकडुन करण्याचे नियोजित आहे.

संस्थान परिसरासाठी कनकुरी साठवण तलाव येथुन सध्या दररोज अंदाजे ३५ ते ४० लाख लिटर्स पाणी पुरवठा करण्यात येत असून, वरीलप्रमाणे करण्यात आलेल्या नियोजनानंतर कनकुरी साठवण तलाव येथुन दररोज अंदाजे २० ते २५ लाख लिटर्स पाणी वापर होवून कनकुरी साठवण तलावातील दररोज अंदाजे साधारणतः १० ते १५ लाख लिटर्स पाण्याची बचत होईल.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडुन जा.क्रं.मजीप्रा/मनिसंवस कक्ष/ना-३६५/५८/२०१४, दि. १३/०१/२०१४ चे पत्रानुसार वाढीव शिर्डी संस्थान, कनकुरी, पिंपळवाडी संयुक्त पाणी पुरवठा योजनेची

(निळवंडे धरण उद्भव) अंदाजपत्रके व आराखडे प्रशासकिय मान्यता मिळणेकरीता मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे सादर करण्यात आलेली आहेत. सदर पत्राची प्रत माहीतीसाठी इकडील कार्यालयास प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदर योजनेबाबतची पुढील कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

आपले माहीतीसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.१३५ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थान परिसरातील पाणी नियोजनाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.६२ इले. मोटारींचे रिवायडींग करणेकरीता खरेदी करावयाच्या मटेरियलचे माहे एप्रिल- २०१४ ते मार्च- २०१५ या कालावधीकरीता दर मंजुर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** पाणी पुरवठा विभागाकडे संस्थान परिसराकरीता पाणी पुरवठा करणेसाठी व विविध इमारतींचे टाक्या हौद भरणेसाठी ठिकठिकाणी इले.मोटारी बसविण्यात आलेल्या आहेत. पाणी पुरवठा विभागांतर्गत अंदाजे १५० मोटारींचे रिवायडींग व मेन्टेनंस करणेचे काम करण्यात येते. तसेच श्री साईप्रसादालय विभाग, बगीचा विभाग, आय.टी.आय विभाग, हॉस्पिटल विभाग अशा इतर विभागाकडील इले.मोटारींचे रिवायडींग सुध्दा पाणी पुरवठा विभागामार्फत करण्यात येत आहे. सदरच्या मोटारींचे रिवायडींग करणेकरीता त्यासाठी आवश्यक मटेरियल खरेदी करण्यात येवून मोटारींचे रिवायडींग करण्यात येते.

प्रत्येक वेळी वेगवेगळया साईजची वाईडिंग वायर असलेली मोटार वायडींग व मेन्टेनंस करण्यासाठी येते. त्यामुळे पुर्ण वर्षाची वार्षिक खरेदी करता येत नाही. विशिष्ट गेजची वायडींग वायर खरेदी केल्यास तसेच तिचा वापर न झाल्यास ती वायर तशीच शिल्लक राहते. तसेच प्रत्येक वेळी मंजुरी घेणे, कोटेशन मागविणे, आलेल्या कोटेशनवर कार्यवाही करणे व नंतर ऑर्डर देणे यामध्ये बराच कालावधी निघून जातो. श्री साईप्रसादालय विभागातील व पाणी पुरवठा विभागातील काम बंद ठेवता येत नाही. यामुळे कामात अडथळे निर्माण होतात.

याकरीता मोटारींचे वायडींग करीता आवश्यक असलेले मटेरियल खरेदी करणेसाठी संबंधीत दुकानदारांकडून मटेरियलचे आपणास आवश्यक कालावधीसाठी एकदाच भाव घेवून त्यांना स्टँडिंग ऑर्डर दिल्यास प्रत्येक वेळी मंजुरी घेवून मटेरियल खरेदी करणेसाठी वेळ जाणार नाही व कामात अडथळे येणार नाही.

यापुर्वी आपणांकडुन सन २००९-२०१०,२०१०-२०११ व २०११-२०१२ करीता मा.व्यवस्थापन समितीचे मान्यता घेवून रिवायडींग मटेरियल एक वर्षाकरीता पुरविणेसाठी कोटेशन मागविण्यात आलेले होते व निम्नतर कोटेशन धारकास ऑर्डर देवून मटेरियलची खरेदी करण्यात आलेली आहे. उपरोक्त कालावधीत पाणी पुरवठा विभागाकडुन इले.मोटारींचे रिवायडींग करणेकरीता खालीलप्रमाणे खर्च झालेला आहे.

| अं.नं. | कालावधी | एकुण खर्च |
|---|---|---|
| ०१ | एप्रिल २००९ - मार्च २०१० | रुपये ५८,२२४.०० |
| ०२ | एप्रिल २०१० - मार्च २०११ | रुपये २१,३२२.०० |
| ०३ | एप्रिल २०११ - मार्च २०१२ | रुपये २५,२७८.०० |
| ०४ | एप्रिल २०१२ - मार्च २०१३ | रुपये ३४,६३२.०० |
| ०५ | एप्रिल २०१३ - जानेवारी २०१४ | रुपये २६,७९९.०० |

तरी इले.मोटारींचे रिवायडींग करणेकरीता उपरोक्त कालावधीत वरीलप्रमाणे खर्च झालेला आहे. त्यानंतर माहे एप्रिल २०१३ ते माहे डिसेंबर २०१३ या कालावधीत विभागास आवश्यक त्यावेळी कोटेशन मागवून वायडींग मटेरियलची खरेदी करुन काम पुर्ण करण्यात आलेले आहे. परंतू सदर प्रक्रियेत बराच कालावधी जात असल्याने काम करण्यात अडचणी येत आहे.

पाणी पुरवठा विभाग, श्रीसाईप्रसादालय विभाग, बगीचा विभाग तसेच हॉस्पिटल विभागाकडील इलेक्ट्रिक मोटारी रिवायडींग करणेकरीता येत असल्याने त्यांची टप्प्या-टप्प्याने दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

तरी संबंधीत स्थानिक दुकानदारांकडुन पुढील कालावधीसाठी माहे एप्रिल २०१४ ते माहे मार्च २०१५ चे मटेरियलचे दर मंजुर करुन घेवून, मंजुर दराने आपणास आवश्यक मटेरियलची ज्यावेळी आवश्यकता भासेल त्यावेळी खरेदी केल्यास दरवेळी कोटेशन मागवून खरेदी करणेस जो वेळ जाईल त्यामध्ये बचत होईल व काम त्वरीत होईल.

तरी माहे एप्रिल २०१४ ते माहे मार्च २०१५ या कालावधीकरीता इले.मोटारींचे रिवायडींगसाठी लागणारे मटेरियल पुरविणेसाठी स्थानिक दुकानदारांकडुन कोटेशन बोलविण्यास व न्युनतम दराचे कोटेशन धारकास मटेरियल पुरविणेस ऑर्डर देणेसाठी मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.१३६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.६३ सन २०१४- २०१५ करीता पाणी शुध्दीकरणांसाठी ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** पाणी पुरवठा विभागाचे कनकुरी साठवण तलाव येथे पाणी शुध्दीकरणांसाठी ब्लीचिंग पावडर विक्रम (ग्रासीम) ब्रँड डी.सी.एच.(डी.एस.सी.एल.) आय.एस.आय. मार्क ३४ % क्लोरीन उपलब्ध, फेरीक ॲलम- १६% ॲलोमिना फेरीक उपलब्ध व क्लोरीन गॅस सिलेंडर (१०० किलोचे) यांची दैनंदिन आवश्यकता भासते. मागील वर्षी आपण मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार वार्षिक खरेदीमध्ये निविदा मागवून नियमानुसार खरेदी केलेली आहे. सदरच्या मटेरियलचा झालेला खर्च तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | मागणी कालावधी | मागणी | एप्रिल २०१३ ते डिसेंबर २०१३ अखेर खर्च | शिल्लक येणे बाकी मार्च २०१४ अखेर |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | ब्लीचिंग पावडर. | एप्रिल २०१३ ते मार्च २०१४ | ३५ टन | १९ टन ६७५ किलो. | २१ टन ३७५ किलो. |
| ०२. | फेरीक ॲलम. | एप्रिल २०१३ ते मार्च २०१४ | ६० टन. | ३२ टन ०६५ किलो. | २७ टन ९३५ किलो. |
| ०३. | क्लोरीन गॅस सिलेंडर. | एप्रिल २०१३ ते मार्च २०१४ | ४० सिलेंडर. | २१ सिलेंडर. | १९ सिलेंडर |

उपरोक्त पुरवठादार यांना एप्रिल २०१३ ते मार्च २०१४ या कालावधीत पाणी शुध्दीकरणांसाठी ब्लीचिंग पावडर, ॲलम व क्लोरीन गॅस पुरविणेसाठी ऑर्डर देण्यात आलेली आहे.

माहे एप्रिल २०१३ ते डिसेंबर २०१३ या कालावधीत वरीलप्रमाणे ब्लीचिंग पावडर, ॲलम व क्लोरीन गॅस खर्च झालेला आहे. सदरचे पुरवठादार यांची माल पुरविणेची मुदत माहे मार्च २०१४ अखेर संपत असल्याने आपणास पुढील वर्षासाठी सन २०१४-२०१५ करीता नविन निविदा मागवून मटेरियल खरेदी करावी लागणार आहे.

सन २०१४ ते २०१५ या कालावधीत पाणी शुध्दीकरणांसाठी खरेदी करावयाच्या मटेरियलचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशिल | आवश्यकता | अंदाजे दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | **ब्लीचिंग पावडर.** विक्रम (ग्रासीम) ब्रँड डी.सी.एच. (डी.एस.सी.एल.) आय.एस.आय. मार्क ३४ % क्लोरीन उपलब्ध. | ३५ टन. | रु.१७,०००/- प्रती टन. १२.५ % वॅटसह. | ५,९५,०००.०० |
| ०२. | **फेरीक ॲलम.** (१६% ॲलोमिना फेरीक उपलब्ध) | ६० टन. | रु.७,५००/- प्रती टन. १२.५ % वॅटसह. | ४,५०,०००.०० |
| ०३. | **क्लोरीन गॅस सिलेंडर.** (प्रत्येकी १०० किलोचे) | ४० सिलेंडर. | रु.५,०००/- प्रती सिलेंडर ४ % वॅटसह. | २,००,०००.०० |
| | | | **अंदाजे एकुण खर्च -** | **१२,४५,०००.००** |

मागील वर्षाप्रमाणेच ॲलम, ब्लीचिंग व क्लोरीन गॅस सिलेंडरची मागणी करण्यात आलेली आहे. तरी वरील प्रमाणे सन २०१४ ते २०१५ करीता पाणी शुध्दीकरणांसाठी लागणारे मटेरियल विहित पध्दतीने खरेदी विभागामार्फत निविदा मागवून खरेदी करणेसाठी व त्यासाठी येणा-या अंदाजे रु. १२,४५,०००/- मात्रचे खर्चास मंजुरी मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.१३७ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१४- २०१५ करीता पाणी शुध्दीकरणांसाठी ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु. १२,४५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, याकामी येणाऱ्या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.६४ संस्थान प्रकाशित श्री साईसच्चरीत (सर्व भाषेतील) ग्रंथासाठी चांगल्या प्रकारचा पेपर वापरुन मोठया फॉन्टमध्ये छपाई करुन डिलक्स बांधणी मध्ये बायडींग करुन विशेष प्रकारच्या ग्रंथाची छपाई करुन ग्रंथ विक्रीस उपलब्ध करणेबाबत.**

**विषय नं.६५ श्री साई ज्ञानपीठ ट्रस्ट, दादर निर्मित श्री साई प्रेमलहरी अ व श्री साई प्रेमलहरी ब या सीडींची संस्थानचे बुकस्टॉलवर विक्री करणेस परवानगी देणेबाबत.**

**विषय नं.६६ श्री.शरदचंद्र बाळ यांनी गायलेल्या भक्ती प्रेमलहरी भजन व्हीसीडी संचाचे ४ व ५ भागाचे प्रकाशन संस्थानतर्फे करुन विक्रीची व्यवस्था करणेबाबत.**

**विषय नं.६७ साईटेक प्रकल्पासाठीचे आय.टी. ॲडव्हायझर कमिटीचे मेम्बर नेमणूकीबाबत.**

**निर्णय क्र.१३८ विषय नं.६४ ते ६७ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली.**

---

**विषय नं.६८ साईटेक प्रकल्पाअंतर्गत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे सप्टेंबर-२०१३ व ऑक्टोबर-२०१३ चे बीलांबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :** मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०७/११/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७९९.

**प्रस्ताविक:** माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत आयटी कमिटी अध्यक्ष मा. श्री. के. व्ही. रमणी सो. यांचे मार्गदर्शनाखाली साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांना उपरोक्त संदर्भ क्र. ०१ ने कार्यादेश देण्यात आलेला आहे. करारनाम्यातील अटी शर्तीनुसार पहिल्या टप्यातील संगणक प्रणाली मान्य झालेनंतर कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांचे प्रत्येक महिन्याचे येणारे मासिक बील संस्थानने त्यांना अदा करावे लागणार आहे. दिनांक २९/१०/२०११ रोजीचे आयटी कमीटीचे बैठकीतील निर्णयानुसार पहिल्या टप्यातील संगणक प्रणाली ०१ ऑगस्ट, २०११ पासून मान्य करण्यात आलेल्या आहेत. माहिती तंत्रज्ञान विभागाचे दिनांक २६/११/२०११ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये त्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रकल्प कार्यान्वीत करण्याच्या नविन वेळापत्रकानुसार ३१/०८/२०१३ अखेर सर्व कार्यप्रणाली कार्यान्वीत करणे आवश्यक होते. परंतु संस्थानचे विविध विविध विभागात कार्यान्वीत असलेल्या कार्यप्रणालीमधील त्रुटींचे निरसण करणे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून होणे बाकी आहे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे सप्टेंबर, २०१३ चे बील संस्थान आवक क्र.११७२० दि.२२/१०/२०१३ ने तसेच माहे ऑक्टोबरचे बील संस्थान आवक क्र.१३३५७ दि. २७/११/२०१३ ने प्राप्त झालेले आहे.

**मागणी:** कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रकल्प कार्यान्वीत करण्याच्या नविन वेळापत्रकानुसार ३१/०८/२०१३ अखेर संस्थानचे सर्व विभागांचे कार्यप्रणाली कार्यान्वीत करणे आवश्यक होते. परंतु संस्थानचे विविध विभागात कार्यान्वीत असलेल्या कार्यप्रणालीमधील त्रुटींचे निरसण करणे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून होणे बाकी आहे. सदर संदर्भात कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना जा.नं. एसएसएसटी/ आयटी/४१४०/२०१३ दि. १३/१२/२०१३ अन्वये नोटीस पाठविण्यात आलेली आहे. सर्व कार्यप्रणालींमधील अडचणी/त्रुटींचे निरसन झालेची खातरजमा होईपर्यंत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे बीलातून करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार (५.२,५) ९% रक्कम कपात करुन उर्वरीत रक्कम अदा करण्यात यावी, असे नमुद आहे.

माहे सप्टेंबर २०१३ व ऑक्टोबर २०१३ च्या बीलाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :

| Month | Invoice No & Date | Description | Net Amount |
|---|---|---|---|
| September2013 | IN214-0000002367 | Service rendered for the month of September 2013 | 21,24,702.88 |
| | IN214-0000000861 | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | | Total Amount | 27,78,370.04 |
| October 2013 | IN214-0000002458 | Service rendered for the month of October 2013 | 21,24,702.88 |
| | IN214-0000000861 | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | | Total Amount | 27,78,370.04 |
| | | Grand Total | 55,56,740.08 |
| | | 9% Deduction for Delay or Non-Performance | 500107 |
| | | Net Pay | 5056633 |

उपरोक्त कॉग्नीझंट टेक्नॉलाजी, पुणे यांचे माहे सप्टेंबर, २०१३ व ऑक्टोबर २०१३ चे बीलाची एकुण रक्कम रुपये ५५,५६,७४०/- पैकी ९%( रक्कम रु. ५,००,१०७/-) कपात करुन उर्वरित रक्कम रु ५०,५६,६३३/- (पन्नास लाख छप्पन्न हजार सहाशे तेहतीस मात्र), जा.नं. एसएसएसआयटी/ ४१४०/२०१३ दि. १३/१२/२०१३ रोजी त्यांना कळविलेल्या Notice सोबतचे Department wise Defect Close झालेनंतर अदा करण्यात यावी असे नम्र मत आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** कॉग्नीझंट टेक्नॉलाजी, पुणे यांचे माहे सप्टेंबर, २०१३ व ऑक्टोबर २०१३ चे बीलाची एकुण रक्कम रुपये ५५,५६,७४०/- पैकी ९% (रक्कम रु. ५,००,१०७/-) कपात करुन उर्वरित रक्कम रु.५०,५६,६३३/- (पन्नास लाख छप्पन्न हजार सहाशे तेहतीस मात्र) दि. १३/१२/२०१३ रोजी कळविलेल्या Department wise, Defect close झालेनंतर अदा करणेचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.१३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्प अहवाल व सद्यस्थिती याची माहिती घेणेकामी श्री.के.व्ही.रमणी, अध्यक्ष, तांत्रिक सल्लागार समिती, कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनिधी, माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख व कार्यकारी अधिकारी यांची मा.अध्यक्ष महोदय यांचेबरोबर एकत्रित बैठक आयोजित करणेत यावी व त्यानंतर प्रस्तावित बीलाबाबत निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.**

**तसेच माहिती तंत्रज्ञान विभागाने या प्रकल्पामध्ये आजपर्यंतच्या झालेल्या कामाचा सविस्तर अहवाल सादर करावा, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.६९** **दैनंदिन कामकाजासाठी संगणके व संगणकीय साहित्य खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.१४०** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.७०** **साईटेक प्रकल्पाअंतर्गत रिलायन्स टेलिकॉम व एअरटेल यांचे इंटरनेट लिंक व करारनाम्यातील बदलाबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुदः** कलम १७ (१) नुसार भक्तगणांना आवश्यक सोयी व सुविधा उपलब्ध करणे.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:** दिनांक ०७/११/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७९९.

**प्रास्ताविकः-** साईटेक प्रकल्पाअंर्तगत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी प्रा, लि. पुणे यांचेअंतर्गत काम करणाऱ्या रिलायन्स टेलिकॉम व ऐअरटेल यांना इंटरनेट लिंकबाबत संस्थानमार्फत कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर कामी रिलायन्स कम्युनिकेशन यांचेमार्फत शिरडी, मुंबई, चेन्नई, बँगलोर व सिकंदराबाद येथील माहिती केंद्रांसाठी MPLS VPN लिंक देण्यात आलेली आहेत. तसेच श्री साईभक्तांना ऑनलाईन सुविधा पुरविणेकामी शिरडी येथे रिलायन्स यांची इंटरनेट (DIA) ची लिंक सुरु करण्यात आलेली आहे. तसेच Reliance Internet link बंद झालेनंतर ऑनलाईन सर्व्हिसेस् व इंटरनेट वापराची सेवा अखंडीत चालू राहणेसाठी Airtel यांचेकडून लिंक घेण्यात आलेली आहे.

परंतु रिलायन्स टेलिकॉम व ऐअरटेल यांना कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी प्रा, लि. पुणे यांचेमार्फत इकडील विभागाकडे प्राप्त झालेली बीले विहित मुदतीत न मिळाल्याने त्यांनी इंटरनेट सेवा बंद केली असल्याचे कारण त्यांनी नमुद केले होते. परंतु, संस्थानने दिलेल्या कार्यादेशातील अटी-शर्तीचा विचार करता रिलायन्स टेलिकॉम व ऐअरटेल यांची इकडील विभागाकडे प्राप्त झालेली बिले विहित मुदतीत अदा केलेली आहे. तरी देखील त्यांनी इंटरनेट सेवा बंद केल्याने मा.कार्यकारी अधिकारी सो., यांचे निर्देशानुसार रिलायन्स टेलिकॉम व ऐअरटेल यांची इंटरनेट सेवा बंद करुन कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी प्रा, लि. पुणे यांना उत्कृष्ट इंटरनेट सेवा पुरविणाऱ्या नविन Internet Service Provider ची माहिती देणेबाबत कळविण्यात आले आहे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी प्रा, लि. पुणे यांचेकडुन नविन उत्कृष्ट इंटनेट सेवा पुरविणाऱ्या Internet Service Provider चा लिंकबाबतचा अहवाल इकडील विभागास प्राप्त झाले असुन विहीत पध्दतीने BSNL यांची १० MBPS इंटरनेट लिंक कार्यान्वित करणेबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच BSNL यांची इंटरनेट लिंक सुरळीत कार्यान्वित झालेनंतर रिलायन्स टेलिकॉम व ऐअरटेल यांची लिंक Termination करण्याची कार्यवाही कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी प्रा, लि. पुणे यांचे मार्फत करण्यात येईल, असे नम्र मत आहे.

**मागणीः-** दिनांक ०८/११/२०१३ रोजी समक्ष झालेल्या चर्चेनुसार व याबाबत त्यांनी दिलेल्या निर्देशानुसार सद्यस्थितीत साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वित असलेल्या रिलायन्स व एअरटेल या कंपनीची इंटरनेट सेवा Terminate करुन यापुढे संस्थानमध्ये सदर कंपन्यांची सेवा घेण्यात येऊ नये. तसेच सदरकामी साईटेक प्रकल्पावर काम करत असलेल्या कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी प्रा, लि. पुणे यांनी या व्यतीरीक्त इंटरनेट क्षेत्रात उत्कृष्ट सेवा देणाऱ्या दुसऱ्या नामांकीत कंपनीची माहीती मिळवुन तसा अहवाल संस्थानला त्वरीत सादर करण्यात यावा, असे ठरले आहे. यामुळे रिलायन्स व ऐअरटेल यांचे खालील प्रमाणे करारनाम्यात बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. परंतु Wi_max सेवा रिलायन्स यांचेमार्फत घेण्यात आलेली सेवा चालू ठेवावी लागणार आहे.

Wi_max सेवामध्ये रिलायन्स यांनी कळविलेले बदलाचा तपशिल आपले माहितीसाठी सोबत जोडला आहे.परंतु सदर SOW मधील मुद्दा क्रं. ४.३ (पान नं.१६) मध्ये नमुद केलेला Clause रिलायन्स यांनी सुचविलेनुसार त्यात बदल करण्याची आवश्यकता वाटत नसल्याचे माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुखांशी केलेल्या चर्चेनुसार त्यांनी दिनांक २९/१०/२०१३ रोजीचे ई-मेलव्दारे कळविले आहे. त्यामुळे Wi_max सेवेच्या करारनाम्यात देखील बदल करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे रिलायन्स व ऐअरटेल यांचे करारनाम्यातील बदलाबाबतचे प्रस्ताव दप्तरी दाखल करणेत यावे, असे नम्र मत आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मतः** वरील सर्व बाबींचा सारा-सार विचार करता रिलायन्स टेलिकॉम व ऐअरटेल या कंपनीची इंटरनेट सेवा बंद करुन नविन उत्कृष्ट इंटरनेट सेवा पुरविणाऱ्या नविन Internet Service Provider बाबतची कार्यवाही कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी प्रा, लि. पुणे यांचे मार्फत सुरु

असल्याने, रिलायन्स टेलिकॉम व ऐअरटेल यांचे इंटरनेट लिंकचे करारनाम्यातील बदलाबाबतचे आत्तापर्यंत इकडील विभागास प्राप्त झालेली पत्रे दप्तरी दाखल करणेबाबतची नोंद घेणेसाठी सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीची सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.१४१ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.७१ श्रींच्या दर्शनासाठी येणाऱ्या अंध, अपंग व मुकबधीर व्यक्तींची भोजन व निवासव्यवस्था विनामुल्य करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.जोसेफ डिमेलो यांनी त्यांचे दिनांक २३.१२.२०१३ चे पत्रात "दिनांक १९ ते २०.१.२०१४ पर्यंत सलग साखळी पध्दतीची अंधाची पदयात्रा आयोजित केली असून ज्यात ६० अंध व ४० स्वयंसेवक भाविकांचा समावेश आहे. याकरीता १९ व २० तारखेच्या संध्याकाळ पर्यंत १० सेल्फ कंन्टेन्ट रुम, प्रसाद व उदी आणि दिनांक २० रोजीचा नाश्ता व दुपारचे भोजन या सोयी आपणाकडून भेट स्वरुपी द्याव्यात ही नम्र विनंती." असे कळविलेले आहे.

तसेच श्रीमती अनुराधा रोकडे, सचिव अपंग मुकबधीर निवासी विद्यालय सोनगाव, अमरावती यांनी त्यांचे पत्रात "भिक्खू संघाज युनायटेड बुध्दिष्ट मिशनव्दार संचालित अपंग मुकबधीर सेवा संस्थान निवाशी विद्यालय सोनगांव या मुकबधीर शाळेचे ४० विद्यार्थी, शिक्षक व १२ शिक्षकेतर कर्मचारी यांची सहल फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवडयात शिर्डीला येणार आहे. मुले अपंग मुकबधीर असल्याने अपल्या सहकार्याची, मार्गदर्शनाची गरज आहे. मुले अमरावतीवरुन येत असल्यामुळे आपल्याकडे दर्शन, निवास व भोजनाची व्यवस्था व्हावी ही अपेक्षा. खर्चाचे नियोजन कळवावे धन्यवाद." असे कळविलेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१३ चे सभेतील विषय नंबर १८ निर्णय क्रमांक ९०७ अन्वये साईदर्शनासाठी येणारे अंध, मतीमंद व अशाप्रकारचे अपंग अथवा अतिवृध्द की जे स्वत:ची देखभाल करणेस असमर्थ आहेत अशा साईभक्तांची फक्त दर्शन व्यवस्था मोफत करण्यात यावी असा निर्णय झालेला असून त्याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे. परंतु उपरोक्त पत्रात दर्शना बरोबर उदी, प्रसाद भोजन व निवासाची व्यवस्था होणेबाबत कळविलेले असून मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये उपरोक्त व्यक्तींची फक्त दर्शनाची व्यवस्था मोफत करता येईल.

मात्र या व्यक्तीची प्रसाद भोजन व निवासाची व्यवस्था मोफत करण्याबाबत कोणताही निर्णय झालेला नसल्याने तशी व्यवस्था करता येत नाही. तथापि मा.अध्यक्ष सो. यांनी उपरोल्लेखित व्यक्तींची मोफत प्रसाद भोजन व निवासाची साईआश्रम २ येथे व्यवस्था करणेबाबत मौखिक निर्देश दिलेले असून सदरच्या विषयावर कायमस्वरुपी निर्णय होणाच्या दृष्टीने उपरोक्त विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेबाबतही सुचना दिलेल्या आहेत.

तरी मा.अध्यक्ष सो.यांनी दिलेल्या निर्देशान्वये श्रींच्या दर्शनासाठी येणाऱ्या अंध, अपंग व मुकबधीर व्यक्तींची भोजन व निवासव्यवस्था विनामुल्य करणेबाबत मा.त्रिसदस्यीय समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१४२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींच्या दर्शनासाठी येणारे अंध, मतीमंद व अशाप्रकारचे अपंग अथवा अतिवृध्द की जे स्वत:ची देखभाल करणेस असमर्थ आहेत अशा साईभक्तांची मोफत दर्शनव्यवस्था केली जात आहे, त्याचप्रमाणे उपरोक्त साईभक्तांसाठी श्री साईप्रसादालयामध्ये मोफत प्रसाद भोजन व साईआश्रम धर्मशाळा येथे मोफत निवासव्यवस्था करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी/ अधिक्षक, श्री साईप्रसादालय/ प्र.अधिक्षक, साईआश्रम धर्मशाळा)

---

**विषय नं.७२ गोदरेज किंवा नामांकित कंपनीचे कपाट, ऑफिस टेबल व हाय बॅक रिव्हॉल्वींग चेअर खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** संरक्षण अधिकारी यांचेकरीता कार्यालयात खालील प्रमाणे ऑफिस टैबल, कपाट व हाय बॅक रिव्हॉल्वींग चेअर खरेदी आवश्यक आहे.

१. पो.उप.निरिक्षक श्री.संपत रेवजी जाधव यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अहमदनगर कर्तव्यार्थ एक ०९ एम.एम.पिस्टल व ३० राऊंड व बॉडी नं.१६०९३७६१ बट नं.६८ देण्यात यावेत असा आदेश देण्यात आलेला आहे. ते संरक्षण अधिकारी म्हणून दि.१९.०८.२०१३ पासून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी येथे संरक्षण अधिकारी या पदावर हजर झालेले आहे. संरक्षण अधिकारी यांना देण्यात येणारे पिस्टल व ३० नग राऊंड सुरक्षित ठेवणेकामी संरक्षण विभागात बंदिस्त असे स्वतंत्र कपाट नाही. सदर पिस्टल त्यांना निवासस्थानी घेऊन जाणे शक्य नाही. त्यामुळे संरक्षण अधिकारी यांचे पिस्टल व ३० नग राऊंड ठेवणेसाठी भक्कम असे सहा फुट उंचीचे आतमध्ये दोन ते तिन लॉक कप्पे असलेले गोदरेज किंवा नामांकित कंपनीचे कपाट खरेदी करणे आवश्यक आहे.त्याकरीता अंदाजे खर्च रुपये १५,०००/- अपेक्षित आहे.

२. तसेच संरक्षण अधिकारी यांना कार्यालयीन कामकाज पहाणेसाठी दि.२०.११.२००३ रोजी ऑफिस टेबल व दि.०३.०३.२०१० रोजी खरेदी विभागामार्फत एक हाय बॅक रिव्हॉल्वींग चेअर खरेदी करण्यात आलेली आहे.परंतु सततच्या वापराने टेबलचे ड्राव्हर खराब झालेले आहेत.तसेच चेअरचे कुशन व स्प्रींग कमकुवत झालेने पाठीमागे टेकणेसाठी असलेली कुशन मागे जात आहे. त्यासाठी एक ऑफिस टेबल (३ फुट रुंद X ५.५ फुट लांबीचा डबल ड्राव्हर,गोदरेज अथवा नामांकित कंपनीचा) खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच रिव्हॉल्वींग चेअर नामांकित कंपनीची खरेदी करणे आवश्यक आहे.सदर ऑफिस टेबल व हाय बॅक रिव्हॉल्वींग चेअर खरेदी करण्यासाठी रक्कम रुपये २५,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी उपरोक्त ०१ व ०२ प्रमाणे नामकिंत कंपनीचा ऑफिस टेबल,कपाट व रिव्हॉल्वींग चेअर खरेदी करण्यासाठी एकत्रित रक्कम रुपये ४०,०००/- मात्र (अक्षरी रुपये चाळीस हजार) खर्च अपेक्षित आहे.

करीता उपरोक्त ०१ व ०२ प्रमाणे नामकिंत कंपनीचा ऑफिस टेबल,कपाट व रिव्हॉल्वींग चेअर खरेदी करण्यासाठी अंदाजे ४०,०००/- मात्रच्या खर्चास मान्यता तसेच सदर खरेदी करणे बाबत सदर विषयावर चर्चा होऊन कार्यवाही होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.१४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संरक्षण विभागाकरिता गोदरेज कंपनीचे कपाट, ऑफिस टेबल व हाय बॅक रिव्हॉल्वींग चेअर खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.७३** **शिर्डी येथील संस्थानचे साईउद्यान इमारतीतील पोस्ट ऑफिस करिता वापरास दिलेल्या जागेचा रेट कमी करणे व मुदतवाढ देणेबाबत.**

**विषय नं.७४** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को-ऑप सो. लि., शिर्डी यांना लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर वापरास देण्यात आलेल्या व्यवसायांचे मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.१४४** **विषय नं.७३ व ७४ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.७५** **श्री.संग्राम सुरेश काकड, रा.जोर्वे, ता.संगमनेर, जि.अहमदनगर यांची International Antarctic Expedition- 2014 या मोहिमेसाठी निवड झालेली असल्याने खर्चासाठी आर्थिक मदत देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री. संग्राम सुरेश काकड, रा.जोर्वे, ता.संगमनेर, जि.अ.नगर, यांनी दि.०७.०१.२०१४ चे पत्राने कळविले आहे की, माझी International Antarctic Expedition 2014 मोहीमेमध्ये उत्तर व दक्षिण ध्रुवावर चालत जाणेसाठी निवड झालेली असल्याने सदरची मोहीम दि.०८ मार्च २०१४ ते २१ मार्च २०१४ अखेर चालणार आहे. त्यासाठी लागणारी फी, प्रवास व इतर साठी USD २६,०००. इतका खर्च अपेक्षित आहे. या खर्चासाठी आर्थिक मदत मिळावी, अशी विनंती केलेली आहे.

यापुर्वी विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा अधिनियम २००४ कलम १७ (ण) माणव जातीचे कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला अपत्तीमध्ये सहाय्य करणाऱ्या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. या तरतुदीअन्वये, पॅराशुट जम्प, स्काय डायव्हिंग, बुध्दीबळ खेळासाठी विशेष बाब म्हणुन अर्थिक मदत देणेस मंजुरी दिलेली आहे.

**अधिनियमातील तरतुद-** श्री साईबाबा संस्थान अधिनियम २००४ मध्ये अशा मोहीमेसाठी आर्थिक मदत देण्याबाबत स्पष्ट तरतुद दिसुन येत नाही.

**मा.उच्च न्यायालयाचे निर्देश-**

मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी PIL No.18/2011, date 13 March 2012 Sr.No.18 मध्ये खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत. The existing Committee and the Committee constituted by this Court is directed not to take any major financial decision in respect of management of the affairs of the Sansthan without intimating this Court.

**तसेच,** CIVIL APPLICATION NO. 12056/2012 IN PIL NO.18/2011,date 16 Oct.2012 Sr.No. 6 (C) Shall not take any major financial decision of whatsoever nature.

प्रस्ताव अवलोकनार्थ व निर्णयासाठी सादर.

**निर्णय क्र.१४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मध्ये वैयक्तीक बाबीसाठी अनुदान देण्याची तरतुद नसल्यामुळे सदरहू प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**
(कार्यवाही-सामान्य प्रशासन, वशी-०३)

---

**विषय नं.७६ श्री पुण्यतिथी उत्सव- २०१३ चे प्रत्यक्ष झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री पुण्यतिथी उत्सव २०१३ मधील खर्चाकरीता मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.१७/०९/२०१३सभेतील निर्णय क्र.६८७ अन्वये एकुण रुपये ५५,२०,०००/- चे अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे. प्रत्यक्षात खालीलप्रमाणे खर्च झालेला आहे.

| अ.नं. | तपशील | अंदाजपत्रकातील मंजुर रक्कम | प्रत्यक्ष खर्च | तरतुदीपेक्षा जादा खर्च | तरतुदीपेक्षा कमी खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | मंडप कमानी स्टेज | ५७७००००-०० | ५९१३९५-००. | १४३९५-०० | |
| २ | कलाकार बिदागी-कीर्तनकारासह | २५००००-०० | १४५८६-०० | - | २३५४१४-०० |
| ३ | मिष्टान्न खर्च- मजूरीसह | १६७१६५६-०० | ९४२८५३-०० | - | ७२८८०३-०० |
| ४ | विद्युत रोषणाई, जनसेट भाडे, इंधन खर्च इ. | ९२५०००-०० | ९१२१४१-०० | - | १२८५९-०० |
| ५ | निमंत्रण पत्रिका, जाहिरात, पोष्टेज, उदी-प्रसादासह + फलेक्स बोर्ड-स्टेज बॅनर १५०००००+१५००० | १५१५०००-०० | ११६६१२१-०० | - | ३४८८७९-०० |
| ६ | इतर खर्च- प्रसाद, प्रसादालय फर्निचर भाडे,गेस्ट हाऊस, व्ही.डी.ओ.शुटींग फोटोग्राफी, पेंटर बीले इ. | ६७३४४-०० | ३०४१७-०० | - | ३६९२७-०० |
| ७ | जादा कंत्राटी कर्मचारी स्वयंसेवक (विदयार्थी ) मानधन | २९००००-०० | १८७०७५-०० | - | १०२९२५-०० |
| ८ | पालख्यांचे पिण्याचे पाण्याची व्यवस्था खर्च | २४०००-०० | - | - | २४०००-०० |
| ९ | मंदीर व मंदीर परीसर फुलांचे डेकोरेशन | २०००००-०० | - | - | २०००००-०० |
| | | **५५२००००-००** | ३८४४५८८-०० | १४३९५-०० | १६८९८०७-०० |

उपरोक्त तपशील पाहता श्री पुण्यतिथी उत्सव २०१३ करीता एकुण रुपये ५५,२०,०००/- (अक्षरी रुपये पंचावन्न लाख वीस हजार मात्र) अंदाजपत्रकात तरतुद करण्यात आलेली होती. या उत्सवाकरीता प्रत्यक्षात एकुण रुपये ३८,४४,५८८/- (अक्षरी रुपये अडवतीस लाख चौवेचाळीस हजार पाचशे अठयांशी ) खर्च झालेला आहे. तरी सदरचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१४६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**विषय नं.७७ कार्यालयीन कामासाठी दोन नविन झेरॉक्स मशिन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानच्या सर्व विभागांच्या दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या कागदपत्रांच्या झेरॉक्स, आदेश, परिपत्रके, तसचे माहिती अधिकार कायद्यान्वये मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स, कोर्ट कामासाठी लागणारे कागदपत्रांच्या झेरॉक्स, मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढील विषयांच्या व निर्णयाची कार्यवाहीच्या झेरॉक्स, कर्मचाऱ्यांचे सी.आर.फॉर्म, कर्मचाऱ्यांचे १६ नं.फॉर्म, कोऱ्या निवीदा, कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचे शैक्षणिक शुल्क मागणी फॉर्म, अशाप्रकारचे झेरॉक्सचे व प्रिंटींगचे काम खालील झेरॉक्स मशीनवर केले जाते. मशीनचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ. नं. | मशीनचा तपशिल | मशीन वापराची तारीख | मशीनचे आयुष्य मर्यादा/ कॉपीज संख्या. | मशीनची किंमत | दि.२०.०१.२०१४ अखेर झालेल्या झेरॉक्स प्रती. | मशीनची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | झेरॉक्स कंपनीचे झेरॉक्स मशिन- मॉडेल ५६४५ (पर मिनिट ४५ प्रती ) | दि.२७/०३/२०१० (४ वर्षे ) | १० लाख प्रती, किंवा ५ वर्षे | रु. ५,०१,०००/- (देणगी) | ७ लाख, २२ हजार प्रती | **मशीन बंद आहे.** |
| २ | झेरॉक्स कंपनीचे झेरॉक्स मशिन- मॉडेल ७५५६ (पर मिनिट ५६ प्रती ) | दि.२१/०२/२०१२ (२ वर्षे ) | १० लाख प्रती, किंवा ५ वर्षे | रु. ८,३९,०००/- (देणगी) | ५ लाख, ७५ हजार प्रती (कलर मशीन) | मशीन चालु आहे. (FSMA कॉन्ट्रक्ट केले आहे) |
| ३ | झेरॉक्स कंपनीचे झेरॉक्स मशिन- मॉडेल ५७५५ (पर मिनिट ५५ प्रती ) | दि.११/१०/२०१२ | १० लाख प्रती, किंवा ५ वर्षे | रु. ६,५१,०००/- (खरेदी) | ३ लाख, १८ हजार प्रती | मशीन चालु आहे. |

उपरोक्त अ.नं.१ मॉडेल नं.५६४५ या मशीनला ४ वर्षे होत आले आहे. सदर मशीनवर ७.२२ लाख झेरॉक्स प्रती काढलेल्या आहेत. ते सध्या सतत बंद पडत आहे. सदरचे मशीन दोन वेळेस दुरुस्त केलेले आहे, परंतु ते व्यवस्थित चालत नाही. सध्या त्याचा Paper path assembly हा पार्ट गेलेला आहे.

१) वरील तक्त्यातील अ.नं. १ हे मशीन व्यवस्थित चालत नसल्यामुळे सध्या दोन मशीनवर सर्व काम केले जात आहे. जादा कामामुळे अचानक एखादे मशीन बंद पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर कामासाठी एक चांगल्या प्रतीचे झेरॉक्स मशीनची गरज आहे.

२) तसेच संस्थानचे भक्तमंडळ सभासद साधारण १ लाख, ७१ हजार असुन सदर भक्तांना वर्षातील तीनही उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका पाठविल्या जातात. याकामी स्टिकर खरेदी करुन स्टिकरवर भक्तांचे नांव पत्ते प्रिंट केले जाते व नंतर सदरचे स्टिकर पत्रिकांना चिटकवले जातात. याकामासाठी साधारण १२-१५ दिवस लागतात. पर्यायाने भक्तमंडळ सभासदांना निमंत्रण पत्रिका उशिरा मिळते. तसेच पत्रिकेवर चिटकवलेले स्टिकर दिसायला व्यवस्थित वाटत नाही.

त्याऐवजी निमंत्रण पत्रिकेवर भक्तांचे नांव-पत्ते झेरॉक्स मशीनवर प्रिंट केल्यास सदरचे काम ५-६ दिवसात पुर्ण होईल व प्रिंट केलेले नांव पत्ते चांगले दिसतील, भक्तांना निमंत्रण पत्रिका वेळेत पोहच होतील. याकामासाठी एक चांगल्या प्रतीचे नविन झेरॉक्स मशीन घ्यावे लागणार आहे.

उपरोक्त कामासाठी A३/A४/Leagl Size Copier, Printer, Scanner, ४ tray, DADF, Duplex, PS KIT. Per Menute ६५ Copies Speed, ५ Years Free Service अशा पध्दतीचे आधुनिक दोन झेरॉक्स मशीन जाहिरात देऊन कोटेशन मागवुन खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या सुमारे रुपये १२ लाख मात्रचे खर्चास मान्यता असावी.

प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.१४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेले सध्या बंद असलेले मॉडेल नं.५६४५ चे झेरॉक्स मशिन बायबॅकसह कार्यालयीन कामासाठी नवीन दोन झेरॉक्स मशिन्स विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, सदरहू खरेदीसाठी येणाऱ्या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-१२/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.७८** **श्री साईबाबा हॉस्पीटलकडे व्हिजीटींग Nephrologist (मुत्रपिंड विकार उपचार तज्ञ) चे नेमणूकीबाबत.**

**विषय नं.७९** **श्री साईबाबा हॉस्पिटलकडे व्हिजीटींग पेडियाट्रीक सर्जन (बालरोग रोग शस्त्रक्रिया तज्ञ) नेमणूकीबाबत.**

**विषय नं.८०** **डॉ.सुहास गोपीचंद पाटील, व्हिजीटींग न्युरोलॉजीस्ट यांचे दि.२८.११.२०१३ रोजीचे ई-मेलबाबत.**

**विषय नं.८१** **डॉ.मयुर विलास म्हात्रे, न्युरो सर्जन- श्री साईबाबा हॉस्पिटल व डॉ.राम शंकर महाजन, सोनोलॉजिस्ट- श्री साईनाथ रुग्णालय यांचे मानधनात वाढ करणेबाबत.**

**विषय नं.८२** **सि.व्ही.टी.एस. विभागातील डॉक्टरांच्या इन्सेंटीव्हमध्ये सुधारणा करणेबाबत.**

**निर्णय क्र.१४८** **विषय नं.७८ ते ८२ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.८३** **श्री. बाबासाहेब लहानु म्हस्के, परफ्युजनिस्ट (११ महिने कालावधीसाठी) यांना पुढील नेमणूक देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री बाबासाहेब लहानु म्हस्के यांनी दि. २४/०१/२०१४ रोजी अर्ज सादर करुन त्यात असे नमूद केले आहे की, मी श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये परफ्युजनिस्ट या पदावर ३ वर्षापासून ११ महिने या नेमणूकीवर काम करत असून फेब्रुवारी, २०१४ मध्ये ३ री ११ महिने कालावधीची नेमणूक संपत आहे. तरी मला कामामध्ये खंड न देता सलग कामावर रुजू करुन घ्यावे.

सदरचे अर्जावर Strongly recommanded and forwarded असा अभिप्राय वरिष्ठ भूलतज्ञ डॉ. प्रभाकरराव, श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी दिलेला असून नियमाप्रमाणे कार्यवाही करावी, असा रिमार्क प्र. वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांनी दिला आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०७/०२/२०१३ रोजीचे सभेतील निर्णयास अनुसरुन जा.क्र. जा.नं.एसएसएस/ एसएसबीएच/एचआर/१५१७/२०१३ दि. ०८/०३/२०१३ अन्वये श्री बाबासाहेब लहानु म्हस्के यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे परफ्युजनिस्ट या पदावर ११ महिने कालावधीसाठी एकत्रित मासिक रु. २१,०००/- मानधनावर नेमणूक करण्यात आली होती. त्यास अनुसरुन ते दि. ०९/०३/२०१३ रोजी कामावर हजर झालेले असल्याने त्यांची ११ महिने कालावधीची नेमणूक दि. ०८/०२/२०१४ अखेर संपुष्टात येत आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधानुसार परफ्युजनिस्ट रिक्त दोन पदे भरणेकामी जाहिरात देण्यात आलेली असून त्याबाबतची पुढील कार्यवाही चालू आहे. सदरची प्रक्रिया पूर्ण होणेस काहीसा कालावधी लागणार असल्याने श्री बाबासाहेब म्हस्के यांना पुढील कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक देणे आवश्यक आहे.

सबब, श्री बाबासाहेब लहानु म्हस्के यांची रु. २१,०००/- प्रतिमाह मानधनावर पुढील ११ महिन्यांसाठी नेमणूक करता येईल. तसेच जाहिरात प्रक्रियेव्दारे परफ्युजनिस्ट या पदावर उमेदवार उपलब्ध झाल्यास श्री बाबासाहेब म्हस्के यांना देण्यात आलेली पुढील नेमणूक संपुष्टात आणता येईल, असे मत आहे.

तरी, कार्डीयाक विभाग प्रमुख यांचे अभिप्रायाप्रमाणे श्री बाबासाहेब लहानु म्हस्के यांचे दि. २४/०१/२०१४ रोजीचे अर्जावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१४९ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री बाबासाहेब लहानु म्हस्के, परफ्युजनिस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल यांना एकत्रित रु.२१,०००/- मात्र मासिक मानधनावर त्यांची मुदत संपलेच्या तारखेपासून पुढे ११ महिने कालावधीकरीता पुर्वीच्याच अटी व शर्तीवर नेमणूक देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.८४ सध्या संस्थान सेवेत नसलेले (सेवानिवृत्त/ मयत) कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ लागू करणेबाबत.**

**विषय नं.८५ प्रशासकीय अधिकारी पदाचे अतिरिक्त कार्यभाराबाबत.**

**विषय नं.८६ प्रशासकीय अधिकारी "अतिरिक्त कार्यभाराबाबत" श्री.एस.व्ही.गमे, श्री.एस.एन.गर्कल, श्री.यु.पी.गोंदकर व श्री.डी.टी. उगले, प्र.प्रशासकीय अधिकारी यांचे पत्र व त्यांचेकडून प्राप्त झालेल्या उल्लेखनिय अशा महत्वपुर्ण केलेल्या कामाचा अहवाल (Self Assesment Report) बाबत.**

**विषय नं.८७ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी विनियम व नियमांबाबत.**

**निर्णय क्र.१५० विषय नं.८४ ते ८७ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१ विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.१५१ मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-**

**(१)** श्री व्दारकामाई धुनीसाठी गोवरी-सरपण साठ्याकरीता सर्व्हे नं. १०७ पैकी मधील जागेत उभारणेत आलेले शेड अपूरे पडत असल्यामुळे मा. त्रीसदस्य समितीच्या दिनांक०८ डिसेंबर,२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ९६५ अन्वये सर्व्हे नं. १२४ पैकी मधील जागेत नव्याने सदरहू शेडचे काम, ठेकेदार बाबासाहेब पंढरीनाथ शिंदे, पढेगाव यांचेकडून निविदा दरावर ३% अधिक (रुपये १४,७५,६६८/- मात्र) या दराने करुन घेणेस मान्यता देणेत आली आहे. परंतु त्यावेळेस शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांची बांधकाम परवानगी प्राप्त झालेली नसल्यामुळे ठेकेदार यांना कार्यादेश देण्यात आलेला नव्हता. दि.०६/०८/२०१३ रोजी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी उपरोक्त शेडचे बांधकामास परवानगी दिलेली आहे व ठेकेदार बाबासाहेब पंढरीनाथ शिंदे, पढेगाव हे दि.०८.१२.२०१२ रोजीचे सभेमधील मान्य दराने काम करणेस तयार आहेत. तसेच पावसाळयाचे दिवस जवळ येत असल्यामुळे श्री व्दारकामाई धुनीसाठी गोवरी-सरपण साठविण्यासाठीचा बांधण्यात येणाऱ्या शेडचा कार्यादेश ठेकेदार बाबासाहेब पंढरीनाथ शिंदे, पढेगाव यांना देण्यात यावा. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र. ८१ ते १५१ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०८.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (आप्पासाहेब शिंदे) | (डॉ.संजीवकुमार) | (जयंत कुलकर्णी) |
| उपकार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी

**निर्णय क्र.१००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जीवनदायी योजनेअंतर्गत करणेत येणाऱ्या शस्त्रक्रियांसाठीची रु. ६० कोटी पेक्षा जास्त रकमेची बिले कशामुळे अडकलेली आहेत, याची वैद्यकिय संचालक यांनी जबाबदारी निश्चित करुन त्याविषयीचा सविस्तर अहवाल समितीचे पुढील सभेसमोर सादर करावा.**

**तसेच, मा.उपसंचालक, आरोग्य विभाग, नाशिक, यांचे नावे, शस्त्रक्रियांसाठी वापरण्यात येणाऱ्या साधन सामुग्रीचे ओरिजनल टॅक्स इनव्हॉईसेस् उपलब्ध होवु शकत नसलेल्या, शस्त्रक्रियांच्या बिलांमधुन टॅक्स इनव्हॉईसेपोटी रक्कम कपात करण्यास मान्यता देणेबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीनीशी पत्र देण्यात यावे व सदर रकमेची वसुली करणेसाठी तातडीने कार्यवाही करणेसत यावी, असे ठरले.**